म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ३१७६

स्वातंत्र्याची संकल्पना

डॉ. व. द. भाले

RLFBK-0025093

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना:—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५[८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

(क्र. मा. पहा)
५०००-३-८४

३७०६ पंचमी निषेध
३७७५ स्त्रीजातीय
२५०१३
गलत६

मराठी ग्रंथ संग्रहालय नागपूर
३७७५
निषेध २५०१३
गलत६
शाखा (स्थळ प्रत)

26 NO

स्वातंत्र्याची संकल्पना

डॉ. व. द. भाले

REFBK-0025093

प्रस्तावना

श्री. अनंत भालेराव, संपादक 'मराठवाडा' दैनिक, औरंगाबाद.

'सांगाती प्रकाशन' ४१ भाग्यनगर, नांदेड.

प्रकाशन क्र. ५ **स्वातंत्र्याची संकल्पना**
डॉ. व. द. भाले

•

सर्वाधिकार **सौ. शांता भाले**
शिवाजीनगर, हिंगोली ४३१५१३.

•

प्रकाशक **सौ. विजया क्षीरसागर**
"सांगाती प्रकाशन"
४१, भाग्यनगर
नांदेड ४३१६०२.

•

मुद्रक **कयाधू प्रिन्टर्स**
हिंगोली ४३१५१३.

•

प्रथमावृत्ती २६ जानेवारी १९८६

•

मूल्य २५ रुपये फक्त.

•

हृद्‌गत

१९७६ साली आणीबाणीच्या काळांत मला राजबंदी म्हणून अटक झाली. सुरवातीस मी ठाणे येथील कारागृहात होतो. तेथे समाजवादी नेते श्री. दत्ताजी ताम्हणे होते. त्यांची लोकशाही - समाजवादावरील तीन व्याख्याने मी ऐकली. विषय सोपा करून सांगण्याची त्यांची पद्धत विलोभनीय वाटली. प्रबोधनाचे विषय सामान्य कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचविण्याकरितां त्या विषयांची श्री. दत्ताजींसारखी सोपी मांडणी झाली पाहिजे असे तेव्हां मनात आले.

नंतर मला नाशिक कारागृहात आणण्यात आले. तेथे राजबंदीची संख्याही भरपूर – बाराशे चौदाशेच्या आसपास होती. बहुसंख्य तरुण व चाळीशीचे होते. अनेक विषयांवर तेथे चर्चा वादविवाद चालत. मा. गंगाप्रसादजींनी तर एका ज्ञान–सत्राचेच आयोजन केले होते. बोलणारे तर मातब्बर होतेच पण विषयही जिव्हाळ्याचे होते. कांही नांवेच सांगायची झाली तर, श्री अनंतराव भालेराव, ना. मोहन धारिया, खा. बापूसाहेब काळदाते, श्री गंगाप्रसादजी अग्रवाल, प्रा. म. द. पाध्ये, प्राचार्य एकताटे इ.

कारागृहातून सूटका झाल्यानंतर तरुणापुढे बोलण्याचे अनेक प्रसंग येत. ठाणें – नाशिकला ऐकलेल्या भाषणांची माझ्या कुवतीप्रमाणे मी मांडणी करीत असे.

ते सर्व लेख रुपाने लिहून काढावे असा आग्रह माझी पत्नी सौ. शांता भाले यांनी केल्यामुळे हे लिखाण झाले.

हे लेख लिहितांना, ज्या राष्ट्र सेवा दलाशी गेली पंचवीस वर्षे, निरनिराळ्या नात्याने माझा संबंध आहे, त्या सेवादलांतील शाखेत येणारे– – मॅट्रिक कॉलेजच्या सीमा रेषावर असलेले तरुण माझ्या समोर आहेत.

हया विषयावर आतापर्यन्त विस्तृत व विपुल लिखाण झालेले आहे हयाची मला जाणीव आहे. ज्यांना एखाद्याच विषयात रस आहे ते, तो विषय मूळापासून समग्र अभ्यासू शकतात.

सामाजिक व राजकीय क्षेत्रात काम करूं इच्छिणाऱ्या ज्या तरुणांना तेवढा वेळ नाही, त्यांना मानवी स्वातंत्र्याच्या वैचारिक प्रवाहाची तोंडओळख करून द्यावी हाच माझा मर्यादित हेतू आहे.

हयापूर्वी हयांतील लेख, 'मराठवाडा' 'अजिंठा' 'गोदातीर समाचार' 'साम्ययोग' 'अस्मितादर्श' 'राष्ट्र सेवा दल पत्रिका' हयात प्रसिद्ध झाले आहेत.

हे सर्व लेख एकत्र प्रसिद्ध झाल्यास ते तरुणांचे प्रबोधन करूं शकतील ही कल्पना माझे चित्रकार, कवी व समीक्षक मित्र श्री. भ. मा परसवाळे हयांनी मांडली व सांगाती प्रकाशनच्या प्रा. क्षिरसागरांनी ती उचलून धरली.

लेखांचे संकलन करण्यापासून तो पुस्तकाचे सुंदर मुखपृष्ठ तयार करून देण्यापर्यंतची सर्व कामे श्री. भ. मा. परसवाळे हयांनी अत्यंत आत्मियतेने पार पाडली पुस्तकाच्या प्रकाशनाचे श्रेय त्यांनाच आहे,

श्री. अनंत भालेराव, संपादक 'मराठवाडा' हयांची प्रस्तावना हया पुस्तकांस मिळू शकली हे एक भाग्यच आहे. 'स्वातंत्र्याची संकल्पना' व्रत म्हणून ज्यांनी स्वीकारली, अविरत जोपासली, जनमानसात रुजविली त्याकरितां प्रसंगी कष्ट व देहदंडही सोसला अशा मोजक्या महान् व्यक्तीपैकी श्री. अनंतराव भालेराव हे आहेत. स्वातंत्र्याची कल्पना कशी विकसित होत गेली हे त्यांनी सार्थपणे नोंदविले आहे. मी त्यांचा ऋणी आहे.

'सांगाती प्रकाशन' ने हे पुस्तक प्रसिध्दीला घेतल्याबद्दल व त्याची सुंदर छपाई 'कयाधू' प्रेसचे संचालक श्री. रामप्रकाश देवडा हयांनी करून दिल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

हे लेख तयार करतांना माझे मित्र श्री. द. य. गलांडे माजी आमदार हयांची टिपणे व "समाज-प्रबोधन" ची प्रकाशने हयांचा मला अत्यंत उपयोग झाला हे साभार नमूद करणे आवश्यक आहे.

प्रस्तावना

माझे स्नेही हिंगोलीचे लोकप्रिय डॉ. व. द. भाले माझ्याबरोबर आणीबाणीच्या काळात नाशिकच्या तुरुंगात होते. येरवड्यापेक्षाही कितीतरी अधिक संख्येत नाशिकच्या तुरुंगात राजबंदी होते. सर्व राजकीय पक्षाचे लोक होते. पतितपावन, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, जनसंघ, समाजवादी, शेतकरी कामगार पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, जमाअत्ते इस्लामी व मुस्लिम तन्जीम पर्यन्तच्या बहुतेक राजकीय पक्षांना प्रतिनिधीत्व मिळाले होते. दीर्घकाळ कंठावयाचा असल्यामुळे तुरुंगात सर्वांना मान्य होईल आणि सर्वांना समान रूचि निर्माण होईल असे कार्यक्रम घेणे मग आवश्यक झाले. मनोरंजन, नाटके, खेळ, व्यायाम, भाषांचे अभ्यास वर्ग, इथपासून गंभीर स्वरुपाच्या उद्‌बोधनापर्यंत या उपक्रमाची व्याप्ती वाढली. शेवटी शेवटी तर तेथे एक मुक्त विद्यापीठच सुरू करण्यात आले. सुदैवाने नाशिकच्या राजबंद्यात, प्राध्यापक, राजकारणी, नेते, कार्यकर्ते, शेतकरी, व्यापारी, उद्योगपती पत्रकार असे सर्वच होते. अडचण होती ती संदर्भ ग्रंथांची. तीही नाशिक शहरांतील कार्यकर्त्यांनी अल्पस्वरूप प्रमाणावर भरून काढली होती. मुक्त विद्यापीठामध्ये विषयाचे खास बंधन नसले तरी राजकीय क्षेत्रांत तत्त्वज्ञान आणि व्यवहार यांत ज्या विषयांची व वादांची आवश्यकता भासते तेच विषय अभ्यासले गेले. डॉ. व. द. भाले यांनी मोठ्या साक्षेपाने

तेथील व्याख्याने ऐकून टिपणे तयार केली व त्या आधारे त्या संबंधी पुढे लिखाणही केले. हा तपशील एवढ्यासाठी सांगितला की अभ्यासाच्या आणि लिखाणाच्या मर्यादा वाचकांच्या लक्षांत याव्यात.

या पुस्तकांत तीन विभागांतून विषयांची मांडणी करण्यात आली आहे. पहिल्या भागात जगांतील राजकीय क्रांत्या, दुसऱ्यात विविध वाद आणि तत्त्वज्ञाने, आणि तिसऱ्यात संकीर्ण विषय हाताळण्यात आले आहेत. हे सर्वच विषय असे आहेत की ज्यावर जगभर विपुल ग्रंथ उपलब्ध आहेत. त्यामुळे अखेरचा शब्द अगर अभ्यासकांच्या दृष्टीने निश्चित दिशा अशी हमखासपणे सांगता येत नाही. त्यांतून या सर्व विषयांच्या आणि चिंतनाच्या मुळाशी मुख्य विचार व प्रमुख संकल्पना जी स्वातंत्र्याची आहे ती अत्यंत व्यापक असूनही जगाच्या वैचारिक क्षेत्रांत प्रवाही राहात आली आहे. पाश्चिमात्त्य जगात स्वातंत्र्याची जी कल्पना विकसित होत आली आहे ती पूर्वेकडच्या व विशेषत: साम्यवादी विश्वांत जशीच्या तशी स्वीकारली गेली नाही. स्वातंत्र्यासमोर पोटाचा, भुकेचा म्हणजेच भाकरीचा विकल्प उभा करण्यात आला. माणसाची मुख्य व स्वाभाविक प्रेरणा कोणती ? स्वार्थ का परस्पराविषयींचा सद्भाव ? इथपासून या मतभेदांना आरंभ होऊन दोन परस्पर विरोधी व्यवस्थाच जन्माला आल्या. चित्र असे निष्पन्न झाले की, पाश्चिमात्त्य जगातील स्वातंत्र्याची अथवा क्रांतीची कल्पना ही खोटी असून वास्तव आर्थिक जीवनात ती मुक्त स्पर्धा व खाजगी मालकी हिच्याशी समीकरण बांधणारी आहे. तर दुसरीकडे साम्यवादी स्वातंत्र्याची आणि क्रांतीची कल्पना मग स्वातंत्र्य अव्हेरून केवळ भाकरी आणि भौतिक गरजांची पूर्तता या पुरतीच उरली. सारांश या दोन्ही व्यवस्थांनी स्वातंत्र्याची संकल्पनाच निकाली काढली. मुळांत ज्यांनी मानवी उत्क्रांतीच्याबरोबर स्वातंत्र्याच्या कल्पनेचा विचार केला त्यांच्यासमोर समाज आणि त्याचा घटक असलेला माणूस सर्वार्थाने मुक्त असावा, व्यवस्थाही मुक्त असावी असे चित्र होते. शेवटी माणसाला कुठे न्यावयाचे आहे ? अन्नवस्त्रादि भौतिक गरजा भागवल्या की सारे संपले असे होत नाही. खुद्द मार्क्सलाही साम्यवादाने येथे थांबणे मंजूर नव्हते तर त्याची मुक्ततेची व स्वातंत्र्याची कल्पना शासन संस्थेच्या विलयापर्यन्त आलेली होती. शासन नसेल. माणूस स्वयंशासित असेल, भौतिक गरजा अवश्य असूनही दुय्यम ठरतील आणि माणसाला तरल संवेदनेची, बुद्धीची आणि रसिकतेची जो देन मिळाली आहे. तिची तृप्तता मुक्तपणे होईल अशी ही स्वयंशासी व्यवस्था असेल. परंतु

प्रत्यक्षात भांडवलदारी लोकशाहीत आणि साम्यवादी रचनेत आपण शासन सर्वभक्षक बनत गेल्याचेच दृश्य बघतो. माणूस या कचाट्यातून सुटण्याची सुतराम शक्यता दिसत नाही. बंडखोरीची जी स्वाभाविक उर्मी माणसात आढळते, आढळायला हवी, तीच या सौदेबाज व्यवस्थांनी बोथट करून टाकली आहे.

अशा या गुंतागुंतीच्या जंजाळातूनही जगातील अनेक विचारवंतांनी वाट दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. रूसो पासून रॉयपर्यंत आणि मार्क्स लेनिन पासून गांधी पर्यंत अनेक थोर विचारवंतांची व तत्त्वचिंतकाची नांवे या प्रयत्नांत गोवली गेली आहेत. आपल्याकडे या विचारांच्या पीठिका तयार झाल्या. आचार्य नरेंद्र देव, डॉ. राममनोहर लोहिया, आचार्य जावडेकर यांनी लोकशाही समाजवादाची कल्पना पुढे आणली. तर दुसरी पीठिका नवमानवतावादी मानवेंद्रनाथ रॉय यांनी आपल्यासमोर उभी केली. तिसरी विचारप्रणाली गांधीजींची आहे जयप्रकाश नारायण, आचार्य विनोबा वगैरेनी या कल्पनेचा विस्तार केला. जगामध्ये स्वातंत्र्याच्या कल्पनेला अगदी आरंभा पासून आव्हाने मिळत गेली आहेत. त्यातून विविध कल्पना साकारत गेल्या स्वातंत्र्याच्या कल्पनेचा कधी संकोच तर कधी अतिरेक होत गेला. मात्र ही संकल्पना कोणत्याच काळात व युगांत मुळापासून नष्ट होऊ शकली नाही ज्यांनी तसा प्रयत्न केला ते हिटलर व मुसोलिनीसारखे हुकुमशहा व वसाहती निर्माण करणारे पाश्चिमात्य साम्राज्यवादीच नष्ट झाले. आणखी अनेक प्रश्नचिन्ह घेऊन स्वातंत्र्याची संकल्पना जगासमोर स्वत:च एक आव्हान म्हणून उभी राहिली.

स्वातंत्र्य आणि क्रांती यांच्या या प्रवासात अगदी अद्ययावत जोड मिळाली ती गांधी प्रणीत विकेंद्रित व्यवस्थेची. आर्थिक आणि राजकीय अशा दोन्ही क्षेत्रात गांधीवादाने प्रतिपादन केलेल्या विकेंद्रीकरणाची कास धरली तरच आरंभी म्हटल्याप्रमाणे जगातील तमाम स्वातंत्र्यवाद्यांना जो मुक्त व सहृद मानव आणि त्याला पूरक अशी व्यवस्था हवी आहे, तिची शक्यता निर्माण होईल. गांधींचा हा विचार आता अशास्त्रीय मानला जात नाही. एवढेच नव्हे तर गांधींच्या अहिंसेची थट्टा व हेटाळणी झाली तीही विज्ञानाच्या अतिरेकी पद्धतीने, आता एक अनिवार्य मूल्य म्हणून स्वीकारण्याची निकड निर्माण केली आहे. युद्धे आणि आक्रमणे नष्ट व्हावयाची असतील तर राष्ट्र आणि त्यांचे नियंते यांच्या प्रवृत्तीच बदलल्या पाहिजेत. स्वातंत्र्याची कल्पना

ही इतकी नागमोडी वळणे घेत जगासमोर उभी आहे. तिचे आव्हान स्वीकारावेच लागणार आहे.

डॉ. भाले यांच्या पुस्तकामुळे व त्यांनी केलेल्या परिश्रमामुळे सार्वजनिक क्षेत्रात वावरणाऱ्यांना व त्यात दाखल होऊ इच्छिणारांना अधिक अभ्यासाची, चिंतनाची आणि डोळसपणाची गरज भासली तरी त्यांचे हे प्रयत्न कारणी लागले असे म्हणता येईल.

५, सन्मित्र कॉलनी
औरंगाबाद.

— अनंत भालेराव

प्रकाशकाचे मनोगत

'स्वातंत्र्य' या संकल्पने संबंधाने विविध प्रकारचे व अफाट लेखन झाले आहे, आणि गुलामगिरी, अन्याय, शोषण व मानवी अस्तित्वविषयक अनेकस्तरीय प्रश्न जोपर्यन्त अनुत्तरीत राहणार आहेत तो पर्यन्त असे लेखन होतच राहणार आहे. मुळात 'स्वातंत्र्य' ही संकल्पना स्वभावतःच वादग्रस्त संकल्पना (essentially contested concept) आहे, तथापि तिच्या अनेक स्तरीय व विकसित, पण वैचित्र्यपूर्ण स्वरुपापर्यंत पोंचू इच्छिणाऱ्या तिच्या नव्या अभ्यासकांना, समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांना व परिवर्तनाच्या आणि लोकप्रबोधनाच्या चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना तिच्या परिघात अपरिहार्यपणे येणारी ऐतिहासिक घटिते व विचारविकासातील टप्पे यांची प्राथमिक स्वरुपाची तोंडओळख असणे आवश्यक आहे असे वाटते. 'स्वातंत्र्याची संकल्पना' या पुस्तकामुळे हे काम सोपे होणार आहे. वाचक सानंद स्वागत करतील असा विश्वास वाटतो.

या पुस्तकाचे लेखक व आमचे ज्येष्ठ सुहृद डॉ. व. द. भाले हे समाजपरिवर्तनाबाबत खोल आस्था बाळगणारे एक समाजचिंतक आहेत. त्यांनी उदारपणे हे पुस्तक आम्हास प्रकाशनार्थ दिले त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हे आम्ही आमचे कर्तव्य समजतो. आमचे कवी चित्रकार मित्र श्री. भ. मा. परसवाळे याचे सहकार्य आम्हास नेहमीच असते, पण या पुस्तकावेळचा त्यांचा आत्मीय पुढाकार आम्हाला महत्त्वपूर्ण व मोलाचा वाटतो. एवढेच तूर्त नमूद करणे आम्हास इष्ट वाटते.

या पुस्तकाचे सुरेख मुद्रण 'कयाधू प्रिंटर्स, हिंगोली'चे श्री. रामप्रकाश देवडा व त्यांच्या सहकाऱ्यांनी मोठ्या मेहनतीने केले त्याबद्दल त्यांचे आम्ही मनापासून आभार मानतो.

– सौ. विजया क्षीरसागर

हृद्‌गत

प्रस्तावना – श्री. अनंत भालेराव
संपादक, 'मराठवाडा', औरंगाबाद.

प्रकाशकाचे मनोगत

अनुक्रम

१)	फ्रान्सची राज्यक्रांती	९
२)	अमेरिकेची राज्यक्रांती	१५
३)	रशियाची राज्यक्रांती	१९
४)	चीनची राज्यक्रांती	२४
५)	भारतीय स्वातंत्र्य संग्राम	३१
६)	औद्योगिक क्रांती	४०
७)	फॅसिझम	४५
८)	भांडवलशाही अर्थव्यवस्था	५६
९)	साम्यवाद	६३
१०)	लोकशाही उद्‌गम – विकास	७१
११)	लोकशाही समाजवाद	७८
१२)	क्रांतीकारी नव-मानवतावाद	८३
१३)	गांधीवाद	८८
१४)	स्वातंत्र्योत्तर भारतीय राजकारण	९८
१५)	स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रांतील राजकारणाचे स्वरूप	१०९
१६)	जागतिक युवक आंदोलने	११६
१७)	भारतीय युवक आंदोलने	१२१
१८)	नियोजन	१२८
१९)	संपूर्ण क्रांती	१३५
२०)	शेतकरी संघटना	१४२
२१)	क्रांतीची संकल्पना	१४९



पिढ्यान् पिढ्या पुरणारी अस्मिता
समाजसेवेच्या जाणिवा
आणि
स्वातंत्र्याची संकल्पना
ज्यांच्या जीवनातूनच साकार झाली
त्या
मा. लोकनायक जयप्रकाश नारायण
ह्यांना कृतज्ञतापूर्वक अर्पण.

फ्रान्सची राज्यक्रांती

आधुनिक जगाच्या इतिहासातील, अठराव्या शतकाच्या अखेरीस झालेली फ्रेंच राज्य क्रांती ही एक अपूर्व व अभूतपूर्व घटना म्हटली पाहिजे. स्वातंत्र्य, समता व बंधुता, ह्या त्रयींचा, आविष्कार करून. जुलमी, भ्रष्ट, निरंकुश, राजसत्ता व सत्ताधीश उलथून लावण्याचा, दलित व पददलित समाजाचा हा पहिलाच संघटित प्रयत्न होय, ह्या क्रांतीपासून जगातील अनेकांनी प्रेरणा व स्फूर्ती घेतली असल्यास नवल नाही ! ह्या घटनांचा थोडासा मागोवा घेतला तरी संघर्षांची बीजे कशी रूजलात हे ध्यानात येते. इतिहासाच्या अभ्यासाने, हा संघर्ष टाळून, एक मानवतावादी इतिहास घडविण्याचे कार्य व आव्हान तरुण पिढीने स्वीकारावयास हवे.

१७९२ ते १७९५ च्या दरम्यान फ्रान्समध्ये सामाजिक विषमता पराकोटीस पोहोंचली होती. सत्ताधीश आणि अमीर उमराव ह्यांचा वर्ग प्रतिष्ठित म्हणून गणला जात असे. त्यांचा सारा वेळ स्वतःचा बडेजाव राखण्यात, त्या करिता स्वार्थ व भ्रष्टाचारात लबडबण्यात जात असे. त्यांना

देशाची वा इतर समाजातील स्तराची, त्यांच्या सुख दुःखाची जाणीव कशाला ? गुलामीची परंपरा सांगणाऱ्या व सांभाळणाऱ्या ह्या समाजाला आपण आपल्याच बंधूची पिळवणूक करीत आहोत ह्याचे भानही नसायचे. समाजातल्या सर्व सुखसोयी व सवलती ह्याच वर्गाकरिता असायच्या. त्याना "कर" द्यावा लागत नसे. "कायदा" व "धर्म" त्यांचाच पक्षपात करीत असे.

धर्मगुरुंचा वर्ग हा फार मोठा वर्ग होता "धर्माची" तत्त्वे मुरड घालून. कातडी बचाव धोरणांचा स्वीकार ह्या धर्मपीठांनी केलेला होता. त्यापुढे त्यांची शक्ती नेहमी सत्ता व सत्ताधीश ह्यांच्याच बाजूने उभी राहात असे. त्यांना सर्व सवलती व संरक्षण सत्तेने बहाल केलेले होते, सामान्य जनतेच्या शोषणात फार मोठा हात ह्या धर्मपीठांचाही होता.

सामान्य जनतेत, शेतकरी कामगार, लहान व्यापारी, डॉक्टर, वकील, शिक्षक ह्यांचा भरणा असे. पिळवणुकीचा वरवंटा आपल्यावरून केव्हा फिरेल व कष्टाने जगणारे जीवनही केव्हां उद्ध्वस्त होईल ह्याचा नेम नव्हता. असंरक्षित व अस्थिर जीवनाचा कटू अनुभव नित्यशः ह्यांना घ्यावा लागत असे.

ह्याच काळात आपले वर्चस्व कायम टिकविण्याकरिता सत्ताधिशांना युद्धास तयार राहावे लागे. उलट युद्ध करणे हा तात्कालिक असंतोष तात्पुरता का होईना पण मिटविण्याचा एक मार्ग समजल्या जाई. युद्ध सम्मुख राष्ट्राला नेहमीच आर्थिक झळ सोसावी लागे ह्या युद्धमान परिस्थितीतून निर्माण झालेला दुष्काळ, महागाई ह्यामुळे सामान्य जनता त्रस्त झाली होती व असंतोष धुमसू लागला होता. राष्ट्राच्या दिवाळखोरीमुळे आर्थिक विषमता पराकोटीस पोहचली होती.

असंतोष धुमसू लागला की शोषित समाज एकवटू लागतो व परिस्थिती बदलण्यास ("प्रस्थापिता" स हटवून बदल-क्रांती करण्या स) सिद्ध होऊ लागते. ही क्रिया व्यवस्थित व त्वरित घडविण्याच्या कार्यात "तत्त्ववेत्यांचा" ही फार मोठा हात असतो. प्रस्थापितांच्या विरुद्ध ते मार्गदर्शन करीत असतात. क्रांतीला तत्त्वज्ञानाची बैठक देत असतात.

रूसो हया जर्मन तत्ववेत्याच्या विचारांनी मध्य युरोपमध्ये जनजागृती घडविण्यास सुरुवात केली होती. मनुष्य जन्मताच समान आहे. विषमता जन्मताच नसून कृत्रिम आहे. वरच्या वर्गाने स्वत:च्या फायद्याकरिता ती टिकविण्याचाच प्रयत्न केलेला असतो. हीच विषमता संघर्षास कारणीभूत होऊ शकते. संघटीत प्रयत्नाने विषमता नष्ट करून एक नवीन सर्वेपि सुखिनः सन्तु असा समाज निर्माण करण्याची स्वप्नें हया तत्ववेत्यांना पडत होती. फ्रांसमध्ये वाल्टेर, मॉरेस्कुम व मॉटेस्क्यु हयांनी हया तत्त्वज्ञानाची रुपरेषा सामान्य जनापर्यंन्त पोहचविण्याचे, त्यांचा बुळेपणा नष्ट करुन स्वसामर्थ्याची जाणीव करुन देण्याचे व सत्ताधीश व धर्मपीठे ही सामान्य माणसाला केव्हाच पाठीबा देत नाहीत, तेव्हा तो अडेसर दूर करायलाच पाहिजे, असे विचार रुजविण्याचे फार मोठे कार्य केले. लोकशाही तत्वाच्या प्रासादाचा पायाच घातला. बावीसशे वर्षापूर्वी ॲरिस्टोटल म्हणाला "गरजेसाठी तत्त्वासाठी क्रांती होते" तेच घडत होते.

त्यांतच ४ जुलै १७७६ ला अमेरिकेचा स्वातंत्र्याचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला. "जगातील सर्व मानव स्वतंत्र" हा त्यातील मूळ विचार. बरेचसे फ्रेंच सैनिक ब्रिटीशां विरुद्ध अमेरिकन स्वातंत्र्यासाठी लढून फ्रान्समध्ये परत आले होते. त्यांनी स्वातंत्र्याची प्रेरणा जनतेत पसरविण्याचे फार मोठे काम केले.

"पेत्रे" हा तत्त्वज्ञ तेव्हा इंग्लंडमध्ये होता. त्याने "राईटस् ऑफ मॅन" हे पुस्तक लिहिले व त्याचाही फार चांगला परिणाम जनमानसावर झाला. ल्होम हा लोकपक्षाचा कार्यकर्ता होता. त्याने पंधराशेच्यावर लेख लिहिले व लोकजागृती करून चैतन्य निर्माण केले.

त्या काळांतील सत्ताधिशांची परिस्थितीही पाहाणे योग्य ठरेल. १४ वा लुई हा कर्तृत्ववान राजा होता. त्याने फ्रान्सची सर्वांगीण उन्नती करण्याचा प्रयत्न केला, पण त्याच्या काळांत देश सतत युद्धमान परिस्थितीत राहिल्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवर ताण पडत राहिला. १५ व्या लुईच्या काळातही तीच परिस्थिती कायम राहिली व देशाची आर्थिक दुर्दशा कायम

राहिली. १६ वा लुई सामान्य कर्तृत्वाचा होता. त्याच्याच काळांत फ्रान्सची राज्यक्रांती झाली. त्याला जनतेबद्दल सहानुभूती होती, पण कर्तृत्वशून्यता व बाईलवेडेपणामुळे तो कांही करु शकला नाही. त्याची पत्नी मेरी ॲन्टॉयनिटी ही ऑस्ट्रियाची राजकुमारी होती; ती सुंदर व उच्छृंखल असून तिचा पतीवर प्रभाव होता. खरी सत्ताधीश तीच होती. मनमानेल तसा ती कारभार करी त्यामुळे खर्च अमाप होत असे, व देशाच्या अर्थव्यवस्थेवरील ताण वाढीस लागत असे. मेरीचे स्वतःचे १६०० च्या वर नौकर होते.

ढासळलेली अर्थव्यवस्था सुधारण्या करिता परगोनेकरची अर्थमंत्री म्हणून नेमणूक झाली. तो हुषार होता. त्याने आर्थिक परिस्थती सुधारण्या-करिता, अमीर उमराव व धर्मपीठे ह्यांच्यावर कर बसवून पैसा वसूल करावयास सुरुवात केली. पण हे, त्या दोन्ही प्रतिष्ठीत वर्गास अमान्य झाल्यामुळे, राजावर दबाव आणून, त्यांनी परगोनेकरला अर्थमंत्रीपदावरून काढून टाकले. त्यानंतर आर्थिक परिस्थिती चिघळतच गेली. राजाचे वसुलीदार सामान्य जनतेकडून कर वसूली करण्याकरिता जबरदस्ती करीत होते. बेकारी व असंतोष वाढीस लागला.

ह्यातून मार्ग काढण्यासाठी पुन्हा नेकरची नियुक्ती झाली व बऱ्याच दिवसांत न बोलावलेली पार्लमेन्ट पुन्हा बोलाविल्यास असंतोष कमी होईल असे वाटून ती बोलावण्याचे ठरले.

पोटे सपाट झालेले पार्लमेन्टचे प्रतिनिधी एका दृष्टीने खुषीत होते. त्यांवा दबाव वाढत होता., त्यांना राज्यकारभारात स्थान मिळणार होते. १७८९ मध्यं निवडणुका झाल्या व ५ मे ला अधिवेशन भरले. राजा अधि-वेशनात येई पण फक्त दर्शन देऊन जात असे. कामकाज होत नसे. ४ मे ला राजा पुन्हा दर्शन देऊन गेला. प्रतिनीधींमध्ये हालचाल सुरु झाली व राजाचे जोखड झुगारुन देण्याचे विचार सुरु झाले. पण ही क्रांती पॅरिसपर्यंतच मर्यादित राहिली. ग्रामीण भागात तिचे पडसाद फारसे उमटले नाहीत. आस्ते आस्ते सर्व प्रतिनिधी एकत्र येऊन राजा विरोधी आपली शक्ती संघटीत करीत होते. शेवटी एके दिवशी, पार्लमेन्ट हॉल बंद असल्यामुळे "टेनीस कोर्टवर" सर्वांनी जमून जनतेच्या हिताची शपथ घेतली.

सर्व प्रतिनिधी आपल्या विरुद्ध संघटित होत आहेत हे पाहून राजा घाबरला. त्याने सैनिकांस प्रतिनिधींवर गोळीबार करण्याची आज्ञा दिली, पण सैन्याने आपल्याच बांधवांवर गोळीबार करण्याचे नाकारले. जनतेने क्रांती करितां कंबर कसली. गुप्त मंडळे तयार होऊ लागली. १३ जुलैला बत्तीस हजार तोफा व बंदुका जनतेच्या हाती आल्या. जनतेला "बॅजेस्टाईल" तुरुंगाबद्दल तिटकारा होता. कारण ह्याच तुरुंगात जनतेच्या न्याय्य हक्का करिता झगडणाऱ्या पण राजाच्या दृष्टीने राजद्रोही असणाऱ्या, राजबंद्यांना बंद करण्यात येत असे. जनतेने तुरुंगाची दारे फोडली व राजबंद्यांना मुक्त केले. फक्त सात राजबंदी तेव्हा आत होते पण सत्ताधिशांवर घातलेला हा पहिलाच जनतेचा घणाघात होता. त्यामुळे जनता उत्साही व आनंदी होती. स्वाभिमान व सामर्थ्याची जाणीव झपाट्याने जनतेत पसरली व शेवटचा घाव घालण्यास ती सिद्ध झाली.

१ आक्टोबरला दहा हजार स्त्रियांचा मोर्चा राजवाड्यावर गेला. त्यांनी माकडचेष्टा केल्या पण त्या म्हणजे दीर्घकालीन अपमानित जीवनाचा सूड होता. र जाला कैद करुन पॅरीसच्या तुरुंगात टाकले. जनता - संघटना आस्ते आस्ते भरभक्कम होत होती.

१३०० प्रतिनिधींची सभा भरली व राजाला फांशी देण्याची आज्ञा झाली. प्रतिनिधींच्या मनांत प्रस्थापितांबद्दल तिरस्कार होता पण तत्त्वज्ञान फारसे नव्हते. त्यामुळे आपापसांत अनेक पक्ष निर्माण झाले. त्यामुळे आपसांतच मारामाऱ्या होत. त्यातच क्रांतीला विरोध करणारे तत्त्वज्ञान डेंटॉईलने मांडले. प्रतिनिधी सभेत जाणे म्हणजे मरण ओढवून घेणे हाही समज बरेच दिवस होता. अमीर - उमरावांकडून कर वसूल करण्याचे व प्रतिनिधी सभेद्वारे त्यांची चौकशी करून त्यांना शिक्षा देण्याचे सत्र सुरू झाले.

जानेवारी १७९३ त राजास फाशी दिले व एका जुलमी, एकतंत्री, अन्यायी राजवटीचा अंत होऊन जनता सार्वभौम झाली. स्वातंत्र्य, समता, बंधुता ह्या तत्त्वत्रयींचा आविष्कार जगाला प्रेरक ठरला.

घटना स्थापन करावयाची होती. झिरोंडोस, टँटन, राबेनसन, नादोमान मीराबेला इ. नी पुढारीपण स्वीकारले पण एकमत लवकर झाले नाही. शेवटी नेमस्त पक्षांतील फिरोजेस ने प्रतिपक्ष निर्माण केला व सर्व एकत्र आले. लोकही कत्तलींना कंटाळले. कारण हया कत्तली सहा महिन्यावर चालल्या होत्या. लाखो लोक प्राणास मुकले व त्यातून अनेक क्रांत्या जन्म घेत गेल्या जनता, क्रांती ऐवजी भाकरीची मागणी करु लागली व हळू हळू स्थिर सरकार निर्माण झाले.

हया क्रांतीपासून जगाने फार मोठा धडा घेतला. दरिद्री जनता अन्यायाविरुद्ध संघटित होऊ शकते. उठू शकते, जनता सार्वभौम झाली पाहिजे. योग्यवेळी मिळालेल्या तत्त्वज्ञांनाने क्रांतीचे मार्गदर्शन होऊ शकते. म्हणूनच दरिद्री जनतेचा आधुनिक जगातील हा पहिला उठाव, सर्व दरिद्री समाजाला आवाहन देणारा ठरला – खरेखुरे जनतेचे सार्वभौमत्व उदयास आले.

●●●

अमेरिकेची राज्यक्रांती

जगाच्या इतिहासांत अमेरिकेची राज्यक्रांती ही अत्यंत महत्त्वाची व वैशिष्ट्यपूर्ण मानावी लागेल. ह्या क्रांतीने मूलभूत मानवी हक्कांची घोषणा प्रथम अमेरिकेने केली. सर्व मानव जन्मत:च समान व स्वतंत्र आहेत. ही जाहीरनाम्यांतील घोषणा व न्याय-समता-स्वातंत्र्य ह्यांना घटनेची मान्यता जागतिक इतिहासांत प्रथमच मिळाली. ह्या जाहीरनाम्याचा परिणाम, नंतर बनलेल्या इतर देशांच्या घटनेवर व विशेषत: भारतीय घटनेवर झाला आहे हे विशेष. अमेरिका हे ह्या क्रांतीने आधुनिक जगांतील, बादन घटकांचे पहिले गणराज्य बनले व आपल्या बाराशे वर्षाच्या वाटचालीत आज ते अत्यंत आधुनिक, समृद्ध, बलशाली व प्रागतिक राष्ट्र म्हणून तयार झाले आहे.

समृद्धीच्या शिखरावर असलेल्या भारताचा शोध घेण्यास कोलंबस सतराव्या शतकांत बाहेर पडला तो त्याच्या पायाला लागली अमेरिकेची जमीन. १६०७ मध्ये व्हर्जिनियाची प्रथम वसाहत स्थापन झाली. मध्य युरोप

मध्ये चाललेल्या धार्मिक छळाला कंटाळून स्थिर व सुखी जीवनाचा शोध घेण्याच्या ईर्षेने अनेक यरोपियांनी अमेरिकेची वाट धरली. ते इंग्लंडमधून आले होते. डेन्मार्क, स्वीडन मधून आलेले होते. जर्मन, इटली, फ्रान्स मधून आलेले होते. हळू हळू हया वसाहतीची संख्या १३ झाली. स्थानिक रेड इंडियन्सशी त्यांना वसाहतीकरिता झगडा करावा लागला. पण सर्वच लोक, कांही राजकीय, सामाजिक, धार्मिक विचार घेऊन, अन्याय, अनिती भ्रष्टाचार हयाला कंटाळून आलेले असल्यामुळे त्यांनी संघर्षाच्या ऐवजी समन्वयाची भूमिका घेतली व प्रथम ते सर्व अमेरिकन झाले. विविध जाती जमातीनी आपले भेदभाव बाजूस सारून परस्परांशी सौहार्दाचे संबंध जोडले. चारशे वर्षापूर्वी सुरू झालेल्या हया प्रयोगात आज एकात्म व बलशाली समाजाचे स्वरूप आलेले आपण पाहातो.

ह्या तेरापैकी आठ वसाहतींचा राज्यकारभार इंग्लंडचा राजा पाही. त्यांनी आणलेल्या राजकीय परंपरामधून एक नवीन समाज निर्माण होत होता. शेती हे उपजीविकेचे प्रमुख साधन होते. राजकीय विचारांची निर्मिती झालेलीच होती.

१७५६ ते १७६३ – इंग्लंड व फ्रान्स हया काळांत परस्परांशी युध्दमान स्थितीत होते. अखेर इंग्लंडचा विजय झाला व फ्रान्स पराजीत झाला. हया युद्धामुळे इंग्लंडची आर्थिक परिस्थिती पार ढासळली होती. नवीन कर देण्याचे सामर्थ्य इंग्लंडच्या प्रजेत नव्हते. तेव्हां ही तूट भरून काढावयाची कशी ? इंग्लंडच्या राज्यकर्त्यांचे लक्ष अमेरिकेतील त्यांच्या सधन वसाहतीकडे गेले व अधिक महसूल वसूल करण्याकरिता त्यांनी १७६५ ला स्टँप ॲक्ट लागू केला. सरकारी कामकाजा करितां, वर्तमान पत्राच्या कागदा करितां विशिष्ट आकाराचे (किंमतीचे) तिकीट लावावे लागे त्याबरोबर शुगर ॲक्ट, करन्सी ॲक्ट, इ. द्वारे चहा, साखर, कागद, स्टील, कांच, इ. वर कर लादला गेला.

येथेच असंतोषाची ठिणगी पडली. अमेरिकन वसाहतींनी इंग्लंडच्या राजाचा त्यांचेकरितां कायदे करण्याचा अधिकार अमान्य केला. जोपर्यन्त

वसाहतींना पार्लमेंटमध्ये प्रतिनिधित्व मिळत नाही तोपर्यन्त अशा प्रकारचे, वसाहतवाद्यांवर कायदे वा कर लादण्याचा इंग्लंडच्या पार्लमेंटला अधिकारच पोहचत नाही अशी ही स्पष्ट भूमिका तयार झाली. इंग्लंडने लादलेल्या आर्थिक शोषणाच्या धोरणांतून संघर्ष छेडला गेला व त्याला राजकीय स्वरुप प्राप्त होऊन राजकीय जागृती व संघटना अमेरिकन वसाहतीत वाढू लागली व देशभक्तांची चळवळ सुरुं झाली.

बोस्टनचो टी पार्टी अशाच एका देशभक्तीच्या चळवळीचा उद्रेक होय. सॅम्युअल ॲडम्स ह्याने पुढाकार घेऊन देशभक्तांच्या मदतीने इंग्लंड ची चहा घेऊन बोस्टन बंदरात आलेली जहाजे ताब्यांत घेतलो व सर्व चहाची खोकी समुद्रांत फेकून दिली. इंग्लंडला त्यामुळे चहाच्या कराला तर मुकावेच लागले पण अतिशय आर्थिक हानी सहन करावो लागली--१६ डिसेंबर १७७३.

शेवटी कर बसविण्याचा प्रश्न इंग्लंडने आपल्या प्रतिष्ठेचा प्रश्न बनविला व वसाहतवाल्यांनी ह्याविरुद्ध आपली चळवळ उभी केली.

५ सप्टेंबर १७७४ ला फिलाडेल्फिया येथें वसाहतवाल्यांची पहिली परिषद भरली. त्यांत सर्व अमेरिकन वसाहतीनी इंग्लंडच्या विरुद्ध परस्पर सहकार्याची भूमिका घेतलो. परकीय मालावर बंदी घालण्याचे ठरले.

बोस्टन जवळ कंकरड येथे दारुगोळा तयार होत असे. इंग्लंडने जनरल गेजची नेमणूक तेथे करून सर्व दारुगोळा वसाहतवाद्यांच्या चळवळी-विरुद्ध वापरण्याची परवानगी दिली. गेजची पत्नी अमेरिकन होती. तिला हे मान्य नव्हते. स्वातंत्र्यवादी वसाहतवाद्यांना ह्या गोष्टीची तिने माहिती दिली दारुगोळा हस्तगत करण्यास निघालेल्या वसाहतवादी लोकांबरोबर इंग्रज सैन्याची लढाई होऊन त्यांत आठ शेतकरी ठार झाले.

स्वातंत्र्याचे पर्व आता सुरुं झाले. १० मे १७७६ ला फिलाडेल्फिया येथे दुसरी काँग्रेस भरली त्यांत वसाहतींच्या स्वातंत्र्याकरितां इंग्लंडविरुद्ध लढण्याचा निर्णय घेण्यांत आला. जॉर्ज वॉशिंग्टन ह्यांस स्वतंत्र अमेरिकनांचा पहिला सेनापती बनविण्यांत आले व स्वातंत्र्ययुद्धांस प्रत्यक्ष सुरवात

झाली. ७ जून १७७६ ला रिचर्ड हैन्री ह्यांनी विविध देशांशी मैत्री संघ स्थापण्याचे विधेयक मांडले.

४ जुलै १७७६ ला जेफरसनने स्वतंत्र अमेरिकेचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. सर्व मानव जन्माने स्वतंत्र आहेत. समानता-स्वातंत्र्य व सुख शोधण्याचा त्यांचा जन्मसिद्ध हक्क आहे. सत्य स्वयंसिद्ध आहे. शासन जर मूलभत हक्काला बाधा आणीत असेल तर ते सुधारण्याचा त्याला अधिकार आहे. हे मूळ मुद्दे ह्या जाहीरनाम्यात होते. स्वातंत्र्य-समानता व सुख शोधण्याचा मानवाचा मूलभूत हक्क घटनेने प्रथमच मान्य केला गेला त्यामुळे ह्या जाहीरनाम्यास शोषणाविरुद्ध झालेल्या लढ्यांत प्रतिष्ठा तर प्राप्त झालीच, शोषणाविरुद्ध लढण्यासही हा जाहीरनामा अनेकांना प्रेरणादायी ठरला.

अमेरिकन काँग्रेसने सुरू केलेली ही इंग्लंडविरुद्धची लढाई सहा वर्षे चालली. अनंत अडचणी, जय पराजय, इ. तून वॉशिंग्टनला जावे लागले, पण स्वातंत्र्याची प्रेरणा, राजकीय तत्त्वज्ञानाची बैठक असलेली संघटना व निर्धार ह्यांच्या बळावर सहा वर्षानंतर वॉशिंग्टनला जय मिळाला.

जनता जागृत झाल्यावर राजा राज्य करू शकत नाही हे सिद्ध झाले.

१७८३ साली अमेरिका स्वतंत्र व सार्वभौम राष्ट्र म्हणून उदयास आले.

●●●

रशियाची राज्यक्रांती

१९१७ साली रशियांत झालेल्या राज्यक्रांतीस, शोषितांच्या जीवनांत आशावाद निर्माण करणारी क्रांती म्हणून जागतिक इतिहासात फार महत्त्वाचे स्थान आहे. सरंजामशाही झारला घालवून कामगार शेतकऱ्यांच्या समाजवादी राज्याची प्रतिष्ठापना ह्यामुळे झाली. एवढेच नव्हे तर ह्या क्रांतीनंतर राष्ट्रांत धार्मिक, आर्थिक, सामाजिक व राजकीय मूल्य-परिवर्तनास प्रारंभ झाला.

फ्रान्सची व अमेरिकेची राज्यक्रांती रशियन जनतेलाही प्रेरणादायी ठरली. पण कार्ल मार्क्सच्या तत्त्वज्ञानाची मजबूत बैठक ह्या क्रांतीच्या परिवर्तनाच्या मागे होती. मार्क्स प्रणित समाजवादी राज्याची निर्मिती ह्या प्रसंगी ह्या क्रांतीचे नेतृत्व प्रथमापासूनच कम्युनिस्टांकडे होते. राज्यकारभारावरही कम्युनिस्टांची मजबूत पकड राहिली. ह्या क्रांतीपुढे जागतिक शेतमजूरांना उत्थानाची एक आंतरराष्ट्रीय प्रेरणा मिळाली.

एकोणिसाव्या शतकात युरोपमध्ये औद्योगिकरणास प्रारंभ झाला असला तरी त्यांतील पूर्वरशिया हा शेतीप्रधानच होता. झार हा राजा, त्याचे अमीर उमराव व मोजके सरंजामदार ह्यांच्या मालकीची हजारो एकरांची जमीन होती. ह्या जमिनीवर राबणाऱ्या कुळांना गुलामाहून अधिक अधिकार नव्हते. ह्या सरंजामशाहीतूनच वेठ बिगारीची निर्मिती झाली. कुळांनी राब राबावे, उत्पन्न धन्याने घ्यावे व जीवनाच्या साध्या सुखसोयी व सवलतीही त्यांच्या वाट्याला पिढ्यान पिढ्या येऊं नयेत, ह्या दलित, पददलितांच्या जीवनांत कांही आशावाद, स्थिरता आणण्याचा झारनेही कधी प्रयत्न केला नाही.

युद्धाच्या वेळी सैन्य भरती होई ती ह्या कुळांमधूनच व सक्तीची त्यांच्या वैयक्तिक व प्रापंचिक अडीअडचणींचा विचार करण्याची आवश्यकता कधी सरंजामदाराला‌ही वाटली नाही आणि झारला तर नाहीच नाही! सक्तीची वेठबिगार, कनिष्ठ जीवनमान, माणुसकीला पारखा झालेला हा समाज राजाच्या व सरंजामदाऱ्याच्या विरुद्ध असंतोष संघटित करुं लागल्यास नवल नाही. धर्मपीठांनी ह्या काळांत राजाश्रय पत्करला व राज्याच्या सर्व विचार व कृतींना धर्माची जोड देऊन, दलितांना खितपत ठेवण्यास मदत केली.

मार्क्स स्वत: इंग्लंडमध्ये राहून आपले तत्त्वज्ञान तयार करीत होता. त्याचे तत्त्वज्ञान, दलितांना दिलासा देणारे, आधिभौतिक गोष्टींचा विचार करणारे, वैज्ञानिक प्रगतीला अनुलक्षून, अनुभवसिद्ध व व्यवहारवादी होते. त्यामुळेच ते सामान्य माणसाच्या मनाची पकड घेऊं शकणारे, त्यांना आशेचा किरण दाखविणारे होते. त्याच्या अतिरिक्त मूल्यांच्या सिद्धांताने युरोपांत होत असलेल्या औद्योगिककरणाच्या बुडाशी असलेल्या भांडवलशाहीचे विदारक चित्र चितारले जात होते.

ट्रॉट्स्की व लेनिन हे दोघे मार्क्सवादी. लेनिन देशाबाहेर राहून क्रांतीची सूत्रे हालवीत असे तर ट्रॉट्स्की प्रत्यक्ष चळवळीत असे. ट्रॉटस्कीने शोषक व शोषित समाज-सिद्धांत मांडला, जो मार्क्सप्रणित सिद्धान्तापेक्षा

थोडा निराळा होता. मार्क्सच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे क्रांतीचा अग्रदूत हा कामगार होता. कामगार व भांडवलदार ह्यांच्या वर्गसंघर्षातून झालेली क्रांती मार्क्सला अपेक्षित होती. रशियांत शोषित वर्ग हा शेतकरी होता. तो अफाट होता. अत्यल्प असा सरंजामदार त्याचे शोषण करीत असे. शोषित समाज संघटित होऊन क्रांती घडवूं शकतो हा ट्रॉट्स्कीचा विश्वास होता. त्याच दिशेने त्याचा प्रयत्न चालला होता.

सैनिक हा शेतकरी वर्गातीलच असल्यामुळे व शेतकऱ्याच्या सर्व सुख दुःखाशी तो परिचित असल्यामुळे सैनिक – शेतकरी संघटना लवकरच तयार झाली. दरिद्री कामगारांचाही संघटित वर्ग हया संघटनेस येऊन मिळाला व भ्रष्ट राजशाही, अत्याचारी सरंजामशाही व राजाश्रित धर्म ह्यांच्या विरुद्ध उठाव करण्यांस हा सिद्ध झाला.

१८९८ साली साम्यवादी उठावाचा प्रयत्न झाला, पण तो त्या प्रमाणांत यशस्वी झाला नाही. रशियांत सोशल डेमोक्रेटिक लेबर पक्षाची स्थापना झाली.

१९०५ मध्यें रशिया-जपान युद्धांत रशियाचा पराभव झाला. त्यामुळे झार वरील लोकांचा राहिलेला सर्व विश्वास पण पार ढासळला. त्याच वर्षी पॅट्रोगेटचा उठाव झाला पण तो दडपण्यात सरकारला यश आले, पण जन-जागृती फार मोठ्या प्रमाणांत झालेली पाहून, व त्यांचा सत्तेवरील दबाव दिवसेंदिवस वाढतो आहे, हे हेरुन असंतोष कमी करण्याकरितां कांहीं लोक-शाहीवादी सुधारणा जाहीर केल्या. त्यांची खरोखरच अंमलबजावणी झाली असती तर सामान्य मानसाला थोडासा तरी दिलासा मिळाला असता व सरकार विरोधी असंतोष कमी होण्यांत अपेक्षेप्रमाणे झाले असते. पण हुकूम-शाही राज्यांकडून ही अपेक्षा नसतेच. तसेच रशियांतही झाले. सुधारणा कागदावरच राहिल्या. त्यांची अंमलबजावणी न झाल्यामुळे लोक अधिकच चिडले

अखेरीस १९२७ च्या फेब्रुवारीत कामगारांचा प्रभावी उठाव झाला. हया वेळपर्यन्त लष्करही कामगारांना सामील झाले होते. क्रांतिकारकांनी

सत्ता आपल्या हातांत घेऊन समाजवादी गणराज्याची घोषणा केली. रशियन ड्युमाने – पार्लमेंटने – क्रांतीस मान्यता दिली.

१९०६ पासूनच ड्युमांत क्रांतिकारकांनी प्रवेश मिळवायला सुरवात केली होती. त्यामुळे जवळ जवळ दहा वर्षाचा काळ क्रांतिकारकांना संघटना मजबूत करावयास मिळाला. लेनिन स्वतः पक्षशिस्त अत्यंत काटेकोरपणे पाळी. पक्षांतला विरोध त्याने मोडून काढला, व एकसंघ पक्ष घडविण्यास मदत केली. ड्युमा एकीकडे व झार दुसरीकडे अशी ओढाताण होई. क्रांतिकारकांना सामाजिक-अन्यायाविरुद्ध लढत असल्यामुळे नैतिक बळ व जनतेचे पाठबळ सारखे मिळत होते, तर झार एकाकी पडत चालला होता.

उठावाच्या पूर्वी झार 'बेकारी' नष्ट करुं शकत नाही, काम देऊं शकत नाही हे स्पष्ट झाले व उठावाला तोंड फुटले. पेट्रोग्रॅडच्या कामगारांनी सर्व सरकारी दप्तर ताब्यांत घेतले व झारला कैद केले. ड्युमांतील कांही नेते झार पक्षाचे होते. ते क्रांतिकारकांशी बोलणी करून समझोता घडवून आणण्याचा प्रयत्न केला. क्रांतिकारकांनाही सर्व सत्ता एकदम हातात घेणे शक्य नव्हते.

१९१७ च्या जुलैत केरनस्की सत्तेवर आला, पण कम्युनिस्टांनी त्याला साथ दिली नाही. १९१७ च्या आक्टोबरमध्ये पेट्रोग्रॅडला कम्युनिस्ट पक्षाचे अधिवेशन भरले. त्यावेळी क्रांतिकारकांनी करनस्कीला हाकलून दिले व सर्व कार्यालये क्रांतिकारक कामगारांनी हाती घेतली. सैन्य तोपर्यंत संपूर्ण-त्याच्या बाजूचे झालेले होते.

लेनिन क्रांतीचा अग्रदूत – पक्षाचा प्रमुख बनला व पेट्रोग्रॅड हे रशियन क्रांतीचे मध्यवर्ती केन्द्र बनले. हळूहळू सर्व देश कम्युनिस्टांनी आपल्या ताब्यात घ्यायला सुरवात केली. हे कार्य पुढे चार वर्षे अव्याहतपणे चालूच होते. हे करीत असतांना विरोधकांचा विरोध अत्यंत निर्घृणतेने हाणून पाडण्याचे कामही चालू होते. एकीकडे संघटना मजबूत करणे – राज्य ताब्यात घेऊन ते चांलविणे व दुसरीकडे विरोधकांना निपटून काढणे अशी दोन्ही कामे लेनिनने एकाच वेळी यशस्वीतेने केले.

क्रांतिकारकांच्या ताब्यांत सापडलेला झार १९१८ साली मारला गेला. थोडयाच काळांत स्टॅलिन व बुखारीन ह्यांनी राज्य-घटना स्थापन केली. शेतकरी – कामगारांचे राज्य घोषित करण्यांत आले. पंधरा स्वायत संघराज्य हळूहळू ह्या गणराज्यात सामील झाले.

गरीब माणसाच्या जीवनात क्रांती भरणारी ही क्रांती आहे. गुलाम व मजूर हा मालक बनूं शकतो ही आशा निर्माण झाली. कम्युनिस्ट शक्तीचा धाक व दरारा निर्माण झाला. ह्याचाच परिणाम म्हणून भांडवलशाही राष्ट्रात लोक कल्याणकारी राज्याची कल्पना पुढे आली व एकीकडे लोकशाही विकसित होत गेली. भांडवलदार राष्ट्रांना श्रमिक कामगारांचा विचार करावयास लावला.

ही प्रेरणा एवढी प्रबळ ठरली की, पुढील पन्नास वर्षात निम्या जगांवर कम्युनिस्ट सत्तारुढ झाले.

प्रत्यक्ष कम्युनिस्ट राज्यांत विचार, प्रचार, लेखन, संघटन स्वातंत्र्य संपले व एकपक्षीय हुकूमशाहीचे नवीन युग सुरु झाले. पण त्यांनी प्रगतीची घोडदौड चालू ठेवली. औद्योगिक क्षेत्रांचा झपाटयाने विकास झाला. राष्ट्रीय उत्पन्न शे. १४ टक्क्यांनी वाढले. वैज्ञानिक क्षेत्रातही नेत्रदीपक प्रगती झालेली आपण पाहतो. क्रीडा, कला, वाङ्मय ह्या क्षेत्रांतही रशियाची प्रगती चालूच आहे. अनेक गरीब देशांना रशियाने आर्थिक मदत केली आहे.

कोणतीही राजवट सक्तीच्या बळावर उभी राहूं शकत नाही, पण रशियांत हे घडले आहे कारण ह्या प्रगतीला जनतेची साद आहे.

●●●

चीनची राज्यक्रांती

१ आक्टोबर १९५० ला चीनमध्ये जनता सरकारची स्थापना झाली. रशियन क्रांतीनंतर जगांत घडलेली ही एक महत्त्वपूर्ण व वैशिष्ट्यपूर्ण घटना आहे. ह्या क्रांतीनंतर चीन सारखा कृषिप्रधान देश, थोड्यांच काळांत एक अत्यंत बलवान व उद्योगप्रधान देश बनला. चीनच्या क्रांतीपूर्वी व दुसऱ्या महायुद्धानंतर, अमेरिका व रशिया ह्याच जगांतील प्रबळ शक्ती होत्या व आपल्या सामर्थ्याद्वारे आपले अधिकार क्षेत्र (Sphere of influence) जास्तीत जास्त वाढविण्याचा त्या प्रयत्न करीत होत्या. चीनच्या क्रांतीनंतर एक तीसरी प्रबळ शक्ती तयार झाली व जागतिक संतुलन बिघडले.

एकोणिसाव्या शतकांत ग्रेटब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, जपान ह्यांच्या वसाहती चीन देशांत होत्या. ही सर्व भांडवलशाही राष्ट्रे चीनच्या प्रजेचे शोषण करून स्वतःचे देश समृद्ध करीत होतीं. एवढेच नव्हे तर त्यांच्या स्वातंत्र्याकरितां त्यांची आपसांत युद्धे होत, व युद्धासाठी चीनचे सैनिक, चीनची भूमी व चीनचीच संपत्ती वापरली जाई.

ह्या वेळेपासून शोषित समाजांत असंतोष निर्माण होऊ लागला होता पण त्याला योग्य वळण कोणी देऊ शकले नव्हते. ते कार्य प्रथम डॉ. सन्यत सेन ह्यांनी केले. १८६६ साली जन्मलेले डॉ. सन्यत सेन २० व्या वर्षी वैद्यकीय पदवीधर झाले. १४ व्या शतकापासून अंतर्गत लढायामुळे खिळखीळ्या झालेल्या समाजाचे दौर्बल्य, दैन्य हालाखी न पाहावून, त्यांनी स्वतःला क्रांती-कार्यात झोकून दिले. ते क्रांतिकारक होते, तसेच विचारवंतही होते. ह्या शोषणाला धर्मपीठांचे जबरदस्त पाठबळ आहे हेही त्यांच्या लक्षात आले. चीन चा समाज सुखी व स्वतंत्र करावयाचा असेल तर परकीय धर्मपीठे व वसाहती ह्यांच्या विरुद्ध लढा केला पाहिजे हे त्यांचे ठाम मत बनले व आपली संघटना त्या दृष्टीने त्यानी घडवावयास सुरुवात केली.

१९०० साली परकीय मिशनरी लोकांवर व परकीय दूतवासांवर आपल्या संघटकांसह त्यांनी हल्ला केला व क्रांतीची पहिली ठिणगी पडली. आपला हल्ला अयशस्वी झाला हे लक्षांत येताच ते भूमिगत झाले. त्यांना पकडण्यासाठी ५० पौंडाचे बक्षीसही ठेवले होते पण ते आपल्या कार्याने एवढे एकरुप होऊन गेले होते की, जनतेने त्यांना लपविले, पकडू दिले नाही.

१९११ साली हंगामी सरकारची स्थापना झाली. साम्राज्यशाही व सरंजामशाही राज्याविरुद्ध बंडे होऊ लागली त्यांतच चीनच्या राजेशाही चा अंत झाला. १९१२ त तेथे संसदेची स्थापना झाली.

१९१४ साली जपानने चीनवर हल्ला केला. हा हल्ला चीनमध्ये जर्मनचे जे सुरक्षित अधिकार होते त्याच्या विरुद्ध होता. परकीय देशानी त्यांच्या हक्काकरिता आपल्या देशांस युद्धभूमी म्हणून लढावे ही गोष्ट राष्ट्रीयवृत्तीच्या डॉ. सन्यत सेन ला मानवणारी नव्हती. त्यांच्या नेतृत्त्वाखाली, जपानने केलेल्या मागण्या ज्या तडजोडीने स्वीकारण्यात आल्या होत्या त्याबद्दल जनतेचा विरोध नोंदविण्यास सुरुवात केली. तो एवढा प्रखर होत गेला की, प्रस्थापित सरकारला पार्लमेन्ट बरखास्त करावी लागली.

१९१७ त कँटन येथे निराळ्या सरकारची स्थापना झाली व चीन (अ) उत्तर भागाचे सरकार व (ब) दक्षिण भागाचे सरकार असा दुभागला गेला.

१९१७ मध्ये रशियन राज्यक्रांती झाली व त्याचा फार मोठा प्रभाव चीन मधील क्रांतिकारक चळवळीवर पडला. डॉ. सन्यत सेन ने "कोमिटांग' द्वारा जनतेचे संघटन व प्रबोधन सुरु केले होतेच. रशियाच्या वैचारिक प्रभावामुळे नवयुवकांच्या संघटना उभारण्यांस व मार्क्सवादी विचारांची अभ्यास मंडळें चालविण्यास सुरुवात झाली.

इतक्यांत चीन च्या भागावर आपला असलेला तावा रद्द केल्याची घोषणा रशियाने केली व त्या घोषणेचा फार अनुकूल परिणाम व प्रभाव चिनी संघटनांवर पडू लागलां.

१९२१ साली रीतसर कम्युनिस्ट पार्टीचीच स्थापना रद्द झांली व कम्युनिस्ट पार्टी व कोमिटांग हयांनी सहकार्याने व मदतीने कार्य करण्याचे ठरले. हया संयुक्त आघाडीने "राष्ट्रीयत्व, लोकशाही व समानता" ही ब्रीद-तत्त्वे मान्य केली.

१९२५ त डॉ. सन्यत सेन हया पहिल्या क्रांतीकारकाचा, कामगार संघटकाचा व द्रष्टया राष्ट्रवाद्यांचा मृत्यू झाला पण त्यांनी सुरू केलेले कार्य झपाटयाने पुढेच सरकत गेले.

१९२६ मध्ये कम्युनिस्ट पार्टी व कोमीटांगने. शांघाय शहरांत सरंजामशाही राज्याच्या विरुद्ध उठाव केला. कामगारांचे संप घडवून आणले. जनतेचे प्रचंड मोर्चे हया लढयांत सामील झाले व कम्युनिस्टानी शांघाय शहराचा ताबा घेतला. नागरिक सरकारची स्थापना करण्यात आली

पार्टीचे काम वाढण्याच्या दृष्टीने रशियाच्या साहयाने चीनमध्ये "मिलिटरी ॲकॅडमी" स्थापन झाली होती. तिचे प्रमुख चँगकाय सेक होते.

पण चँगकाय सेकने कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाशी प्रामाणिक न राहता स्वत: चीनचे सम्राट बनण्याचे स्वप्न बघावयास सुरुवात केली. त्यांच्या

गटाने नानकिंग येथे आपले सरकार स्थापने व कम्युनिस्टांवर हल्ले करून त्यांचीच हाकालपट्टी करावयास सुरुवात केली. त्याचवेळी माओत्सेतुंग व चौ एन् लाय हे कम्युनिस्टांचे नेतृत्व करीत होते. एका हल्ल्यांत त्यांनाच पकडून, एकतर्फी खटला चालवून त्यांना फाशीची शिक्षा सुनावण्याच आली. पण मोठ्या शर्थीने ते दोघेही तुरुंगातून निसटले व कम्युनिस्ट पार्टीस मिळून क्रांतीकार्यास त्यांनी पुन्हा प्रारंभ केला.

सप्टेंबर १९२७ मध्ये "सोविएत" ची स्थापना केली व लालसेनेची बांधणी सुरू केली ही लालसेना अर्थातच शेतकरी कामगारांची होती. लवकरच एक डिव्हीजन सहस्त्र सैन्य तयार झाले व ७ फेब्रुवारी २९२८ साली किमियांग काबीज करून चिनी सोविएत सरकारची स्थापना केली.

"क्रांती ही बंदूकीच्या नळीतून होते" हे माओचे सुप्रसिद्ध वचन आहे. त्या क्रांतीची पूर्व तयारी ही अशी होत गेली. लालसैन्यात शिस्त राखण्याचा तर प्रयत्न झालाच शिवाय त्यांचे मार्क्सवादी विचारसरणीतून प्रबोधन होत होते, चीनची जनता ही आपलीच आहे आणि आपण तीचेच घटक आहोत ही जाणीव सदैव मनांत रुजण्याकरिता त्यांना वागण्याचे नियम घालून दिले होते व त्यांची अंमलबजावणी अत्यंत कडकपद्धतीने होई. उदाहरणार्थ आज्ञा- १. ज्या अंथरुणावर तुम्ही झोपतां त्या वळकटीला जांतांना गुंडाळून ठेवा.

२. उसन्या घेतलेल्या सर्व वस्तू परत करा.

३. वस्तू फुटल्या असतील वा त्यांचे नुकसान झाले असेल तर त्यांची किंमत द्या.

४. शिस्तीने वागा.

५. प्रातर्विधी गावाच्या बाहेर करा.

वरील साध्या वाटणाऱ्या पण महत्त्वाच्या आज्ञा पाळत गेल्यामुळे लाल सैन्य व जनता ह्यांत दुरावा निर्माण होण्यास संधी मिळाली नाही. उलट लालसेनेची संख्या व लोकप्रियता वाढतच गेली. शोषणमुक्त करण्याकरिता आलेला हा प्रेषित आहे ह्या भावनेने लोक माओकडे बघू लागले.

चँग कैसेक च्या सैन्याच्या व लालसैन्याच्या सारख्या चकमकी होत असत. चँग कैसेक ला चीनचा सम्राट होण्याकरिता माओचा पाडाव करणे आवश्यक होते. चँगच्या सैन्याने अनेक वेळा निकरचे हल्ले लाल सेनेवर चढविले पण त्यांत त्याला भ्हणावे असे यश आले नाही. याचे मुख्य कारण सर्व शोषित जनता माओच्या बाजूस होती व शोषणमुक्त होण्याकरिता जीवनमरणाचाहीं लढा लढत होती.

अनुभवातून माओने आपले युद्धतंत्रही तयांर केले होते त्याचा हा नमुना बघा –

१. जेव्हा शत्रू चाल करून येतो तेव्हा आम्ही माघार घेतो.

२. जेव्हा शत्रू थांबतो तेव्हा त्याला त्रास देतो.

३. जेव्हा शत्रू बचाव करतो तेव्हा त्याच्यावर तुटून पडतो.

४. जेव्हा शत्रू माघार घेतो तेव्हा आम्ही त्याचा पिच्छा करतो.

१९३२ साली जपानने चीनवर – मांचुयिया प्रांतात हल्ला केला. त्याचा परिणाम भ्हणून संपूर्ण चीनने जपानवर आर्थिक बहिष्कार टाकला. त्याचे श्रेय लालसेनेने झालेल्या जनजागृतीसच द्यावे लागेल !

१६ आक्टोबर १९३४ मध्ये माओच्या लालसेनेचा इतिहास प्रसिद्ध "लाँग मार्च" सुरू झाला.

तोपर्यन्त माओकडे जवळ जवळ नव्वद हजाराची लालसेना तयार झाली होती. ही सर्व सेना सशस्त्र पण पायी सर्व चीन पादाक्रांत करण्याच्या ईर्षेने निघाली. ह्या सैन्याने सहा हजार मैलाचा पायी प्रवास केला. बारा प्रांत व बावीस शहरे काबीज केली.

चँग कै सेक च्या सैन्याचे हल्ले चालूच असत. त्यामुळे त्यांना अनेक आपत्तींना व संकटांना तोंड द्यावे लागले. ह्या प्रवासांत त्यांनी अठरा पर्वत ओलांडले व चोवीस नद्या पार केल्या. एका ठिकाणी तर चँग कै सेक च्या सैन्याने त्यांना नदी ओलांडणे अशक्य केले.

सर्व नावा ताब्यात घेतल्या व सर्व सैन्य गारद करण्याची तयारी केली. माओने मोठ्या कुशलतेने १२५ मैलाच्या वळणाचा मार्ग पत्करला व अनंत अडचणींना तोंड देत आपल्या लाल सैन्यास सहीसलामत बाहेर काढले. ह्या वाटचालीत सशस्त्र संग्रामाबरोबरच वैचारिक संग्रामही चालू असे. रात्री लालसेनेचा जेथे मुक्काम पडे तेथे, लालसेनेची भूमिका, मार्क्सचे तत्त्वज्ञान, संघर्षातून दलितांची होणारी प्रगती व कामकरी राज्याच्या स्थापनेची कल्पना समजावून दिल्या जाई. अनेक लोक प्रभावी होऊन लालसेनेस मिळत व चँग कै सेकच्या हालचालींची माहिती देऊन लालसेनेस विजयाची संधी प्राप्त करून देत.

१९३५ मध्ये अनेकदा अपयश पदरी आल्यामुळे चँग कै सेकने तडजोडीची भूमिका स्वीकारली व माओकडे तहाची बोलणी चालविली. माओची भूमिका प्रखर राष्ट्रवादी असल्यामुळे त्याने चँगशी समझोता करून चीन मधील साम्राज्यशाही विरुद्ध लढण्याचे ठरवले, व एक संयुक्त राष्ट्रीय आघाडी उघडली.

पण चँग कै सेक ने येथेही भ्रष्टाचार केला. त्यांच्याकडे आलेली सर्व हत्यारे त्यांनी जपानला विकली.

१९३६ साली जपानने चीनवर आक्रमण केले. लाल सेनेने त्यांच्याशी निकराचा सामना देऊन त्यांचा पराभव केला. चँगला लाल सेनेने पुनः पकडले. पण पुन्हा तडजोडीचा ठराव होऊन गृहयुद्ध थांबले व जपानशी चीनची सर्वंकष लढाई सुरू झाली हे युद्ध पुढे नऊ वर्ष चालले होते. एकीकडे शेतकरी-कामकरी जागृत करावयाचा, लालसेनेची बांधणी करावयाची, भ्रष्टाचार विरहीत शासन चालवावयाचे, राष्ट्रवादी भूमिका जतन करावयाची व साम्राज्यशाही विरुद्ध लढत राहायचे, ही सर्व कामे माओने अत्यंत संयमाने, कुशलतेने व तडफेने केली.

आणि शेवटी १९४५ मध्ये चीनने जपानवर संपूर्ण विजय मिळविला.

२५ अक्टोबर १९४५ ला माओने लोकशाही योजनेचा आराखडा संयुक्त आघाडीसमोर ठेवला व तत्त्वतः तो मान्यही झाला. पण माओची

वाढलेली राजकीय प्रतिष्ठा चँग कै सेक ला सहन होणे शक्य नव्हते. त्याने झालेल्या तडजोडीचा भंग करुन माओ विरूद्ध अंतर्गत यादवीस तोंड फोडले व दोन्ही पक्षांत घनघोर युद्ध झाले.

लालसेनेची बांधणी अत्यंत शिस्तबद्ध, राष्ट्रवादी, तात्त्विक व दलितांना दिलासा देणारी, शोषणमुक्त करण्यास निघालेली असल्यामुळे त्यांच्या कार्यात जिद्द व जिव्हाळा होता. त्यामुळेच लालसेनेचे हल्ले मोठे आक्रमक झाले व परिणामतः चँग कै सेकला फार्मोसास पलायन करावे लागले.

१ आक्टोबर १९५० ला चौ एन लाय व माओ त्से तुंग ह्यांच्या नेतृत्वाखाली चीनमध्ये जनता सरकारची स्थापना झाली.

तेथे व्यक्तिस्वातंत्र्य, लेखन स्वातंत्र्य हे मर्यादित असेल, पण तेथील जीवनमानाची पातळी वाढली आहे हे नाकारता येत नाही. केवळ पंचवीस वर्षाच्या काळांत एक दरिद्री, कृषिप्रधान देश. सबल औद्योगिक-प्रधान देश बनतो, एक जागतिक बलशाली शक्ती होऊन बसतो हे मान्य केलेच पाहिजे.

●●●

भारतीय स्वातंत्र्य संग्राम

भारतीय स्वातंत्र्य संग्राम हा भारतीयांचा, इंग्रजांच्या वसाहतीतून मुक्त झालेल्या घटनांचा इतिहास आहे. युरोपात औद्योगिक क्रांती सुरू झाली. यंत्रयुगाचा प्रसार होऊं लागला, उत्पादन वाढ होऊं लागली, तशी, आपला माल खपविण्याकरितां ह्या विकसित देशांना नव-नवीन बाजारपेठा शोधाव्या लागल्या. बाजारपेठांच्या शोधांत असलेल्या व भारतीय भूमीवर आलेला पहिला युरोपीयन हा पोर्तुगीज होय. नंतर आले ते डच, फ्रेंच व इंग्रज, हे आले ते प्रमुखत: व्यापाराच्या निमित्ताने. त्यांनी स्थानिक राजांशी तह केले ते देखील व्यापारी पद्धतीचेच. छत्रपती शिवाजी महाराजांनी हा व्यापारी करार करतांना ह्या परदेशी लोकांना स्थानिक भांडणांत लक्ष घालू नये असे सूचविले होते. छत्रपतींची ही दूरदृष्टी उल्लेखनीयच होती पण हे भान त्यांच्यानंतर कोणी ठेवले नाही.

इंग्रज आले तेव्हां युरोपांत यंत्र युगाबरोबरच विज्ञान युगालाही सुरवात झाली होती. प्रबोधनाचे युग तेथे सुरू झाले होते. येथे आलेल्या इंग्रजांजवळ

वैज्ञानिक दृष्टी होती. त्यांच्या देशांत लागत असलेल्या शोधांमुळे बंदुका, बंदुकांची दारु, तोफा, होकायंत्रे आदि, ह्या अविकसीत देशास अपरिचित अशी यंत्रेही त्यांना बरोबर आणता आली. ह्या देशांतील कच्चा माल आपल्या देशी पाठवावयाचा, त्या ऐवजी तेथून तयार झालेला पक्का माल येथे आणून विकावयाचा, नफा मिळवावयाचा, हे त्यांचे प्राथमिक धोरणही परिस्थितीनुरूप बदलत गेले.

भारतासारख्या अवाढव्य देशांत अनेक छोटी मोठी राज्ये, संस्थाने व त्यांचे मांडलिक असत. उत्तर भारतांत मोगलांचे वंशज राज्य करीत असले तरी त्यांची केंद्रीय शक्ती क्षीण झालेली होती व अनेक मांडलिकांनी स्वतःच राज्याचा कारभार हाती घेतला होता. दक्षिणेत मराठ्यांचे राज्य प्रमुख होते. सर्व देशभर त्यांचा दरारा होता, चौथाई व देशमुखी व सरदेशमुखींचे त्यांचे अधिकार सर्वत्र मान्य झाले होते व त्यानिमित्ताने त्यांचे प्रतिनिधी भारतभर पसरलेले होते. मूळ छत्रपतीची गादी ही सातान्यास असली तरी सर्व कारभार बाळाजी विश्वनाथापासून, मुख्यप्रधान म्हणून त्यांच्याच घराण्यात होता. माधवराव पेशव्या पर्यंत ही पेशवे घराण्याची कर्तृत्व-मालिका टिकली व त्यांनी चोख कारभार केला, पण नंतर दुसऱ्या बाजीरावांच्या काळांत, कर्तृत्ववान मनुष्य शिल्लक न राहिल्यामुळे पेशव्यांचे आसनच अस्थिर झाले. चांगली माणसे दूर फेकली गेली. स्वार्थी, भ्रष्ट माणसांना राजकारणांत मानाच्या जागा मिळाल्या व त्याचाचे परिणाम म्हणून दक्षिणेत निझाम व हैदरअली व उत्तरेत पेशव्यांचे प्रतिनिधी व मांडलिक स्वतंत्रपणे कामे करूं लागले व आपल्या उद्दिष्टपूर्तिकरितां एकमेकाशी लढूंही लागले.

लढण्याचे सामर्थ्य सर्वांत सारखे असणे शक्यच नव्हते. जे कमी सामर्थ्यवान होते त्यांनी परकीय मदत घ्यावयास सुरुवात केली. येथेच इंग्रज राजकारणात उतरले. त्यांनी स्वतःच्या रक्षणाकरितां स्वतःच्या पलटणी तयार केल्या होत्या, त्या शिस्तबद्ध व आधुनिक तंत्र व हत्यारे ह्याच्या जाणकार असत. ह्या पलटणीपुढे युद्धभूमीवर स्थानिक सैनिक टिकूं शकले नाही.

इंग्रजांनी आपल्या सामर्थ्याचा फायदा घ्यावयास सुरवात केली. मोठ्या रकमा व अवास्तव व्यापारी सवलती घेऊन लढण्यास किंवा रक्षणार्थ आपल्या पलटणी द्यावयाच्या व आपल्या सामर्थ्याचा दबदबा निर्माण करावयाचा हे तंत्र त्यांनी स्वीकारले, व ईस्ट इंडिया कंपनीच्या वतीने राज्यकारभार करण्याची परवानगी व्हिक्टोरिया राणीकडून मिळवून प्रत्यक्ष राज्यकारभार आपल्या हाती प्रथम बंगालमध्ये घेतला.

इंग्रज येथे व्यापारी म्हणून आले होते तेव्हां त्यांना कोणी फारसा विरोध केला नव्हता पण ते राज्यकारभार करूं इच्छितात हे लक्षांत येताच हे पारतंत्र्याचे जोखड कायमचे आपल्या मानेवर बसणार ही जाणीव निर्माण झाली व ह्या राजकीय पारतंत्र्याचा प्रतिकार करण्याकरितां पहिला लढा सिराजउद्दौलाने बंगालांत दिला, पण तो पराभूत झाला व इंग्रजांनी आपल्या राज्याची मुहूर्तमेढ येथे रोवली.

परकीय शासक, त्यांच्याकडून होणारे शोषण व पिळवणूक; राजकीय दडपण व येथील पूर्वापार चालत आलेल्या छोट्या छोट्या व्यवसायांची झालेली पिछेहाट, त्यामुळे निर्माण झालेला बेकार, अर्धपोटी राहणारा दरिद्री समाज, कांहीही कारण काढून संस्थानिक व मांडलिकांची काढून घेतलेली संस्थाने, त्यांचे रद्द झालेले पारंपारिक हक्क, ह्यांची चढती कमान सुरू झाली व हे पारंत्र्याचे जोखड फेकून देण्याचे प्रयत्न ह्या देशांत सुरू झाले.

इंग्रजांच्या येथील वास्तव्यामुळे युरोपीय प्रबोधनाचे विचारही येथे प्रसृत होऊ लागले होते त्याचा फायदा भारतीय प्रबोधनाचे युग सुरू करण्याकरिता राममोहनराय, म. आगरकर आदींनी घेतला.

१८१८ मध्ये दुसऱ्या बाजीरावाला पळवून पुण्यास मराठी राजसत्तेचे निशाण खाली उतरविण्यात आले. "युनियन जॅक" हे इंग्रजी निशाण वर चढविण्यांत आले. महाराष्ट्राच्या व भारताच्या इतिहासातील तो काळा दिवस होता. इंग्रजांच्या साम्राज्यवादाने सारा भारत व्यापला आणि त्यांची निरंकुश सत्ता सर्व देशभर पसरली. धार्मिक व राजकीय अन्याय वाढत चालले.

इंग्रजांना ह्या देशातून हांकून द्यावे व आपल राज्य प्रस्थापित करावे असे प्रयत्न तेव्हापासूनच सुरू झाले. १८१८ तच वेलोरचे बंड झाले. कांही तुरळक ठिकाणी आदिवासांचेही उठाव झाले. उमाजी नाईक व तंट्या भिल्ल ह्यांचेही स्थानिक पातळीवर उठावाचे प्रयत्न झाले आणि ते दडपले गेले.

इंग्रजांविरुद्ध संघटित असा उठाव १८५७ सालो झाला. त्याचे धुरिणत्व नानासाहेब पेशवे ह्यांनी पत्करले होते. तात्या टोपे हे उठावाचे सेनापती होते. दिल्लीचा नामधारी बादशहा बहादुरशहा ह्यांच्या नांवाने सर्वत्र द्वाही फिरविली गेली. सैन्य, जनता व संस्थानिक ह्यांचा हा संयुक्तीक इंग्रजांविरुद्ध उठाव होता. झाशीची राणी, कुंवर जगदीशसिंह, मंगल पांडे आदि राष्ट्रभक्तांनी आपल्या प्राणांची बाजी लावली.

अन्यायी इंग्रज राज्य हे तेव्हांचे प्रस्थापित होते. प्रस्थापिता विरुद्ध देशभर जनजागृतीचे कार्य नानासाहेब पेशवे, तात्या टोपे व त्याच्या मदतनिसांनी केले. स्वातंत्र्य युद्धापूर्वी नानासाहेब पेशवेनी आपले प्रतिनिधी रशियांत पाठविले होते व लढाईच्या आधुनिक तंत्राची माहिती आणणे, तसेच अत्याचारी इंग्रजी राज्याविषयीची माहिती करून देणे ही कामे त्यांनो केली. इंग्रजी सैन्यात नवीन काडतुसाच्या वापरांमुळे बेदिली निर्माण झाली होती त्यांचाही नानासाहेबांनी फायदा घेऊन सैनिकांना स्वधर्म व स्वराष्ट्र ह्याकरिता लढण्यांस प्रेरित केले. जनजागृतीही फार मोठ्या प्रमाणात झाली व सर्व देशभर एकाच वेळी हे सर्वंकष युद्ध सुरू करावयाचे असे ठरले ३१ मे १८५७ ही उठावाची तारीखही ठरली. गुप्त संदेश, योजना आदि झाल्या व सर्व देश ह्या उठावाकरिता सज्ज झाला.

१० मे ला कलकत्त्यास किरकोळ कारणांमुळे चिडून मंगल पांडेनी पहिली गोळी इंग्रज अधिकाऱ्यावर झाडली. त्यास ताबडतोब पकडून फाशी देण्यात आले. पण ह्या ठिणगीने सारा देश पेटविला व ठरल्या तारखेच्या आधीच इंग्रजां विरुद्धच्या लढाईस तोंड फुटले.

क्रांतीकारकांनी मीरत, कानपूर ही शहरे काबोज केली. दिल्लीवर ताबा केला. तात्या टोपे, झाशीची राणो लक्ष्मीबाई, कुंवर जगदीशसिंह स्वत:

नानासाहेब व इतर क्रांतिकारक भराभर यश संपादन करीत आगेकूच करीत होते. तात्या टोपे व झाशीच्या राणीने तर पराक्रमाची शर्थ केली. पण क्रांति युद्ध ठरलेल्या दिवसा आधीच सुरू झाल्यामुळे देशभरच भांबावल्या सारखी परिस्थिती निर्माण झाली. त्याने इंग्रजांना, क्रांतीकारकांना एकएकटे गाठून त्यांचा मोड करण्यास वेळ मिळाला. पंजाबांत शिखांनी, नेपाळ नरेशांनी इंग्रजांनाच मदत केली तर ग्वाल्हेर व दक्षिणेतील संस्थाने ठरल्याप्रमाणे क्रांतिकारकांच्या बाजूने युद्धांत उतरली नाहीत त्यामुळे क्रांतिकारकांना पराभव पत्करावा लागला.

इंग्रजाविरुद्ध देशभर उफाळलेल्या असंतोषास अशाप्रकारे पराभव पत्करावा लागला तरी हया उठावापासून धडा घेऊन व्हिक्टोरिया राणीने "धार्मिक क्षेत्रांत हस्तक्षेप न करण्याची हमी" दिली.

असंतोष कांहीसा थंड होतोय असे वाटत असतांनाच १८८१ ते ७९ च्या दरम्यान रामसिंह पुकाने पंजाबात व वासुदेव बळवंत फडके हयांनी महाराष्ट्रांत इंग्रजांविरूध्द सशस्त्र क्रांती करिता संघटना तयार करण्याचे प्रयत्न केले.

१८९५ मध्ये भारतीयांत निर्माण झालेल्या असंतोषाला मार्ग मिळावा म्हणून भारतीय काँग्रेसची स्थापना ह्यूमने केली. ह्यूम हे गृहस्थ कानपूर क्रांतिकारकांनी ताब्यात घेतल्यावर स्त्रीवेषांत पळून गेले होते. त्यांना भारतीय असंतोष काय असतो हे थोडेसे जाणवले होते.

१९०५ पर्यन्त काँग्रेसचे नेतृत्व नेमस्तांकडे होते. भारतीयांना शिक्षणाच्या सोयी उपलब्ध व्हाव्यांत, नोकरीत प्राधान्य मिळावे असे जुजबी ठराव पास होत व ते विनंतीवजा शब्दांत ब्रिटीश सरकारकडे पाठविले जात.

१९०६ साली लो. टिळकांचे नेतृत्व कॉग्रेसला लाभले व त्यांनी "स्वदेशीचा ठराव" पास केला. स्वदेशीच वस्तू वापराव्यात, परदेशी वस्तूंवर बहिष्कार टाकावा. अशा प्रकारच्या चळवळीमुळे देशांत एक नव चैतन्य निर्माण झाले व राष्ट्राभिमानी लोकांना एकत्र आणणारा एक दुवा तयार झाला.

भारताच्या इतिहासांतील हे दशक म्हणजे "सावरकर पर्व" म्हणावयास हवे. स्वा. सावरकरांनी "अभिनव भारत" संस्थेची स्थापना केली. भारतात शस्त्रास्त्रांची निर्मिती करावयाची. परदेशातून त्यांची आयात करावयाची व अत्याचारी इंग्रजांचे खून करून देशभक्तांनी "स्वातंत्र्य लक्ष्मी"चा जयजयकार करीत फाशी जावयाचे, सत्र सुरू झाले व सर्व जगच खडबडून जागे झाले. इंग्लंड मध्ये मदनलाल धिंग्रा, महाराष्ट्रात कान्हेरे, देशपांडे आदिनी अत्याचारी इंग्रजांचे खून केल्याबद्दल त्यांना फाशी देण्यात आले. अनेक देशभक्त "अभिनव भारताचे" काम करू लागले. त्यानिमित्ताने इंग्लंडचे अत्याचार जगाच्या वेशीवर टांगू लागले. शिवराम महादेव परांजपे सारखे अनेक पत्रकार, लेखक, आपल्या लिखानाद्वारे जनजागृती करून क्रांतिकार्यास सहाय्यभूत ठरु लागले. हयाचवेळी बंगालच्या फाळणीचा प्रश्न इंग्रज सरकारने पुढे आणला. "बंगभंगाची चळवळ" म्हणून तो गाजला. सर्व देशाने एकमुखाने ही फाळणी नाकारली.

बंकींमचंद्रानी "आनंदमठ" नाटक लिहून पूर्ण केले होते. त्यांतील "वन्देमातरम्" ने तरुण मनाची पकड घेतली व तो एक राष्ट्रीय उत्थापनाचा मंत्रच ठरला. क्रांतिकारकांकडून इंग्लंडमध्ये व भारतातही बाँबस्फोट होऊ लागले. सारा देश पुन्हा एकवार प्रस्तापित इंग्रजी राज्याविरूद्ध उठला. बंगाल व महाराष्ट्र हे क्रांतीकारकांचे बालेकिल्ले होते. बंगालांत माणिकतोळा बाँब प्रकरण झाले. खुदीराम बोस, कन्हैयालाल, सत्येन्द्रनाथ बोस इत्यादी क्रांतीकारकांनी फाशी दिले गेले.

स्वतः सावरकर इंग्लंड मध्ये पकडले गेलें भारतात त्यांना आणीत असतांना फ्रान्सच्या किनाऱ्यावर मार्सेलिस बंदराजवळ, त्यांनी शस्त्रधारी सैनिकांच्या पहाऱ्यातून समुद्रांत उडी मारली व किनारा गाठला. फ्रान्स सरकारने त्यांना ब्रिटीशांच्या ताब्यात दिले व त्यांना ५० वर्षे काळ्यापाण्याची शिक्षा झाली.

जे राष्ट्र पारतंत्र्यांत असते ते नेहमीच जागृत असते असे सावरकर म्हणत. लाला हरदयाळ, अय्यर, महंमदअली, शौकतअली, सेनापती बापट, इ. त्यांचे परदेशांतील सहकारी होते.

ह्या असंतोषाचा परिणाम म्हणून ब्रिटीशांनी वंगभंगांचा कायदा रद्द केला व मोर्ले-मिंटो सुधारणा जाहीर केल्या त्यामुळे लोकप्रतिनीधींना विधी-मंडळात प्रवेश मिळाला. येथें स्वातंत्र्याच्या लढाईचे पहिले पर्व संपले पण दुसरे पर्व सुरू होण्यापूर्वी कांही घटना घडतच राहिल्या,

परदेशांत असलेल्या क्रांतीकारकांनी एक उठावाचा प्रयत्न केला. लाला हरदयाल ह्यांचे गदर आंदोलन चालूच होते, कामागाटामारू येथे स्वातंत्र्याची पुन्हा धार चढली व १९१५ च्या फेब्रु २१ ला उठावाची योजना झाली. रासबिहारी बसू १९११ मध्येच एका इंग्रज अधिकाऱ्याचा बळी घेऊन पसार झाले होते, विष्णू गणेश पिंगळे पकडले जाऊन फांसावर चढविले गेले. उठाव दडपला गेला.

१९०८ ते १९१४ पर्यन्त टिळक मंडालेच्या तुरुंगात होते. त्यांना "भारतीय असंतोषाचे जनक" म्हणतात ते जनकत्व त्यांनी सिद्ध केले. राजकीय व राष्ट्रीय जागृतीचे सर्व श्रेय त्यांनाच आहे. संघर्षाची भूमिका त्यांनी सिद्ध केली. संघर्षाची भूमिका त्यांनी घेतली. वंगभंगास विरोध केला. "रौलट ॲक्ट" ला विरोध केला व एका मोठ्या आंदोलनाची पूर्वतयारी "स्वदेशी" चा प्रचार करुन ठेवली.

१९२० साली गांधी युगाला आरंभ झाला. सत्य, अहिंसा व स्वदेशी हे राजकारणातील व्रत म्हणून त्यांनी स्वीकारले. त्याच्या निगर्वी, नि:स्वार्थी, व प्रेमळ स्वभावामुळे सर्वसामान्य जनता त्यांच्याकडे खेचली. कायदेभंग व तुरुंगवासाची दिक्षा त्यांनीच प्रथम समाजाला दिली.

१९३० साली त्यांनी मिठाचा सत्याग्रह केला व तुरुंगवास पत्करला. नको असतील ते कायदे मोडायचे, तुरुंगवास पत्करावयाचा, बाहेर आले की. पुन्हा विधायक कामाची जोड राजकारणांस द्यावयाची, महकारी मिळवावयाचे असे त्यांचे कार्याचे सूत्र होते. हजारोंनी लोक तुरुंगात गेले. खेडोपाडी कार्यकर्ते पसरले व प्रस्थापितांविरुद्ध जाण्याची जिद्द बाळगून संघटन वाढवू लागले.

१९२९ साली "सायमन कमिशन" ब्रिटीश सरकारने नेमले. त्यांत एकही भारतीय सभासद नसल्यामुळे ते नाकारण्यात आले. भगतसिंग, बुटकेश्वर दत्त, चंद्रशेखर आदिनी क्रांतीकारक सशस्त्र चळवळींचा आश्रय घेऊन पुन्हा एकदा दाणादाण उडवून दिली. सॅण्डर्स्टला ठार मारण्यात आले. पार्लमेन्टमध्ये बॉम्ब स्फोट घडवून आणला. सर्वांना पकडून इंग्रजांनी फांशी दिले.

१९२९ ला लाहोरच्या काँग्रेसने पं. नेहरुंच्या अध्यक्षतेखाली "संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव" पास केला. काँग्रेसची पुढील वाटचाल ह्याच दिशेने होत राहिली. सुभाषचंद्र बोसां सारखी आय. सी. एस. झालेली विद्वान माणसे देशभक्तींने प्रेरित होऊन, नोकरीवर लाथ मारून गांधी भोवती जमा होऊ लागली. बुद्धीवंतापासून बहुजनापर्यंत आपले कार्यक्षेत्र विस्तारोत करण्याची, त्यांना स्वातंत्र्य-आंदोलनांत सहभागी करून घेण्याची व त्यागमय जीवनाचे आकर्षण निर्माण करण्याची किमया या देशांत म. गांधीनींच केली. स्त्रियाही बहुसंख्येने राजकारणांत रस घेऊ लागल्या. नलिनी चारी ह्या मुलीने तर चिडून कलेक्टरचाच वध केला.

जनआंदोलनाचा व उठावाचा परिणाम म्हणून ब्रिटिशांनी १९३५ चा कायदा पास केला व सर्व प्रांतात लोक प्रतिनिधिक सरकारे आली.

१९३७ साली दुसरे महायुद्ध सुरु झाले. १५ जानेवारी १९४१ ला ब्रिटीशांच्या तुरुंगातून सुभाषचंद्र बोस पळून गेले व पेशावर मार्गे जपानला जाऊन त्यांनी तेथे रासबिहारी बसूंच्या मदतीने आझाद हिंद सेनेची स्थापना केली. ९ ऑगस्ट १९४२ च्या मुंबई येथील काँग्रेसच्या अधिवेशनांत इंग्रजांनी देश सोडावा असा ठराव मांडावयाचे ठरले. ८ ऑगस्टलाच ब्रिटीश सरकारने सर्व नेत्यांची घरपकड केली. समाजवादी नेते साने गुरुजी, डॉ, लोहिया, अच्युतराव पटवर्धन, अरुणाबाई, एस्. एम्. जोशी आदि अनेक कार्यकर्ते भूमिगत झाले. व त्यांनी ब्रिटीश राज्य उलथविण्याचे प्रयत्न चालू ठेवले. श्री. जयप्रकाश नारायण तेव्हा हजारीबाग तुरुंगात होते. ते तुरुंगातून पळाले व भूमिगत कार्य करु लागले.

१९४२ च्या "चलेजाव" आंदोलनांस "कटेंगे या मरेंगे" असा संदेश म. गांधींनी दिला व जनतेने तो शिरोधार्य मानून हे आंदोलन निष्ठेने व चिकाटीने चालविले.

प्रस्थापितांविरुद्ध जनमानसांत निर्माण झालेला असंतोष, १९४२ ची "चलेजाव" चळवळ, नेताजी सुभाषचंद्रांनी आझाद हिंद सेनेमार्फत आणलेले दडपण, मुंबईला नाविकांचे बंड, वैमानिकांचे बंड ह्या सर्वांमुळे स्वातंत्र्याच्या ह्या आंदोलनास तीव्र स्वरूप प्राप्त झाले.

त्याचवेळी रशिया व अमेरिका इंग्लंडच्या बाजूने दुसऱ्या महायुद्धांत उभे राहिले. रशियाने जर्मन सेनेचा पराभव केला तर अमेरिकेने "अॅटम बॉम्ब" च्या केलेल्या स्फोटामुळे, झालेल्या अवर्णनीय नुकसानीमुळे जपानला शरणांगती पत्करावी लागली व दोस्त राष्ट्रांचा विजय झाला.

इंग्लंडचा विजय झाला असला तरी भारतावर कुठल्याच दृष्टीने प्रभुत्व गाजविण्याची कुवत इंग्लंडमध्ये राहिली नसल्यामुळे त्यांना येथील वसाहतवाद संपविणे भाग पडले.

भारतीयांनी हा स्वातंत्र्य संग्राम १९४७ च्या १५ ऑगस्टला जिंकला पण त्यांना भारताची फाळणी पत्करावी लागली होती.

औद्योगिक क्रांती

अठराव्या शतकाच्या अखेरीस युरोपांत औद्योगिक क्रांती झाली व ह्या औद्योगिक क्रांतीतून एक नवीन अर्थरचना – भांडवलशाही – निर्माण झाली. ही अर्थपद्धती पूर्वीच्या सर्व अर्थपद्धतीहून अगदी वेगळी व नवीन अशी होती. मानवाचा सुरवातीचा काळ हा भटक्या जीवनाचा काळ होता. त्यामुळेच तो असुरक्षित व असंघटित असा होता. ही मानवाची प्राथमिक "साम्यवादी" वा "नैसर्गिक साम्यवादी" स्थिती म्हणता येईल. कळपांनी एकत्र राहावयाचे, शिकारी करून पोटापुरते मिळवायचे, गरजेपुरते घ्यावयाचे व संग्रह करण्याचा प्रश्नच नसल्यामुळे पुढील वाटचालीस सुरवात करावयाची. निसर्गाच्या प्रकोपाला किंवा हिंस्त्रपशुंच्या भुकेस बळी जाणे व नष्ट होणे हा सहज जीवनक्रम होता. नंतर पशुपालनाचा व शेतीचा व्यवसाय सुरु झाला. केवळ निसर्गाने पिकविलेल्या पिकांवर अवलंबून न राहता शेतीतून पिके काढण्याची कला वाढली व समूहजीवन सुरू झाले शेतीवर काम करणारा कामगार व शेतीची मालकी स्वत:कडे राखणारा असा "सरंजामदार" वर्ग अशी सर्वसाधारण वाटणी समाजात झाली. शेतीची मालकी बरीवशी वंशपरंपरेने व काहीशी पराक्रमाने कुटुंबाकडे राहू लागली. स्थायी जीवनक्रम सुरु झाल्यामुळे हस्तव्यवसाय व ग्रामोद्योगही सुरू झाले. छोटछोट्या

नित्याच्या गरजेच्या वस्तू बनविणे व त्या गरजुंना पुरविणे ह्या क्रियेत व्यापारी वर्गनिर्माण झाला तो अनेक वस्तू खरेदी करी व एकत्रितपणे ठिक-ठिकाणी नेऊन विकून त्यावर नफा मिळवी. कांही ठिकाणी ग्रामोद्योग हा विकसति झालेला असला तरी त्या केन्द्रांना स्वावलंबी ग्रामकेन्द्रेच म्हणता येईल, एवढे उत्पादन तोकडे असल्याचे, फार काय आवश्यक तेवढेच उत्पादन करण्याची पद्धत होती. कारण वाहतूक व्यवस्था विकसित झालेली नसल्यामुळे दुसऱ्या भागाशी संबंध प्रस्थापित करणे दुष्कर असे. विनिमयाची पद्धतीही ''वस्तू-विनिमयाची'' होती (एका वस्तूच्या मोबदल्यात दुसरी वस्तू घ्यावयाची). सरंजामशाहीच्या काळांत शेतीवर काम करण्याकरिता मजूर हा ''भूदास'' पद्धतीने उपलब्ध होत असे व भूदासाची वेठबिगारी व गुलाम-गिरी पिढ्यान्‌पिढ्या चालावयाची.

१७६० मध्ये युरोपांत वांफेच्या यंत्रांचा शोध लागला व ह्या यंत्रामुळे उत्पादन पद्धतीत क्रांतिकारक बदल घडून आला. यंत्रे मनुष्यबळापेक्षा अति प्रचंड गतीने उत्पादन करू लागले, त्यामुळे एक नवीन अर्थव्यवस्था जन्मास आली. यंत्राचा मालक व यंत्रावर काम करणारा मजूर हे दोन वर्ग स्पष्टपणे समाजात निर्माण झाले.

पिढ्यान्‌पिढ्या वेठबिगार करणारा, गुलामगिरी व दास्यत्वांत सरंजामदाराकडे राबणाऱ्या गुलामास आपली गुलामी नष्ट करण्याची ही मोठी पर्वणी वाटली व हा कामगार आपले शेतीवरील काम सोडून स्वतंत्र बनण्याच्या ईर्षेने, शहरात एकवटलेल्या यांत्रिक उद्योगधंद्याकडे आकर्षिला गेला व तेथे कामगार म्हणून काम करु लागला.

१७६० मध्ये इंग्लंडमध्ये सुरु झालेल्या ह्या औद्योगिक क्रांतीने १८३० पर्यन्त सर्व युरोप व्यापला व जुनी समाजव्यवस्था, जुनी अर्थव्यवस्था कोलमडून एका नवीन युगाचा जन्म झाला.

औद्योगिक क्रांतीचे प्रवर्तक म्हणून इंग्लंडचा विशेषत्वाने उल्लेख करावा लागेल युरोप खंडात इंग्लंडचा मनुष्य हा प्रबोधनाच्या (Renesans) प्रभावामुळे जास्त विचारप्रवण ठरला. ऐतिहासिक घटनांचा मागोवा घेऊन

त्यानेच प्रथम व्यक्तिस्वातंत्र्यास मान्यता दिली व त्याचा पुरस्कार केला. त्याने केलेल्या व्यक्ति स्वातंत्र्याच्या पुरस्कारामुळे सरंजामशाहीतले जुने दास्यत्व सहाजिकच गळून पडले वा नष्ट होण्याच्या मागे लागले. प्रत्यक्ष इंग्लंडमध्ये कोळसा व लोखंड विपुल प्रमाणात सापडल्यामुळे नवीन यंत्रे तयार करण्यात, ती चालविण्यांत व उत्पादनवाढींचा विक्रम गाठण्यास इंग्लंडला निसर्गाची फार मोठी साथ मिळाली, हे ही मान्य करावे लागेल. लवकरच यंत्राने चालणारा "धोटा" तयार झाला व कापडाच्या यांत्रिक उत्पादनाने जगाचे डोळे दिपविले.

वाढत्या उत्पादन प्रक्रियेमुळे दोन गोष्टी स्पष्टपणे निर्माण झाल्या. एक कारखाना टाकणारा, त्यांत भांडवल गुंतविणारा भांडवलदार च आपले श्रम विकणारा, कामगार. भांडवलदार जास्तीतजास्त नफा मिळवण्याच्या प्रयत्नांत कमितकमी किंमतीत कामगारांचे श्रम विकत घेण्याचा प्रयत्न करू लागला व येथेच भांडवलदार व कामगार संघर्षास सुरवात झाली.

उत्पादन वाढ करून भागत नाही. झालेले उत्पादन खपविता आले पाहिजे – विकले गेले पाहिजे तरच नफा मिळवू शकतो. म्हणून जागतिक बाजारपेठांची निर्मिती झाली. दलणवळणाची साधने वाढली. विनीमय पद्धती पैशाच्या रुपाने सुरू झाली. जसजसा इतर राष्ट्रांचा औद्योगिक विकास होऊ लागला तसतशी नवीन यंत्राची गरज भासू लागली – ती निर्माण होऊन बाजारपेठा आपल्या ताब्यांत असाव्यात असा प्रयत्न भांडवलदाराचे वतीने, त्यांचे देश करू लागली व ह्या विचारातूनच राष्ट्रीयतेच्या भावनेचा विकास होत गेला. मागास देशांना आपल्या बाजारपेठा करण्याच्या इच्छेने "वसाहती" व वसाहतवाद जन्मास आला.

भांडवलदार उत्पादन वाढवितो तो नफ्याच्या प्रेरणेने. हा मिळालेला नफा तो भांडवलाच्या रुपाने नवीन उद्योगांत गुंतवतो म्हणजेच हा भांडवलदार आपल्या उद्योगामुळे जास्त श्रीमंत होत जातो पण त्या उद्योगसमूहांत काम करणारा कामगार हा आर्थिक दृष्टीने उपेक्षितच राहतो. त्यामुळ एकीकडे वरचेवर श्रीमंत होणारा मूठभर भांडवलदार वर्ग व दुसरीकडे दरिद्रीरेषेच्या

आसपास वावरणारा मोठा श्रमिक वर्ग असे विषम चित्र सर्व युरोपभर निर्माण होत गेले

यांत्रिक प्रगतीच्या दृष्टीने विचार केल्यास, भांडवलशाहीने उत्पादनाचा प्रश्न सोडवला असे म्हणावे लागेल. भांडवलदाराच्या औद्योगिक धाडसाची व कल्पकतेची मार्क्सनेही प्रशंसा केली आहे. कम्युनिस्ट जाहीर नाम्यात त्याने म्हटले आहे, " केवळ एका शतकाच्या कालावधीत भांडवलदारवर्गाने प्रचंड प्रमाणांत उत्पादन शक्ती निर्माण केली. त्या पूर्वीच्या अनेक पिढ्यांच्या एकत्रित उत्पादन शक्तीपेक्षा ही नवी शक्ती अनेकपटींनी अधिक आहे. भांडवल खर्ची घालण्याचा धोका पत्करून या वर्गाने उत्पादन कार्याला मोठी गती निर्माण करुन दिली आहे.

औद्योगिकरणामुळे उत्पादन वाढले, उत्पादन वाढल्यामुळे त्या देशातील भांडवल वाढले, पर्यायाने तो देश श्रीमंत होत चालला. त्यामुळे औद्योगिकरणाची ईर्षा निर्माण झाली व देशाला श्रीमंत बनविण्याच्या वर्गाच्या हिताचे संबंध राजकारणात उमटू लागले. राजकारण हे भांडवलदारांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांच्या हितांचे कायदे करू लागले. भांडवलशाहीने राजकारणाचा ताबा घेतला.

ॲडम-स्मिथ सारख्या अनेक अर्थ-तज्ज्ञांनी ह्या अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला व भांडवलदाराच्या भांडवल संचयाला एक उदात्त स्वरुप दिले. त्याचा परिणाम देशातील मोजके भांडवलदार आता श्रीमंत होण्यावर झाला. राजकारणावरही त्याचाच वरचष्मा राहू लागला व कामगार म्हणून जगणारी साठ टक्के जनता उपेक्षित व दरिद्री जीवन जगू लागली.

नवीन बाजारपेठा मिळविण्याकरिता भांडवलदारांत जेव्हा स्पर्धा निर्माण झाली तेव्हा त्या त्या देशातल्या सत्ताधारींनी त्यांचा प्रश्न सुकर बनविण्यास मदत केली. मालाच्या वाहतुकीकरितां रस्ते व साधने यांची सोय करण्यात आली त्यामुळे व्यापार हा फक्त एका राष्ट्रापुरताच मर्यादित न राहता दुसऱ्या देशाशीही व्यापारी संबंध प्रस्थापित करु लागला. एका दृष्टीने हा व्यापार आंतरदेशीय आंतरराष्ट्रीय स्वरुपाचा झाला.

शहरांत वाढलल्या औद्योगिकरणामुळे, अनेक कामगार एकत्र राहू लागले. एकत्र राहण्यामुळे व समान सुखदु:खाच्या भागीदारीमुळे ते एकाच वर्गाचे म्हणून राहिले. इतर धार्मिक, वांशिक, जातीय असले तरी अंतर्भेद येथें लोप पावले व एक नवीन संस्कृती जन्म घेऊ लागली.

वस्तू-विनिमयाची पद्धत बाद झाली व सर्व व्यवहार पैशाच्या माध्यमातून होऊ लागला. "पैसा" हा महत्त्वाचा घटक ठरला व सर्व गोष्टीचे मोजमाप पैशाच्या संदर्भात होऊ लागले.

भांडवलशाही ही एक नवीन अर्थव्यवस्था उदयास आल्यामुळे व भांडवलदारांना आंतरदेशीय संबंध ठेवणे आवश्यक झाल्यामुळे निरनिराळ्या उद्योगांचे एका नवीन पद्धतीने संघटन सुरू झाले. मालाच्या किंमती व नफ्याचे प्रमाण टिकविण्याकरिता भांडवलदारांना हे करणे आवश्यकच झाले. "कारखाना" पद्धती अंमलात येऊ लागली व निरनिराळ्या वस्तू बनविणारे निरनिराळे कारखाने, अशा निरनिराळ्या कारखान्यांचे उद्योग समूह, त्यांना कच्चा माल पुरविण्यांकरिता लागणाऱ्या वसाहती असा एक जगभर पसरणारा दुवाच निर्माण झाला.

उत्पादन खर्चात बचत करून भांडवलदारांनी प्रचंड नफा मिळवायला सुरवांत केली व प्रचंड नफा मिळविण्याच्या प्रेरणेतुनच अत्त्यंतिक व्यक्तिवादाची वाढ झाली. भांडवलदारास "नफा" मिळविणे हीच एकमेव प्रेरणा राहिली. देश-राष्ट्र-जनता इ, गोष्टी त्यांच्या दृष्टीने तुच्छ ठरल्या.

नफ्याच्या प्रेरणेनें कृत्रिम टंचाईही भांडवलदारांना निर्माण करावी लागली व त्यामुळे कामगारात बेकारी पसरु लागली त्यांना पुन्हा शेतावर जाणे अशक्य झाले. काम मिळण्याची वाट पहात बसणे व भांडवलदाराच्या मर्जीवर जगणे, हा एकच पर्याय त्यांच्यापुढे राहिला आणि येथेच कामगार चळवळींचा उगम झाला. कामगारांनीही संघटीत होऊन शासनावर व भांडवलदारांवर जेंव्हा दबाव आणले तेव्हांच त्यांच्या मागण्या कांही असू शकतात हे लक्षांत आले व पुढे चालून शासनास कामगारांच्या कल्याणाकरिता निरनिराळे कायदे करणे भाग पडले.

●●●

फॅसिझम

फॅसिझम हा राज्य करण्याचा एक हुकूमशाही प्रकार आहे, वरून जिला तत्त्वज्ञानाचा कितीही मुलामा दिलेला असला तरी ती एक राज्य कारभाराची क्रूर, अमानुष व संघटीत व्यवस्था आहे. फॅशिओ हे एक हत्याराचे नांव आहे. परशूसारखे हे हत्यार एका लांब काठीस लावलेले असते. इटलीत अधिकारी व जमीनदारांनाच हे हत्यार बाळगण्याची परवानगी असे. अर्थातच ते सामान्य व दलित माणसाविरुद्ध वापरतां येईल, ह्या प्रवृत्तीचेच फॅशिओ-फॅशिस्मो-फॅसिझम् असे नामाधिकरण नंतर झाले.

जगांत लोकशाही व हुकूमशाही ह्यांचा झगडा फार जुना आहे. लोकशाही सुसंस्कृत मनाचा, नैतिक पाउबळ असलेला एक आविष्कार आहे. तर फॅसिझम हो एक पशुवत् प्रवृत्ती आहे, हे तिच्या परिणामावरून सहज दिसून येते.

फॅसिझमचा उदय पहिल्या महायुद्धानंतर १९१९ साली प्रथम इटलीत झाला. इटलीत मुसोलिनी व नंतर जर्मनीत हिटलर हे फॅसिस्ट राज्यवृत्तीचे

प्रवर्तक होते. त्यांचे अनुकरण पुढे सालाझार ह्या पोर्तुगाल नेत्याने व स्पेनच्या जनरल फ्रॅन्कोने केले. ह्या सर्व राजवटी आज इतिहासजमा झाल्या आहेत व त्यांचे स्मरणही फारसे सुखद नाही.

पहिल्या महायुद्धांत फ्रान्स व इंग्लंडने जर्मन व इटलीचे फार नुकसार केले होते. जर्मनीचे तुकडे पडले. राजकीय अस्थिरता निर्माण झाली. इटालीत साम्यवादी मंडळे जोर करू लागली. पार्लमेन्टची राज्यपद्धती मोडकळीस आली. आर्थिक दृष्टीने लोक हलाखीची परिस्थिती जगत होते. कामाचा अभाव, बेंकारी व महागाई ह्यांनी जनता त्रस्त झाली होती.

राजकीय व आर्थिक अस्थिरता राष्ट्रांत निर्माण झाल्यावर जनता, अगतिक होणे स्वाभाविकच आहे. अशा परिस्थितीत दिलासा देण्याचे आश्वासन कोणी दिले तरी लोक आशेने त्यांच्या भोंवती जमा होतात. मुसोलिनी व हिटलर ह्यांचा राजकारणांत प्रवेश नेमक्या, ह्या राष्ट्राच्या अवनत व अस्थिर परिस्थितीच्या काळांत झाला. दोघांनीही जनतेला भावनात्मक आव्हान केले व जनतेनेही त्यांना चांगला प्रतिसाद दिला. थोडे दिवस राष्ट्र भरभराटीस आल्यासारखेही वाटले म्हणूनच ह्यांची राज्य करण्याची पद्धत पहाण्यासारखी आहे.

भावनात्मक आव्हान देणाऱ्यांना तत्वज्ञानाचा आधार घेऊन उभे राहावे लागते. जनतेला आकर्षित करण्याचे ते एक मोठे साधन असते. स्वत:च्या श्रेष्ठतेचा अहंकार फुलवण्याचे व जोपासण्याचे काम करावयाचे असते. ह्या दोघांनीही हे तत्त्वज्ञानाचे आधार नित्शे व हेगेल ह्यांपासून घेतले. नित्शेचे म्हणने "विषमता सर्व ठिकाणी भरलेली आहे. निसर्गात आहे, मानवात आहे. ह्यात जो श्रेष्ठ तो टिकतो व त्यासच निसर्गाने राज्य करण्याचा अधिकार दिलेला असतो." नित्शेच्या तत्वज्ञानाचा आधार घेऊन मुसोलिनीने आपली बाजू मजबूत केली. तो म्हणे – "पूर्व-पश्चिम युरोप, आफ्रिका, आशिया ह्यांच्या उद्धाराचे काम इश्वराने मजवर सोपविले आहे. शांतता हे भित्र्या माणसांचे आकर्षण आहे. माणसाने बंडखोर असावे. युद्धे करावीत, युद्धे जिंकावीत व पुरुषार्थ करावा.

हिटलर ने नित्शेचाच आधार घेऊन आर्यवंशाचे श्रेष्ठत्व प्रतिपादन केले. हिटलर स्वत:ला आर्य समजत असे व आर्यानाच राज्य करण्याचा अधिकार आहे असे त्याचे म्हणणे होते. म्हणूनच जर्मनीत फक्त "आर्यच" राहावे असे त्याचे म्हणणे होते. अनार्य म्हणजे ज्यू ह्यांना त्यांच्या संघटनेने पद्धतशीरपणे जर्मनीतून हाकलले तरी किंवा त्यांच्या कत्तली केल्या.

हेगेलच्या तत्त्वज्ञानाचा अर्धवट उपयोग दोघांनीही केला. वास्तविक हेगेल हा विवेकवादी विचारवंत होता. त्याच्याच तत्त्वज्ञानाचा धागा घेऊन पुढे "मार्क्सने आपले तत्त्वज्ञान विकसित केले आहे." हेगेल म्हणायचा – "राष्ट्र हे सर्वात मोठे व महत्त्वाचे. राष्ट्राच्या अभ्युदयापुढे बाकीच्या गोष्टी दुय्यम. राष्ट्राचे उत्थान व्हावयाचे असेल तर एकच राजा पाहिजे व सर्वांनी राजास शरण गेले पाहिजे. राष्ट्र हे एकमेव सत्य आहे." नेमक्या एवढ्या भागाचा फायदा हिटलर व मुसोलिनीं दोघांनो घेऊन राष्ट्राकरिता आपण स्वत: व आपल्या भोवती राष्ट्रप्रेमाने प्रेरित झालेली संघटना बांधली. "राष्ट्रप्रेम" ही कल्पना पुढे पुढे फसवी होत जाऊन अंधश्रद्धा व बलाचा वापर ह्यांचाच भाग संघटनेत येत गेला व तो जाणून बुजून वाढविला गेला, प्रोत्साहित केला गेला,

१९२० साली मुसोलिनीने ब्लॅक शर्ट नावाची संघटना स्थापन केली. ही निमलष्करी स्वरुपाची संघटना होती. संघटनेत शिस्त कडकपणाने पाळण्यात येई. अनेक लष्करी अधिकाऱ्यांशी मुसोलिनीने मैत्री केली व त्यांना बलशाली राष्ट्र निर्मितीचे आव्हान केले. त्या काळांत इटलीत जो बजबजपुरी माजली होती ती नाहिशी होऊन एक बलशाली राष्ट्र उदयास येऊ शकले. ह्या कल्पनेने अधिकारी वर्ग व मध्यम वर्ग भारावून गेला. सर्वांनी मुसोलिनीच्या पाठीशी उभे राहण्यास सुरूवात केली. मुसोलिनीनेही त्यांच्या विचारांची दिशा "एक राष्ट्र, एक पक्ष, एक नेता ह्यावर केन्द्रित केली. मुसोलिनी स्वत: केन्द्रस्थानी असल्यामुळे कळत न कळत अनेक अधिकार सूत्रे त्याच्या हातो येऊ लागली, च त्याचे राजकीय वजन व लोकप्रियता वाढत चालली.

जनता आपल्या मागे येत आहे हे ध्यानी येताच मुसोलिनीची सत्ताकांक्षा चाळवली. त्याने ब्लॅक शर्ट ह्या संघटनेच्या मदतीने "मिलान" शहरांवर हल्ला केला. अधिकारी वर्ग, लष्करी प्रशासक ह्यांच्याशी आधीच संधान बांधलेले असल्यामुळे शहर काबीज करण्यास फारसा त्रास पडला नाही. ह्या पहिल्या विजयाने मुसोलिनीचे पारडे जड होण्यास सुरूवात झाली.

नंतर त्याने "रोम" वर स्वारी केली व अशाच प्रकारें रोमवाही तावा घेतला. विशेष असे की, प्रत्येक वेळी मुसोलिनी स्वतः रणांगणापासून दूर संरक्षक जागी बसलेला असे व तेथून सैनिकांना आज्ञा पाठवी. विजय मिळण्याची एकतर त्याला खात्री नसावी किंवा पराभवाच्या वेळी बचाव करण्याचा तो पवित्रा असावा.

रोम ताब्यात घेतल्यावर त्याने पार्लमेन्ट बंद केले. कार्यपालिका, न्यायपालिका आपल्या ताब्यात घेतल्या, कांही तरी नवीन घडतय हे घडू द्या त्यातून स्थिरता लाभेल अशी सर्वसामान्य माणसांना आशा असल्यामुळे त्यांनीही ह्या सत्तांतराल विरोध न करता एक प्रकारे पाठींबाच दिला.

मुसोलिनीने प्रथम वर्तमानपत्रे आपल्या ताब्यात घेतली व आपले व आपल्या पक्षाचे महत्त्व प्रतिपादन करणारे व वाढविणारे लेख, बातम्या प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली. एकच एक गोष्ट सतत कानावर पडत गेल्यामुळे ते सत्यच आहे असा आभास जनतेत निर्माण होतो. तसेच ब्लॅक शर्ट ह्या संघटनेचे झाले. संघटनेची सभासद संख्या भरमसाठ वाढली. एक राष्ट्र एक नेता ह्या भावनेने सर्व राष्ट्रच भारून गेले. संघटनेत नसलेला तो राष्ट्रद्रोही, संघटनेविरुद्ध बोलणारा, लिहणारा तो राष्ट्रद्रोही. अशी सरसकट समजूत प्रसृत झाली व राष्ट्रद्रोह्यांचा समाचार जनताच परभारे घेऊ लागली.

आपली लोकप्रियता पुरेसी वाढली आहे हे लक्षात येताच १९२२ साली आपण लोकशाहीवादी आहोत व लोकशाही सरकार स्थापन करू इच्छितो असे मुसोलिनीने जाहीर केले. ह्या वेळपर्यंत ब्लॅक शर्ट संघटनेची

मुळे समाजात खोलवर गेली होती व साम्यवादी वा समाजवादी विचारांचे लोक एकतर नेस्तनाबूत झाले होते किंवा त्यांची तोंडे तरी बंद झाली होती. त्यामुळे राजकीय अस्थिरता संपून एक नवीन युग अवतरत आहे अशी सर्वसामान्य माणसाची कल्पना होऊन आपल्या नेत्याकरिता व राष्ट्राकरिता वाटेल ते त्याग करावयाची जनतेने तयारी केली.

१९२४ साली मुसोलिनीने निवडणुका घेतल्या व त्यावेळी ब्लॅकशर्ट हीच देशांत एकमेव प्रभावी संघटना असल्यामुळे सर्वत्र ह्याच संघटनेचे लोक निवडून आले व पर्यायाने मुसोलिनी हा त्यांचा प्रमुख म्हणजे सम्राट बनला.

राजकीय अस्थिरता अशाप्रकारे नाहिशी केल्यावर मुसोलिनी देशातील आर्थिक परिस्थिती सुधरणयाचा मागे लागला. त्याने मोठ्या कारखानदारांना, भांडवलदारांना आपलेसे केले व उत्पादन वाढविण्यास सांगितले. थोडयाच काळांत उत्पादनवाढीस सुरुवात झाली पण भांडवलदार कामगारांना नीट मजूरी देत ना, नीट वागवीत ना, योग्य सवलती उपलब्ध करून देत ना, राष्ट्राच्या उत्पादनवाढी बरोबरच भांडवली - नफा जास्तीत जास्त स्वतःच्या खिशांत कसा जाईल हे ते बघू लागले. मुसोलिनीने कारखानदार, कामगार ह्यांच्या निरनिराळ्या संघटना निर्माण केल्या. प्रत्येक ठिकाणी. तो व राष्ट्र हे किती मोठे आहे हे तो भासवी. उत्पादनवाढीशिवाय तरणोपाय नाही हे समाज मनांवर बिंबवी. त्याचा परिणाम व्हायचा तोच झाला. कामगारांना आपली गाऱ्हाणी सत्तेपुढे मांडता आली नाहीत. त्यांची कुचंबणा होऊ लागली. कांही ठिकाणी तो मांडण्याचा प्रयत्न झाला तर त्यांच्या कत्तली झाल्या. राष्ट्रहितापुढे व्यक्ती ही क्षुल्लक, ही भावना सर्वत्र पसरली व हजारो कामगार व विरोधी नेते मारले गेले.

नागरी नेतृत्वाचा प्रभाव जोपर्यन्त लष्करावर असतो तोपर्यन्त ते ताब्यात असते. एकदा का ती प्रभाव कमी झाला की लष्कराच्या गुंडगिरीलाही प्रोत्साहन मिळते व समाजावर अनेक अन्याय लादले जातात.

ब्लॅक शर्ट ह्या सुरुवातीला निमलष्करी व नंतर पूर्ण लष्करी संघटनेचीही हीच परिस्थिती झाली व एका फार मोठ्या दडपणास तोंड

देण्याची समाजावर पाळी आली. हतबल झालेला मनुष्य सुटकेकरिता "देवाची" याचना करतो. तोही मार्ग मुसोलिनीने बंद करून टाकला

मुसोलिनीने "पोप" ची भेट घेतली. राजकीय व आर्थिक अस्थिरता नाहिशी करून एक प्रबल राष्ट्रशक्ती निर्माण करण्याचे आपले स्वप्न त्याने पोपपुढे मांडले. ब्लॅक शर्टची वाढलेली शक्ती, मुसोलिनीचा प्रभाव व विरोधकांचे मोडले गेलेले कंबरडे, हे सर्व समोर दिसत असल्यामुळे "पोप" ने आपली सर्व शक्ती राष्ट्राच्या अभ्युदयाकरिता मुसोलिनीच्या मागे उभी करण्याचे कबूल केले व सर्व चर्चेसना तशा आज्ञा दिल्या.

आता खऱ्या अर्थाने मुसोलिनी सम्राट झाला होता. धर्मशक्ती त्याच्या बाजूने उभी होती. लष्कर त्याचेच होते, कारखानदार भांडवलदार त्याच्या इशाऱ्यावर चालत असत. वर्तमान पत्रांना, मुसोलिनी आणि त्यांच्या संघटनेच्या स्तुतीशिवाय दुसरा विषय लिहिण्यास नव्हता. राजकीय विरोधक खलास झाले होते. ब्लॅक शर्टचा व त्याच्या कडक शिस्तीचा प्रभाव सर्व देशभर पसरला होता. राष्ट्रांतील एकमेव शक्ती मुसोलिनी हीच होती. तोच निर्णय घेणार होता, तोच ते राबविणार होता. तेथे माणसाला माणूस म्हणून राहवयाचे नव्हते, जगायचे तर ब्लॅक शर्ट म्हणून. अशा प्रकारे सत्ता-संस्थाने त्याने आपल्या हाती केन्द्रित केली. मुसोलिनी स्वत:ला 'जहाल समाजवादी' म्हणवून घेत असे.

जर्मनीत १९१९ साली हिटलरचा उदय होऊं लागला होता. त्याने जर्मनीच्या अस्थिर राजकीय व आर्थिक पार्श्वभूमीवर राजकारण प्रवेश केला. १ ल्या महायुद्धांत इंग्रज व फ्रेंचांनी जर्मनीचे विभाजन केलेले होते स्वाभिमानी जर्मन माणसांस ती बाब अपमानास्पद वाटणे स्वाभाविकच होते हिटलरने ह्या अपमानाचा बदला घेण्याची तयारी चालविली. त्याकरितां भावनेने भारलेली जनता त्याला पाहिजे होती. त्याकरिता त्यानेही नित्शे व हेगेल ह्यांचे तत्त्वज्ञान वापरले. बलशाली राष्ट्र निर्माण करण्याकरिता "एक राष्ट्र एक नेता" ही भावना दृढ झाली पाहिजे हे सूत्र त्याने अवलंबिले. "अहंकार" जोपासण्याकरितां आर्यवंशाच्या श्रेष्ठत्वाचा विचार त्याने मांडला

व हळूहळू आपल्या भोंवती कडव्या जर्मनांची फोज उभी करायला सुरुवात केली.

हिटलर हा सामान्य घराण्यांतील होता. पुढारीपण स्वतःकडे घेण्यास त्यास सुरवातीला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. हिंडनबर्ग ह्यांचे सेनेवर वजन होते. तो म्हातारा झाल्यामुळे त्यांचे सैन्यावरील वजन कमी होऊ लागले होते. त्याचा फायदा घेऊन हिटलरने सेनाधिकारी, मुलकी अधिकारी व सर्वसामान्य जनतेचे मन आपल्याकडे वळवले व उठावाचा पहिला प्रयत्न केला.

पण तो फसला व त्याला कैदेत जावे लागले. तो तरुंगांत असतांनाही त्याच्या सोशॅलिस्ट डेमोक्रेट पक्षाचे काम बाहेर चालूच आहे संघटनेतील शिस्त, कडवेपणा, आर्यवंशाचा अहंकार, इतरांबद्दल तुच्छता, असहिष्णुता ह्यांनी जर्मनीचे वातावरण भारून गेले होते.

आपण जनतेचे नेते आहोत व जनता आपल्यामागे आहे हे अशा पुढाऱ्यांना दाखविणे आवश्यक असते. १९३३ साली जर्मनीत निवडणुका झाल्या. निवडणुकांत अनेक गैरप्रकार करून हिटलर व त्याचा पक्ष सोशॅलिस्ट डेमोक्रेट ह्यांनी निवडून येऊन सत्ता आपल्या हाती घेतली.

निवडून आल्याबरोबर सर्व सत्ता आपल्या हाती कायमची राहील अशा प्रकारची घटना दुरुस्ती त्याने करून घेतली. लोकनियुक्त सरकारचा तो घटनासिद्ध प्रमुख झाला.

जगावर राज्य करण्याचा अधिकार फक्त 'आर्या' लाच आहे हा हा इतिहास वंशपरंपरागत असून अल्पसंख्यकाने घडविला आहे. त्याकरितां "आर्यांना" जवळ केले पाहिजे व अनार्य म्हणजे 'ज्यू' हे राष्ट्रद्रोही असल्यामुळे त्यांचा उच्छेद केला पाहिजे हा सिद्धान्त त्याने मांडून अत्यंत क्रूरतेने त्याची कार्यवाही सुरू केली. त्याचा कोणावरही विश्वास नव्हता. सर्व निर्णय तो स्वतःच घेत असे. रशियन सैन्याने दुसऱ्या महायुद्धात जर्मन सैन्य कापावयास सुरवात केली तरी, सैनिकी अधिकाऱ्याच्या सूचनेला डावलून

मराठी ग्रंथ संग्रहालय पुणे
३१५५
दि. २५/६/९३

युद्ध चालूच ठेवण्याचा निर्णय त्याने घेतला व अंततः जर्मनीस दुसऱ्या महायुद्धांत एक भयानक पराभव पत्करावा लागला. हिटलर व मुसोलिनीचे पक्ष तत्त्वज्ञान व राज्य नष्ट झाले. त्याचे भयानक परिणाम अजूनही अंगावर शहारे आणत आहेत. दोन्ही राजवटीचे मूल्यमापन एकाच पद्धतीने करता येईल.

फॅसिझमचे अधिष्ठान अहंकार हे आहे. हा अहंकार एखाद्या व्यक्तीत, वर्गात वा राष्ट्रात असूं शकतो. अहंकारचे आव्हान हे नेहमीच भावना चेतविणारे आव्हान असते. युद्धामुळे वा अंतर्गत यादवीमुळे राष्ट्रे मोडकळीस येतात. आर्थिक व राजकीय अस्थिरता निर्माण होते. अशा परिस्थितीत थोडेसे कर्तृत्व अंगी असलेले पण अहंकाराने प्रेरित व सत्ता जोपासण्याकरितां करुं लागते.

मुसोलिनी व हिटलरचा उदय त्या त्या राष्ट्राच्या हालाखीच्या परिस्थितीत झालेला आहे. जगांतले इतरही छोटे मोठे हुकुमशहा असल्यास परिस्थितीचा फायदा घेऊन पुढे येतात. मुसोलिनीने स्वतःला, पश्चिम युरोप आफ्रिका व आशिया ह्यांच्या उद्धाराचे काम ईश्वराने सोपविलेला प्रेषित मानले तर हिटलर आर्यवंशाचा सिद्धान्त घेऊन पुढे आला. अगतिक झालेल्या प्रजेला भावनिक आव्हानाची भुरळ पडते. त्याप्रमाणे दोघांनाही भरपूर अनुयायी मिळाले. भावनिक आव्हान बुद्धीचा नाश करूं शकते हे दोघांच्याही लक्षांत आले नाही.

आपण एका स्थिर व जगन्मान्य तत्त्वज्ञानावर उभे आहोत असा आभास दोघांनाही निर्माण करणे अपरिहार्य झाले त्यांनी नित्शे, हेगेल (व जोनील) ह्यांच्या तत्त्वज्ञानाचा आधार घेतला. दोघेही तत्त्वज्ञ प्राचीन असल्यामुळे पारंपरिक संस्कारांची झूल त्यांना आपल्या कृत्यांवर घालता आली.

हुकूमशहा हा नेहमी स्वतःला लोकशाहीवादी म्हणत असतो. तो लोकांमधून आलेला, लोकांकरितां जगणारा असतो अशी जनतेची कल्पना

झाल्याशिवाय त्यांना पाठिंबा मिळत नाही. मुसोलिनी स्वत:ला "जहाल समाजवादी" म्हणवून घेई तर हिटलर ही सोशल डेमोक्रॅट होता.

राजकीय अस्थिरता नाहीसी करण्याकरितां हुकुमशहांना शिस्त हवी असते, म्हणूनच त्यांनी निर्माण केलेल्या संघटना ह्या निमलष्करी संघटना असतात. एक चालकानुवर्ती राष्ट्रीयत्व हे तत्त्व अनुयायांचे मनावर बिंबविले जाते. त्यामुळे आपल्यापेक्षां नित्शेचे मत मांडणारा वा निराळ्या पद्धतीने विचार करणारा हा द्रोहीच आहे अशी भावना निर्माण होऊन अशांना शिक्षा करण्यापासून तो कत्तली करण्यापर्यन्त सर्व प्रकार राष्ट्राच्या अभ्युदयाच्या नांवाने चालू असतात. एकदां रुजलेली ही असहिष्णुता फोफावूं लागते.

हिटलरने लाखो ज्यूंना मारल्याचा इतिहास ताजा आहे, मुसोलिनीने अनेक कामगारांना व त्यांच्या विरूद्ध मत मांडणाऱ्या राजकीय कार्यकर्त्यांच्या कत्तली केल्या आहेत. रशियासारख्या कम्युनिस्ट हुकूमशाही राज्यांतही विसाव्या शतकांत हे प्रकार घडलेले आपण पाहतो.

सर्वसामान्य माणसाला हे धर्माचे आकर्षण असतेच. धर्म आपल्यामागे उभा आहे. हे दाखविण्याचा प्रयत्न मुसोलिनी व हिटलरने केला आहे. मुसोलिनी पोपलाच भेटला आहे व पोपकडून त्याने त्याच्या कर्तृत्वास मान्यता घेतली आहे. हिटलर हा येशूस पहिला आर्य समजत असे. ह्या समजुतीचा प्रचार झाल्यामुळे सर्वसामान्य माणसांस ह्या हुकूमशहाबद्दलही आदराची भावना निर्माण होण्यास मदत होते.

हुकुमशहा हा कायदेशीर मार्गानेच सर्व सत्ता काबीज करीत असतो. मुसोलिनीने निवडणुका घेऊनच स्वत:ला सर्वोच्चपदी निवडून घेतले. हिटलरची नियुक्ती ही निवडणुकीनेच झाली आहे. निवडून आल्यावर घटना दुरुस्ती हे पहिले काम हाती घेतात. आपणांस पूरक व आवश्यक तेवढी कलमे ठेवायची व बाकी बदलून घ्यावयाची वा काढून टाकावयाची. त्यामुळे घटनेने ह्यांना सुरक्षितता मिळते.

हयांचे दुसरे काम वर्तमानपत्रांवर नियंत्रण आणणे. हयांचेच विचार, बातम्या, दौरे, कार्यक्रम, लेखन इ. वर्तमानपत्रांत सतत येत असते. विरोधी विचाराला ते थारा देत नाहीत त्यामुळे जनमानसांवर एकच एक गोष्ट ठसविण्याचे काम चालू राहते.

मोठे अधिकारी व भांडवलदार व कारखानदारांवर हया हुकुमशहांचो विशेष भिस्त असते त्यामुळे उत्पादनाचा वेग वाढतो. शासनांतील शिथिलता कमी होते व आपले विचार व कार्यक्रम जनतेपर्यन्त पोहचविण्यात त्यांना सोयीचे जाते सर्वसामान्य माणसाला विरोध नोंदविण्यास व दाखविण्यास संधीच मिळत नाही. कोणी असा प्रयत्न केल्यास त्याला जीवनांतून उठविणे फार सोपे असते. कारण मोठे अधिकारी व लष्कर हयांच्याच हातांत असते. उत्पादन वाढविण्याच्या कार्यक्रमांत भांडवलदारांनी लाखो रुपयांचा नफा मिळविला, कामगारांचे अत्यंत हाल केले पण कामगारांना आपली दुखणी मांडता आली नाहीत. ज्यांनी मांडण्याचा प्रयत्न केला त्यांच्या कत्तली झाल्या.

"एक राष्ट्र, एक विचार, एक नेता" हयांचा पुरस्कार व अवलंब हुकूमशहा नेहमी करीत असतो. त्यामुळेच कांही काळ सर्व मतमतांतरे नाहीशो होऊन एकप्रकारची एकात्मता निर्माण झालेली दिसते, सर्वत्र शांतता जाणवते, पण हीच शांतता धोक्याची असते.

कारण सत्तेच्या केन्द्रीकरणाचा अनिवार्य परिणाम म्हणून युद्धखोरी, विस्तारवाद व साम्राज्यवाद हा वाढीस लागतात. भांडवलदार शिस्तीच्या नांवाखाली कामगारांचे शोषण भयानक प्रमाणांत करीत असतात, तर राष्ट्रीय अस्मितेच्या नांवाखाली विरोधी विचार दडपला जातो व फार मोठा शोषित वर्ग निर्माण होतो.

हयाचाच परिणाम म्हणजे हुकूमशाही राजवट ही शोषितांच्या दुःखांमुळे, त्यांच्यावरील अन्यायामुळे आतून कमकुवत होऊ लागते. एकच निर्णय सर्वांना सर्वकाळी योग्य वाटण्यासारखे नसतात वैयक्तिक स्वार्थाने लडबडलेले व अनेकवेळा मूर्खपणाचे असतात, म्हणून अधिकारीवर्गाचा व जनतेचाही त्यावरील विश्वास कमी होऊ लागतो. आपले मत मांडण्याचा अधिकार

नाहीसा झाला आहे. हे बुद्धिमंतांच्या लक्षांत येऊन त्यांच्यांत असंतोष धुमसू लागतो.

अशाप्रकारे हुकूमशहांना मिळालेला जनतेचा पाठींबा हळूहळू त्यांच्या विरोधांत जातो व सर्वसामान्य माणूस जेव्हा ह्या राजवटीचे मूल्यमापन करु लागतो तेव्हां एक खोटा अहंकार जोपासण्याशिवाय आपण कांहीही मिळविले नाही ही वास्तवता लक्षांत आल्यावर तो अधिक दुबळा, अधिक विषण्ण व अधिक निराश होतो.

जगात असे हुकूमशहा प्रत्यही निर्माण होत असतात. साम्यवादी हुकूमशाही किंवा डॉलरची हुकूमशाही हा त्यांतलाच एक प्रकार आहे त्यांचा शेवट हाही ठरलेलाच असतो. इतिहासाचे भान एवढ्याकरितां ठेवावयाचे असते.

●●●

भांडवलशाही अर्थव्यवस्था

युरोप मध्ये अठराव्या शतकाच्या सुरूवातीला झालेल्या औद्योगिक क्रांतीचा परिणाम म्हणून तेथे जुनी सरंजामशाही अर्थव्यवस्था कोलमडून पडली व तिची जागा भांडवलशाही अर्थव्यवस्थेने घेतली, भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये यंत्र-युगास सुरवात झाली. यंत्राचे सहाय्याने होणारे उत्पादन हे केव्हांही मनुष्य बळाने केलेल्या उत्पादनापेक्षा अनेकपटीने जास्त, चांगल्या प्रतीचे व कमी किंमतीचे असावयाचे. मग ते कापड असो, फाऊंटनपेन असो, पट्टे असो, घड्याळे असो किंवा इतर नित्य लागणारे सामान असो. देशांतर्गत वाढलेल्या उत्पादनामुळे देशांतील भांडवल संचय वाढू लागला व देश हा श्रीमंत होऊ लागला. त्यामुळे सर्व युरोपभरच औद्योगिकरणाची फार मोठी लाट पसरली व युरोप खंडातील सर्वच देश फारच थोड्या काळांत श्रीमंत बनले.

औद्योगिकरणामुळे जगाचे आर्थिक संतुलन बदलले. आफ्रिका व आशिया सारख्या खंडातील अनेक पौर्वात्त्य देशांना ह्या बदलाची कल्पनाही

नव्हती. हयाचा फायदा घेऊन युरोपांतील अनेक देशांनी हया देशावर आपला ताबा मिळविला व तेथे आपल्या वसाहती उभारल्या. ह्या वसाहतीतून हया देशातील कच्चा माल त्यांना आपल्या देशांत नेता येऊ लागला व त्या पासून तयार झालेला पक्का माल विकण्यांकरिता हक्काच्या बाजारपेठाही त्यांना मिळाल्या. अशाप्रकारे वसाहतींचे शोषण करून युरोपीय राष्ट्रे श्रीमंत झाली.

भांडवलदार आपल्या कारखान्यातून जे उत्पादन काढतो ते बाजारांत खपावे व जास्तीत जास्त नफा आपणास मिळावा हीच त्यांची एकमेव प्रेरणा असते. हया वैयक्तिक प्रेरणेमुळे व्यक्तिवाद हा पुढेपुढे अतिरिक्त-व्यक्तिवाद होऊन बसला. सर्वसामान्य माणसांच्या गरजा वा त्यांची खर्च करण्याची कुवत हयाकडे भांडवलदाराला बघावयाचे कांहीच कारण नाही. जास्तीतजास्त नफा देणारे उत्पादन हेच त्यांचे उद्दीष्ट. समजा सर्वसामान्य माणसांना जाडेभरडें कापड नित्य वापरास लागते तर भांडवलदार ते पुरेशा प्रमाणात बनवील असे नाही. कारण ते २-२॥ रुपये वाराने विकणार व त्यावर नफ्याचे प्रमाण अल्प राहणार रेशमी किंवा तत्सम महाग कापड त्याने बनविले तर ते जास्त किंमतीस विकले जाणार व त्याच्यावर नफ्याचे प्रमाण जास्त राहणार, ही बाब लक्षांत घेऊन भांडवलदाराचे लक्ष रेशमी वा तत्सम महाग कापड निर्माण करण्याकडेच असते. स्वतःचा नफा हाच त्याला सर्वसामान्य माणसांच्या गरजेपेक्षा महत्त्वाचा असतो.

अशा प्रकारे बनविलेल्या कापडांस मिळणारे गिऱ्हाईक हेही अर्थात श्रीमंतच असणार. कारण ज्याला ते परवडेल तोच ते घेईल. म्हणजे भांडवलदाराने निर्माण केलेले उत्पादन हे फक्त दहा टक्के लोकांनाच उपयोगी पडणारे वा त्यांच्याच गरजांकडे पाहून केलेले असते, कारण त्यांतच त्याला नफ्यांची प्राप्ती जास्त होत असते.

म्हणूनच भांडवलशाहीत कांही भांडवलदार फार श्रीमंत झाले. किंवा त्या देशातीलही संपत्ती वाढली तरी सर्वसामान्य माणसाचे जीवनमान वाढू शकले नाही. (Poverty in the midest of plenty) श्रीमंत देशामधील

ही एक प्रकारे गरीबीच होय. दुकानांत उत्तमोत्तम कापडांच्या राशी असाव्यात पण ते परवडत नाहीत म्हणून बहुसंख्य जनता थंडी-पावसांत विनाकपड्याचे आयुष्य घालवीत राहाते किंवा दुकानांत उत्तमोत्तम औषधी असावी पण ती न परवडल्यामुळे बहुसंख्य जनता रोगांनी जर्जर व्हावी अशा प्रकारचे विषमतेचे चित्र ह्या भांडवलशाहीमुळे त्या काळांत निर्माण झाले.

भांडवलदाराची स्वत:ची मालकी त्यांच्या धंद्यावर असल्यामुळे कोणत्या मालाचे कारखाने काढावेत, मजूर किती ठेवावेत, कोणाला कामाला लावावे, उत्पादन किती काढावे, किंमती काय ठेवाव्या हे सर्व ठरविणार भांडवलदार, त्यामुळे औद्योगिकरणामुळे भांडवलदारांचा व्यक्तिवाद व मक्तेदारी वाढीस लागली. देशातील संपत्ती भराभर वाढत आहे. हे पाहिल्यामुळे अनेक अर्थतज्ज्ञांनी ह्याच अर्थव्यवस्थेचा त्या काळांत पुरस्कार केला.

उत्पादन बाजारात येऊन ते विकले गेले पाहिजे व ते ग्राहकांना परवडणाऱ्या किमतीत विकले गेले नाही तर भांडवलदाराला नफा मिळणार नाही. त्यामुळे किंमती ठरविणें किंवा स्थिर राखणे ग्राहकांवर अवलंबून आहे असे फसवे तत्त्वज्ञान त्याकाळी पुरस्कारले गेले, पण एखादे उत्पादन जास्त होत आहे व त्याची किंमत कमी होत आहे असे जेव्हां जेव्हां भांडवलदाराच्या लक्षात आले तेव्हां तेव्हां त्याने त्या उत्पादनाचा सांठा केला, ते नष्ट केले किंवा त्या वस्तूचे उत्पादन बंद करून त्यांच्या किंमती खाली येऊं दिलेल्या नाहीत.

उत्पादन बंद करणे म्हणजे कारखाने बंद करणे व कारखाने बंद करणे म्हणजे मजुरांचे काम जाणे ही सरळ गोष्ट आहे. स्वत:च्या वैयक्तिक फायद्याकरितां जेव्हां जेव्हां भांडवलवलदाराने टाळेबंदी पुकारली तेव्हां तेव्हां ह्या कामगारांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळली व दारिद्र्य रेषेवर जीवन जगणाऱ्या कामगारांवर अधिक दुर्धर प्रसंग येत राहिले.

दुसरा असा मुद्दा अर्थ-तज्ज्ञ मांडत गेले कीं, यांत्रिकीकरणाची ही स्पर्धा होऊन आपला माल खपविण्याच्या दृष्टीने भांडवलदारांस मालाच्या किंमती कमी करण्याशिवाय पर्याय राहणार नाही, पण ही परिस्थिती निर्माण

झाली नाही. यांत्रिकीकरणामुळे व औद्योगिकरणामुळे आंतर्देशीय, आंतरराष्ट्रीय संबंध भांडवलदारांचे निर्माण झाले, त्यांतून भांडवलदारांची संघटना, निर्माण झाली. त्यांनी औद्योगिकरणांचे निरनिराळे समूह निर्माण केले व आपल्या उत्पादनांची बाजारपेठांत किंमत कमी होणार नाही अशी व्यवस्था करून ठेवली. भांडवलदार जसा संघटीत होऊं शकतो तसा ग्राहक होंऊ शकत नाही. त्यामुळे उत्पादित वस्तूंच्या किंमतीवर तो नियंत्रण ठेवूंच शकत नाही, ते नियंत्रण भांडवलदारच ठेवूं शकतो हे सिद्ध झाले.

भांडवलशाहीमुळे काही फायदेही झाले. देशांतर्गत अर्थव्यवस्था सुधारूं लागली त्यानिमित्ताने, वाहतुकीची सोय, साधने, जीवनोपयोगी अनेक गोष्टींची निर्मिती होऊन मूठभर लोकांचे कां होईना जीवनमान सुधारूं लागले, त्यामुळे भांडवलदारांचे वजन वाढले व ते आपल्या गरजेप्रमाणे सरकारांत हस्तक्षेप करुं लागले. आपणास हितकारक होतील असे कायदे बनवून घेणे, हितकारक होईल त्या पद्धतीने आपल्या देशाचे दुसऱ्या देशाशी संबंध राखणे आपल्याला मदत करतील ती माणसे सरकारात सत्तेवर राखणे हे त्यांना सहज शक्य झाले. त्यामुळे देशांतील आर्थिक व्यवस्थेबरोबरच सरकारी हस्तक्षेपामुळे त्यांच्या उद्योग-समूहांत होणारे उत्पादन हे सर्वसामान्य लोकांच्या गरजांकरितां उत्पादन न राहतां ते बाजारपेठांकरितां उत्पादन होऊन बसले.

एखादा मोठा कारखाना किंवा उद्योग समूह जेव्हां अस्तित्वात येतो तेव्हा त्याला पूरक असे छोटे उद्योग हे उभारावे लागतात. उदा: माल पुरविण्याकरितां, कापसाची लागवड करणारी शेती, कापसापासून सरकी निराळी करून त्याच्या गाठी बांधण्याचा जिनींग व प्रेसींग कारखाना, त्या कापसाचे निरनिराळ्या जाडीचे सूत तयार करणारी, सूत गिरणी व सूत रंगविणारा रंग-काम विभाग ह्यांची आवश्यकता असते. शिवाय प्रत्यक्ष कापड तयार झाल्यावर त्याला लावण्याकरितां लेबले किंवा गुंडाळण्याकरितां विशिष्ट प्रकारचा पुठ्ठा व कागद लागतो, म्हणजे कापड गिरणीकरितां जेवढे निरनिराळे उद्योग उभे राहूं शकतात; तेवढ्या जास्त लोकांना धंदा – उद्योग मिळतो, व पर्यायाने समाजाच्या आर्थिक गरजांची पूर्ती होते.

मोठा मासा लहान माशाला खाऊन टाकतो तसा मोठा उद्योगपती छोटे धंदे आपल्याकरितां, आपल्या इच्छेप्रमाणे राबवूं शकतो. भांडवलशाहीच्या प्राथमिक अवस्थांत हे प्रकार नित्यशः होत; त्यामुळे छोटे उद्योगधंदे फारसे नफा देणारे ठरत नसत.

उत्पादन तयार झाल्यानंतर ते वितरणाकरितां देणे आवश्यक असते. त्यामुळे उत्पादन-वितरण हा एक स्वयंपूर्ण भाग होऊन बसतो. योग्य प्रकारे व योग्य ठिकाणी वितरण झालेल्या मालाला किंमत चांगली येते व 'जास्तीत जास्त नफा' हे अंतिम ध्येय असल्यामुळे वितरण व्यवस्था जास्तीत जास्त चांगली होणे असते हचा वितरण व्यवस्थेतून उपभोक्ता व उत्पादक ह्यांच्या येणाऱ्या संबंधामुळे व सामूहिक गरजांच्या विचारामुळे किंमती निश्चत होण्यास मदत होते.

भांडवलशाहीचा विकास झाल्यामुळे व्यक्ति-स्वांतंत्र्य विकसीत होत गेले, आर्थिक स्वातंत्र्यास मान्यता मिळाली व व्यक्ति-विकास त्यामुळे होत गेला. कामगारांना त्यांच्या कुवतीप्रमाणे काम व त्यांनी केलेल्या कामाप्रमाणे त्यांना दाम मिळू लागले. भांडवलदार वर्ग श्रीमंत होत गेला, उत्पादन वाढीमुळे देशांतर्गत संपत्ती वाढून देशही श्रीमंत होत गेला. सरंजामशाहीतील गुलामगिरीतून व वेठबिगारीतून फार मोठ्या समाजाची सुटका झाली.

हे झाले असले तरी, फार मोठी सामाजिक विषमता निर्माण झाली. भांडवलाचे क्षेत्रीय असंतुलन निर्माण झाले ज्या ठिकाणी उद्योगधंदा वाढले त्या भागांतील जनतेची आर्थिक परिस्थिती थोडी सुधारली. ज्या ठिकाणी भांडवलदारांना कच्चा माल उपलब्ध होत असे, वहातुकीच्या पुरेशा सोयी तेथेच त्यांनी उद्योगसमूह स्थापन केले त्यामुळे औद्योगिकरण न झालेला भाग हा तुलनेने अति अप्रगत मागासलेला असा राहिला. राष्ट्रीय संपत्तीचा वापरही सार्वजनिक हिताचा विचार करून न होता, भांडवलदारांच्या सोयी पाहून केला गेला व त्यामुळे विषमता वाढण्यास मदतच झाली.

भांडवलदारांच्या धोरणामुळे बेकारी वाढीस लागली. ह्या स्थितीतून जात असतां कामगार संघटित होत गेला. जसजसा कामगार संघटित होत

गेला तस तसा शासनावर व भांडवलदारांवर तो दबाव आणू शकला. त्याभुळे पुढे चालून कांही कायदे शासनाने कामगारांच्या हिताचे केले. मजुरीचे दर व तास बांधून दिले, श्रेण्या ठरविल्या, पगारी सुट्टीचे दिवस, आजारी सुट्टी इ. किमान सवलती मान्य केल्या, त्याचे राहणीमान सुधारण्याकरितां कामगारांच्या वसाहती स्थापन केल्या, त्यांच्या कुटुंबियांच्या शिक्षणाची सोय केली व त्यांच्या विकासाची जबाबदारी शासनाने स्वीकारली.

त्यामुळेच पूर्वीची भांडवलशाही राष्ट्रे (इंग्लंड, अमेरिका) आज "कल्याणकारी" राष्ट्रे झाली आहेत व कामगारांचे जीवनमान तेथे उंचावले गेले आहे – त्यांना विकासाची संधी उपलब्ध करुन दिली जात आहे.

भांडवलशाही देशांत आज खऱ्या अर्थाने भांडवलशाही अर्थव्यवस्था राहीली नसून ती "मुक्त अर्थव्यवस्था" झाली आहे.

भांडवलदार आपले भांडवल एखाद्या उद्योगधंद्यांत गुंतवितो. त्या उद्योगांतून होणारे उत्पादन बाजारांत विकले जाते. ते उत्पादन विकून जो पैसा मिळतो. त्यातून तो आपला खर्च करतो व त्याशिवाय जो पैसा शिल्लक राहतो तो निव्वळ नफा तो पुन्हां उद्योगांत गुंजविला जातो व अशा प्रकारे जास्त पैसा उद्योगांत गुंतवला गेल्यामुळे उत्पादन वाढते अशा प्रकारे दरवर्षी त्याचा भांडवल संचय वाढत जातो. भांडवल संचय वाढविण्यास इतरही बाबी कारणीभूत ठरतात. त्या देशाच्या वसाहती तेथे असतील तेथून कच्च्या मालाचा पुरवठा कमी दामांत केला जातो किंवा त्याला आवश्यक त्या बाबी वीज, पाणी, वाहतुकीची साधने, व्यापाराच्या सवलती इ. व्यवस्था देश करून देते व भांडवल संचयास मदत करते. औद्योगिक देशांत विनीमयाचे साधन पैसा हेच असते. त्यामुळे पैसा देऊन कच्चा माल विकत घेणे व त्यावर प्रक्रिया करून तो नफा नफा घेऊन विकणे आवर्तन चालू असते.

एखाद्या वस्तूचे मूल्य त्याला निर्माण करण्यास लागणाऱ्या श्रमावर अवलंबून असते. जो ज्या प्रमाणात श्रम करतो त्या प्रमाणांत वस्तुमूल्य वाढते पण श्रमाचा मोबदला पूर्णपणे भांडवलदार देत नाही. ह्यालाच भांडवलदार श्रमाची चोरी करतो असे म्हणतात. शिवाय एखादी वस्तू वापरण्याकरितां ती ग्राहकाला परवडणे आवश्यक असते, ह्यास त्या वस्तूचे उपभोग मूल्य

म्हणता येईल. (Value in Use) पण बाजारांत वस्तूचे विनीमय मूल्य (Value in Exchange) हे उपभोग मूल्यापेक्षां सर्वसाधारणपणे जास्त असते. हा सर्व वाढीव नफा भांडवलदारांच्याच खिशांत जातो व त्याचा भांडवल संचय वाढत जातो.

वाढता भाडवलाचा संचय हा नेहमी स्पर्धेस जन्म देतो व स्पर्धा करण्याकरितां नवनवीन, थोडक्या माणूस बळांत जास्त उत्पादन करूं शकणाऱ्या यंत्राच्या निर्मितीकडे वळावे लागते. ह्या यंत्रनिर्मितीने भांडवलदारास त्याचा भांडवल संचय वाढविण्यासच मदत होते.

उत्पादनवाढ व उपभोग वाढ ह्यांत असमतोल यंत्रवाढीमुळे व उत्पादन वाढीमुळे निर्माण होतो. उत्पादनवाढ ही उपभोगवाढीचेक्षां जास्त झाली की, आर्थिक मंदी निर्माण होते, मंदीचा परिणाम टाळेबंदी व पर्यायाने बेकारी निर्माण होण्यांत होतो आणि बेकारी नाहिसी करण्याकरितां देशांत युद्धाचा पर्याय शोधावा लागतो. युद्ध सुरू झाले की पुन्हा उत्पादनवाढ करावी लागते, त्यातून बेकारी नाहिशी करण्याकरितां मदत मिळते. म्हणजे संपत्ती वाढीकरितां उत्पादनवाढ, त्यांतून आर्थिक अरिष्टें व बेकारी – ती नाहीसी करण्याकरितां युद्धे, त्याकरितां पुन्हां उत्पादनवाढ हे कधीही न संपणारे दुष्टचक्र चालू राहते.

मक्तेदारी चालू ठेवण्याकरितां राष्ट्रांना साम्राज्यशाहीचा आश्रय घ्यावा लागतो, दुसऱ्या देशांना वसाहती बनवून तेथे आपल्या बाजारपेठा निर्माण कराव्या लागतात व त्याकरितां शोषणाची ही क्रिया अव्याहत चालू ठेवावी लागते.

अशा प्रकारे भांडवलशाहीत अतिरिक्त व्यक्तिविकास होत जाऊन थोड्या भांडवलदारांच्या हातांत अमर्याद सत्ता येते व मोठ्या समाजाचे दुसरीकडे ते शोषण करीत असतात. हा अंतर्विरोध वाढत जाऊन तो संघर्षाप्रत व संघर्षांत कामगारांचा विजय अटळ असतो – म्हणूनच भांडवलशाहीच्या वाढीत तिच्या नाशांची बीजें साठविलेली असतात असे म्हणतात ते ह्याच अर्थाने.

साम्यवाद

कार्ल मार्क्स हा साम्यवादाचा तत्ववेत्ता व प्रणेता आहे. अखंड ज्ञानोपासना व कर्ममय जीवन व्यतीत करणारा हा तपस्वी होता. ह्याची तुलना प्राचीन ऋषीमुनीशीच करता येईल. विश्वात कसा बदल होत जाईल ह्या अंतीम बदलाचे स्वरुप कसे असेल हे शास्त्र शुद्ध पद्धतीने व वैज्ञानिक दृष्टीकोनातून मांडणारा तो एक महान शास्त्रज्ञ आहे. सर्व मानवी इतिहासाचे दर्शनच ह्या महान शास्त्रज्ञाने घडविले आहे. म्हणूनच त्याने प्रतिपादन केलेले तत्त्वज्ञान हे खऱ्या अर्थाने आंतरराष्ट्रीय तत्त्वज्ञान आहे. ह्या तत्त्वज्ञानाने सर्व विश्वातील गरीब माणसाला फार मोठी प्रेरणा व उत्तेजन दिले आहे आणि भांडवलदारात प्रक्षोभ निर्माण केला आहे. ह्या तत्त्वज्ञानाने प्रस्थापित राजकीय रचनेत क्रमाक्रमाने बदल होत गेला आहे. व हा बदल लोकशाहीच्या विकासास पूरक ठरला आहे.

मार्क्स जगलेला काळ हा युरोपातील औद्योगिक क्रांतीचा काळ होता. वाफेच्या इंजिनाचा शोध लागला होता. बंदुकीच्या दारूचा शोध

लागला होता. एकीकडें निसर्गाच्या अंतरंगाचा शोध घेण्याचा प्रयत्न बेकन रिकाडो करीत होते. आर्किमिडीज ने होकायंत्राचा शोध लावला होता. डार्वीनचा उत्क्रांतीचा सिद्धांत प्रसृत झाला होता व मानवी प्रगतीला आवाहन करणारे एक मोठे दालन मानवाच्या इतिहासात मोकळे झाले होते. यांत्रीकी युगाचा प्रारंभ होत होताच उत्पादन वाढीला चालना मिळत होती.

बहुसंख्य समाज तोंवर शेतीवर कामगार म्हणून पिढ्यानपिढ्या वेठबिगार करीत, गुलामी वृत्तीने राबत होता. ही गुलामी नाहीशी करण्याकरिता यंत्रयुगाचा पहाट, ही त्यांना पर्वणी वाटणे स्वाभाविक आहे. फार मोठा वर्ग शेती सोडून देऊन, गुलामी दूर सारुन स्वतंत्र जीवन जगण्याचा इर्षेने यंत्रावर काम करण्याकरिता शहरात येऊ लागला.

यांत्रिकीकरणामुळे एकीकडे पिढ्यानपिढ्यांची चालत आलेली गुलामी नाहीशी केली पण कामगारांची आर्थिक हालाखी संपली नाही. शहरांत कामगारांच्या वसाहती निकृष्ठ जागी व निकृष्ठ प्रकारच्या असत. जीवनमान दरिद्री रेषेच्या अवतीभोवतीच असे. कारखाने भांडवलदारांच्याच मालकीचे असल्यामुळे जास्त नफ्याच्या आशेने जास्त उत्पादन वाढ करणे, त्या करिता बाजारपेठा शोधणे व उत्पादन वाढीकरिता कामगारांना कमी वेतनांत जास्तीत जास्त राबविणे हे प्रकार सुरु झाले. शेती निघून गेलेली असल्यामुळे सरंजामदारांचा आश्रय तुटलेल्या हया कामगारांस भांडवलशहांने जाण ठेवली होती फक्त स्वतःच्या नफ्याची. कारखान्यातील मोठ्या माणसांची कामेही ते लहान मुलांकडूनच करून घेत कारण निम्म्या मजुरीत त्यांचे काम भागत असे. आठ-दहा वर्षांच्या मुलांनाही बारा, बारा चौदा, चौदा तास काम करावे लागे. त्यांना जेवणालाही सवड नसे. त्याचे आईवडील यंत्र चालू असतांनाच व एकीकडे मुलाचे काम हाताने चालू असतांना त्याला ब्रेड सारखे कांहीतरी खाऊ घालीत व त्याला जगविण्याचा प्रयत्न करीत. त्यामुळे रोगराईचे व मृत्यूचे प्रमाण फार मोठे होते. मार्क्सने वर्णन केले, तेव्हाचे कामगारांचे आयुष्य हे आंतड्याला पीळ पाडणारे आहे. एवढा मोठा उत्पादनक्षम असा हा वर्ग असाच राहणार काय? त्यांच्या

जीवनमानात सुधारणा होणार नाही ? कधी काळी तो सत्ताधीश होऊ शकेल काय ? अशा प्रश्नांनी मार्क्स सारख्या भावनाप्रधान माणसाला छळले नसल्याचस आश्चर्य ! आपले सर्व जीवन त्याने कामगारांच्या प्रश्नांच्या विचारात घालविले.

मार्क्स हा धर्माने ज्यू. बर्लीनमध्ये त्यांचे शिक्षण झाले. १८३५-३८ बर्लिन विश्वविद्यालयात त्याने इतिहासाचे प्राध्यपक म्हणुन काम केले. १८४१ साली डॉक्टरेट मिळविली. १८४२ साला कोलोन येथील " हाईनशे त्साटुंग " संपादक एंजल्स ह्यांच्याशी प्रथम भेट व ओळख झाली. मार्क्स एंजल्स मैत्री शेवटपर्यत टिकली. दोघांनी कामगारांच्या उत्पादनाच्या कामाला स्वत:स वाहून घेतले १८४३ साली त्याचा जेनीफा वेस्टफालेनशी विवाह झाला. १८४३-४४ मध्ये मार्क्स व एंजल्सच्या क्रांतिकारक मैत्रीचा प्रारंभ झाला. त्यांनी पॅरीस येथे जर्मन व फ्रेंच वार्षिक पत्रांचे संपादन केले. त्याचा परिणाम म्हणून त्याला पॅरिसहून हद्दपार करण्यात आले. त्याने १८४५ त ब्रसेल्स येथे प्रयाण केले व 'पवित्र कुटुंब' व 'जर्मन विचारधारा' ह्या ग्रंथाचे प्रकाशन केले. १८४७ मध्ये " तत्वज्ञानाचे दारिद्र्य " हा ग्रंथ लिहिला. १८४५ मार्क्स व एंजल्सनी कम्युनिस्ट लीगच्या २ ऱ्या परिषदेत भाग घेतला व त्यांना "कम्युनिस्ट जाहीरनामा " तयार करण्याचा आदेश देण्यांत आला.

२४ फेब्रुवारी १८४८ ला कम्युनिस्ट जाहीरनाम्याचे प्रकाशन करण्यांत आले. १८४९ साली जर्मनीच्या क्रांतीच्या उठावाची जबाबदारी त्यांच्यावर टाकून सरकारने त्यांना हद्दपार केले,

मार्क्स व एंजल्स ह्यांच्या लिखाणाला त्यानंतर धार येत चालली. १८५० त नॉर्थ न्हायनिशे त्सायटुंगच्या अंकातून फान्स मधील वर्गलढे व जर्मनीतील शेतकरी युद्ध प्रसिद्ध झाले. १८५१ साली न्युयार्क डेली ट्रिब्युनचा वार्ताहार बनुन जर्मनीतील क्रांती व प्रतिक्रांती ही लेखमाला लिहिली. १८५२ मध्ये "लुई दि बोनापार्टची १८ वी बुमेर" क्रमश: प्रसिद्ध केलो. १८५३ मध्ये "कोलोनच्या कम्युनिस्ट खटल्याचा रहस्यस्फोट" व "भारतांतील ब्रिटीश

सत्तेचे भावी परिणाम" हे लेख प्रसिद्ध केले. १८५७-५९ मध्ये "भारताच्या स्वातंत्र्य समराबद्दल" ट्रिब्युनमध्ये लेखमाला लिहिली. १८६० मध्ये "अर्थशास्त्राची मिमांसा" प्रसिद्ध केली. १९६३-६५ "भांडवल (कॅपिटल)" ह्या पुस्तकाचे लिखाण केले व २८ सप्टेंबर १८६५ साली आंतरराष्ट्रीय श्रमिक संघाची स्थापना केली.

१४ सप्टे. १८६७ ला "भांडवल (कॅपिटल)" ह्या महान ग्रंथाचा, जी पुढे कामगारांची गीता ठरली, त्याचा १ ला खंड प्रसिद्ध केला. भांडवलाच्या २ ऱ्या व ३ ऱ्या खंडाचे काम त्याच्या मृत्युपर्यन्त चालले होते. १८७० मध्ये फ्रान्स व प्रशिया ह्यांचे युद्ध चालू असतांना फ्रेन्च व जर्मन कामगारांना उद्देशुन दोन जाहीरनामे प्रसिद्ध केले. १८७१ मध्ये पॅरिसच्या कामगारांनी सत्ता काबींज करून "पॅरिस कम्युन" स्थापन केले व ते कांही काळ टिकविले. पॅरिसमधील यादवी युद्धा व गोथा कार्यक्रमाची चिकीत्सा हे प्रबंध मार्क्सने प्रसिद्ध केलें. हे सर्व होत असतांना मार्क्सची आर्थिक परिस्थिती अत्यंत वाईट होती. मुलांना औषधेही तो देऊ शकत नसे, त्याचाच परिणाम म्हणून १८८१ मध्ये त्याची मुलगी 'जेनी मार्क्स' वारली. त्याचा त्याला जबर धक्का बसला. १८८४ त त्याची मोठी मुलगी जेनी लॉंगे हिचे निधन झाले. २४ मार्च १८८३ त कार्ल मार्क्सचे ऋषितुल्य व झंझावाती जीवनाची समाप्ती झाली. त्याने लिहिलेली पुस्तके भांडवल खंड २ व ३ त्याच्या मृत्यूनंतर एंजल्सने प्रसिद्ध केली.

जानेवारी १८४८ मध्ये मार्क्सने प्रसिद्ध केलेली पुस्तीका "साम्यवादाचा जाहीरनामा" ह्याने सर्व जगांत खळबळ उडविली. सर्व जगातील कामगारांना ह्या चाळीस पानी पुस्तकांद्वारे मार्क्सने संघटित होण्याचे आव्हान केले. भांडवलदारांचे अन्याय व दडपशाही ह्याचे विदारक वर्णन करून त्याला समर्थपणे तोंड देण्याची शक्ती कामगारांच्या संघटनेत आहे हे प्रस्थापित जुलमी समाज व्यवस्था नाहिशी करून समानतेचे युग निर्माण करण्याकरितां कामगारांनी आपल्या हाती सत्ता घेतली पाहिजे हे मोठ्या प्रभावीपणे प्रतिपादिले हे करीत असतांना "संघर्ष" हा अपरिहार्य भाग मार्क्सने मांडला. ह्या पत्रिकेत कामगारांना आवाहन करतांना मार्क्सने

म्हटले आहे – "उद्याच्या उज्वल भविष्यासाठी तुम्हाला हे सर्व करावे लागणार आहे. ह्या करितां जे सोसावे लागणार आहे त्या पेक्षा किती तरी भयानक आजच तुम्ही सोशीत आहात व केवळ त्याचाच वारसा आपल्या मुलाबाळांना देणार आहात ना. ह्या संघर्षात तुमच्या जवळ गमाव्ण्यासारखे कांही असेल तर त्या तुमच्या हातापायातील गुलामीच्या बेडच्या म्हणून कामगारांनी ह्या संघर्षाकरिता संघटित व्हा, एकजुट करा." मार्क्सच्या ह्या आवाहनांत मुक्ततेचा एक आशेचा किरण जगांतल्या दलित, पिडीत, उपेक्षित, कामगारांना दिसला व एक अभिनव इतिहास घडविणाऱ्या युगास प्रारंभ झाला.

सेंट सायमन, चार्ल्स फेरियर, रॉबर्ट ओबेन ही उदारमतवादी माणसे त्याकाळीही होती. त्यांनीही आपापल्या परीने आपले प्रयोग चालू ठेवले होते. रॉबर्ट ओवेन ने तर आपला एक कारखानाच कामगारांच्या नांवे करून त्यांना तो चालविण्यास दिला होता.

त्या वैचारिक सिद्धांतावर मार्क्सचा साम्यवाद आहे तो ही ह्या निमित्ताने बघणे उपयुक्त ठरेल.

(१) माणूस जीवन जगतो ते भौतिक जीवन, त्या संबंधीची प्रमेय म्हणज भौतिकवाद. "आध्यात्म" हा केवळ कल्पनेचा विषय आहे. ह्या कल्पनांना खऱ्याचे स्वरूप देऊन माणसांवर लादणे हा गुन्हा आहे. माणसाला माणूस म्हणून माणसाप्रमाणे जगण्याचा हक्क आहे व त्याला त्या करिता कामी पडणारे सिद्धान्त हे भौतिक वादाचेच आहेत. भौतिकवाद हा द्वंदा मक असतो. दोन परिस्थितींचे प्रतिनिधित्व करणारे दोन वर्ग असतात. ह्या वर्गाचा संघर्ष अहर्निष चालू असतो व ह्या संघर्षातून समाजाचा विकास होत असतो वर्ग-लढा व विरोध विकास हे समाजाच्या प्रगतीच्या मुळाशी असतात. ह्या बाबतीत मार्क्सने "डोक्यावर उभे असलेल्या हेगेल ला सरळ उभे केले" असे म्हणतात. जर्मन तत्त्वज्ञ हेगेल हा देखील विरोध – संघर्ष – विकास हे प्रमेय मांडतो. हेगेलच्या मते ही मानसिक प्रक्रीया असते व समाजास विकासाकडे नेत असते. मार्क्सने वास्तव परिस्थितीचाच आधार देऊन शोषित व शोषक अशा वर्गात समाजाची विभागणी केली. ह्या दोन वर्गात

संघर्ष हां अपरिहार्य आहे. वर्गसंघर्ष व विरोधविकासांचा सिद्धान्त अशाप्रकारे मार्क्सने मांडला आहे.

(२) भांडवलशाहीची प्रेरणा ही नफा आहे. भांडवलदार हा नफ्यावर लक्ष ठेऊनच सर्व व्यवहार करीत असतो. नफा जास्त मिळविण्याकरितां कमी वेतनांत जास्त उत्पादन त्याला करावे लागते. त्यामुळे "शोषण" हा भांडवलशाहीचा स्थायीभाव आहे. झालेले उत्पादन खपविण्याकरितां त्याला नवनवीन बाजारपेठा उपलब्ध करून घ्यावा लागतात. हक्काची बाजारपेठ म्हणजे वसाहत आलीच. वसाहती वाढविण्याच्या प्रक्रियेतून साम्राज्यवादाचा जन्म होतो व तो विश्वास व्यापून राहतो. आर्थिक व्यवहाराचे केन्द्रीकरण भांडवलशहांत झालेले असते. ह्यातूनच राजकीय किंवा सत्तेचे केन्द्रीकरण निर्माण होऊन ते "हुकूमशाहीस" जन्म देते.

(३) शोषणातून निर्माण होणाऱ्या अतिरिक्त मूल्यांचा सिद्धान्त मार्क्सने मांडला आहे. 'क्ष' व्यक्ती 'य' काम दिवसभर करून तीचे उत्पादन मूल्य 'प' होते आहे असे समजा. 'क्ष' हा भांडवलदार असेल तर तो स्वत: काम न करता तेच काम 'क' ह्या कामगाराकडून करून घेईल. हे काम करून घेताना 'य' एवढे काम झाले की त्याने काम बंद करावयास हवे. पण तसे न होता तो त्याच्याकडून 'य' अधिक 'ज्ञ' काम करून घेईल. मजुरी देतांना बाकी 'प' हे पुर्ण मुल्य त्याला न देता (प–ज्ञ) हे मुल्य म्हणजे कमी मजूरी देईल म्हणजेंच तो (य + ज्ञ) हे जास्त काम तर करून घेईलच पण मजूरी मात्र (प – ज्ञ) कमी देईल. जास्त काम आणि अपुरी मजुरी हा भांडवलदाराचा नफा आहे, त्यास अतिरिक्त मूल्य म्हणता येईल. ह्या अतिरिक्त मूल्याद्वारे भांडवलदार नेहमी मजूराच्या श्रमाची चोरी करतो व तो स्वत: भांडवल संचय करतो.

(४) मार्क्सने इतिहासाच्या अर्थव्यवस्थेची मिमांसा केली आहे. फार प्राचीन काळी लोक समुदायाने राहात, दगडी हत्यारे वा धनुष्यबाण वापरून शिकार करीत व प्रत्येकास पाहिजे तेवढाच भाग घेत. हा प्राचीन नैसर्गिक साम्यवाद झाला.

नंतर लोक शेती करू लागले. जो बलवान तो जास्त जमीन बळकावी. दुसऱ्या शेतीवाल्याशी भांडणे करून तो ताब्यात घेई व त्यांच्या माणसांना गुलाम म्हणून राबवावयास लावी. ही सरंजामशाही पद्धत झाली.

औद्योगिकरणानंतर "यांत्रिक युग" जगांत सुरु झाले, गिरण्यांचे मालक भांडवलदार झाले. शेतीवरील मजूर आपली पिढ्यानपिढ्या चाललेली गुलामी नाहीशी करण्याकरिता यंत्राकडे धावले. तेथे ते कामगार म्हणून राहिले. म्हणुन भांडवलशाहीने त्यांचे शोषण सुरु केले मोजके भांडवलदार लाखो कामगारांचे शोषण करतात व त्यांना विकासाच्या कोणत्याही वाटा मोकळ्या न ठेवता त्यांना दरिद्री रेषेवरील जीवन जगू देत, हेच तेव्हाचे भांडवलशाहीचे चित्र होते.

हां सर्व समाज शोषण मुक्त करावयाचा असेल तर "भांडवलशाहीची मुजोरी काढून टाकण्याकरिता सर्व उत्पादन साधने समाजाच्या मालकीचीच करायला पाहिजेत. प्रत्येकाने काम केले पाहिजे. कामाप्रमाणे दाम घेतल पाहिजे व सर्वाना विकासाच्या समान संधी प्राप्त झाल्या पाहिजेत.

(५) कोणतीही राज्यसंस्था ही कायदे नेहमी आर्थिक सत्तेला अनुरूप अशीच बनविते. म्हणजेच भांडवलशाहीस पोषक बनविते. राष्ट्राची सांस्कृतिक वाढ ही देखील भांडवलशाहांच्या मर्जीचाच भाग असतो. त्यामुळे ती एकांगी व समाजात विषमतेची फार मोठी दरी निर्माण करणारी असते. "धर्मसंस्था ह्याही नेहमीच भांडवलदारांना फायदेशीर अशीच आपली वागणूक ठेवतात. कारण त्यांनाही भांडवलदाराच्याच पाठींब्यावर जगावयाचे असते. ह्या धर्मसंस्था भांडवलदारांच्या फायद्याकरिता बनविलेले नियम "शोषित" माणसांना धर्माच्या नांवाखाली पाळावयास लावतात व तेही स्वतःच्या नशिबाला व दैवाला दोष देत ते पिढ्यानपिढ्या पाळतात ह्याच अर्थाने मार्क्स "धर्मही अफूची गोळी आहे" असे म्हणतो. राज्य संस्था ही तर समग्र भाडवलदार वर्गाचे संयुक्त व्यवहार चालविणारी संस्थाच बनते.

(६) मार्क्स शेवटी म्हणतो की "भांडवलशाहीच्या नाशाची बिजे तिच्या विकासातच सांठविलेली असतात.

समाजाचा समतोल बिघडला की विषमता वाढते. धर्म, सत्ता, अर्थ ह्याचे केंद्रीकरण करणारा वर्ग "शोषित" समाजास नेहमी दलितच ठेवण्याचा प्रयत्न करतो. तेव्हा ह्या दोन वर्गांत निर्माण झालेल्या विरोधातून वर्गसंघर्ष विरोध विकास व अंतिम कामगारांच्या हाती सत्ता म्हणजे समाजाच्या मालकीची उत्पादन साधने, समानतेच्या ह्या युगाची स्वप्ने पाहणाऱ्या मार्क्सला खात्री होती की धर्मसंस्थेचेही काम राहणार नाही. राज्य संस्थेचही नाही. (whithering away of fhe states) सगळ्या जगातला शोषित कामगार एक होऊन एकच एक राज्य जगभर पसरले आहे, जेथे कोणी कोणाचे शोषण करीत नाही, प्रत्येकास विकासाचे सर्व मार्ग उपलब्ध आहेत. सर्व समान आहेत. माणूस हा माणूस आहे. निर्माण झालेली नवीन संस्कृती ही माणुसकीच आहे.

मार्क्सने दिलेल्या प्रेरणेने एकोणीसाव्या व विसाव्या शतकातील प्रत्येक शोषित व वसाहतवादी भारून गेला असल्यास नवल नाही. ह्याचाच परिणाम म्हणजे मार्क्स नंतरच्या शंभर वर्षांच्या काळात जगात एक तृतीयांश भागावर "कम्युनिस्ट" राजवट निर्माण झालेली आपणास दिसते.

जगांतल्या सर्व कामगारांना उत्थापनाचा संदेश व प्रेरणा देऊन त्यांच्या हाती सत्ता सोपविण्याचा प्रयत्न करणारा मार्क्स म्हणूनच एक महान ऋषी आहे.

प्रश्न एकच उरतो. जगांत निर्माण झालेल्या सर्व कम्युनिस्ट राजवटीना मार्क्सचे स्वप्न पूर्णपणे साकार केले काय ? दुदैवाने ते पूर्णपणे साकार झाले नाही असे म्हणावे लागते.

लोकशाही – उद्‌गम व विकास

लोकशाही ही एक समाज जीवन चालविणारी जीवन पद्धती आहे. आधुनिक लोकशाही ही "घटना व तत्त्वे" ह्या निरनिराळ्या क्रांत्यामधून आलेल्या अनुभवांनी समृद्ध झालेली असली तरी ह्या जीवन पद्धतीचे आकलन प्राचीन समाज पुरूषाला होते हे नाकारता येणार नाही.

प्राचीन काळी म्हणजे पांच हजार वर्षा पूर्वीपासून भारतात 'गणराज्या' चा इतिहास सापडतो. 'ग्राम सभा' हा ह्या गणराज्यांचा महत्त्वाचा घटक मानला जाई. एखाद्या गांवच्या ग्रामसभेने घेतलेला निर्णय गावातील सर्व रहिवाशांवर बंधनकारक राही कारण तो निर्णय गावच्या प्रतिनिधीनी किंवा त्या काळच्या प्रतिष्ठित लोकांनी घेतलेला असे. प्रतिनिधीची निवड करण्याची सध्याची पद्धत अस्तित्वात नसली तरी, परंपरांनी कांही घरांना व घराण्यांना प्रतिनिधीत्व बहाल केले गेले असे व विशेष अशा कारणामुळेच ते रद्द होऊ शके. प्रसंगी गावातील सर्व लोकांनी एकत्र जमून एखाद्या विषयाचा न्याय निवाडा करणे, एखाद्या महत्वाचा धार्मिक, सामाजिक व

राजकीय निर्णय घेणे किंवा प्रचलित कायदे मोडणारांना दंड करणे ही ग्राम सभा करी. म्हणजेच एखाद्या विषयावरील आपले मत मांडण्याचा अधिकार व हक्क नागरिकास होता. ह्यातूनच 'ग्राम स्वराज्याची' कल्पना साकार होत गेली.

पश्चिम युरोपमध्ये ग्रीक तत्त्वज्ञांनी प्रथम लोकमतांचा सिद्धांत मांडला व काही ग्रीक पद्धतीची गणराज्येही तयार होऊ लागली. लोकशाहीचा आंग्ल पर्याय डेमॉक्रसी - डेसाँस म्हणजे लोक व काटिया म्हणजे शक्ती ह्या 'डेमॉकार्टिया' पासून आलेला आहे.

भारतांत प्राचीन काळी यादवांचे राज्य हेही एक गणराज्यच होते. श्रीकृष्ण हा त्यांचा लोक नियुक्त अध्यक्ष होता. ह्या अध्यक्षाची 'लोकसभा' असावयाची व महत्त्वाचे सर्व निर्णय लोकसभेत घेतले जात असत. सिकंदराचा भारतातील प्रवेश हा त्या वेळच्या असंख्य बलशाली गणराज्यांनीच अशक्य करून टाकला होता.

जस जसा मानवाचा विकास होत चालला तस तसा लोकशाही ह्या संकल्पनेचाही विचार होतो आहे. आज लोकशाहीचा विचार करतांना आपण दोन निरनिराळ्या स्तरांवरून ह्या कल्पनेकडे बघतो.

(१) सहभागी लोकशाही. प्राचीन ग्राम स्वराज्ये ज्या पद्धतीने, सर्व एकत्र बसून विचार विनिमय करीत ती पद्धत.

(२) प्रातिनिधीक लोकशाही. आजची पार्लमेन्टची पद्धती.

लोकशाहीची स्थूल कल्पना कशी विकसित होत गेली हे पाहणे मोठे मनोरंजक ठरेल.

समाजातील घटकांचे परस्परातील संबंध सामंजस्याचे राहिले पाहिजेत हे मान्य केले की ही 'समाजव्यवस्था' चालविण्या करिता कायदे व त्यांचे पालन हे आवश्यक ठरते. समाजा करिता बनवावयाचे कायदे समाजातील सर्वांनी मिळून बनवावे हे ओघानेच आले पण असे एकत्र येणे

नेहमीच व्यवहार्य ठरत नाही. त्या करिता समाजातील एक गट आपला प्रतिनिधी निवडून देतो व असे निरनिराळ्या गटाचे प्रतिनिधी एकत्र येऊन "समाजव्यवस्था" टिकविण्याचे कायदे बनवितात ही आजच्या लोकशाहीची स्थूल कल्पना.

अति प्राचीन नैसर्गिक साम्यवादी समाजव्यवस्थेचा काळ सोडला तर नंतरचा फार मोठा काळ, हा इतिहासातील राज्ये सरंजामशाही व भांडवलशाही ह्यानी व्यापला आहे. ह्या तिन्ही कालात व्यक्ति विकासाला अती महत्त्व चढवून एका व्यक्तीने अनेक व्यक्तींना आपल्या विकासाकरिता व सुखसोयीकरिता राबवायचे ही पद्धत रुढ होती. त्यातूनच गुलामी व वेठबिगार जन्मास आली. मानवाच्या इतिहासातील ह्या युगाचे वर्णन एक अंधःकारमय युग म्हणून करता येईल. ह्या युगातून बाहेर पडण्याकरिता व सर्व मानव समान आहेत. हे रूजविण्याकरिता अनेक राजकीय, धार्मिक सामाजिक व मानसिक संघर्षातून जावे लागले पण अखेर हा सुवर्णदिन उजाडलाच.

४ जुलै १७७६ ला अमेरिकन राज्यक्रांती पूर्णत्वाकडे जात असतांना जेफरसनने अमेरिकन काँग्रेसच्या वतीने जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्यात "सर्व मानव जन्माने समान आहेत व स्वातंत्र्य व सुख शोधण्याचा प्रत्येकाला मुलभूत हक्क आहे" हे प्रथमच आधुनिक मानवी इतिहासाने मान्य केले व या अंधारयुगातून बाहेर पडण्याची मानवाची धडपड सुरू झाली.

अठराव्या शतकाच्या अखेरच्या दशकांत झालेल्या फ्रान्सच्या राज्यक्रांतीने, "स्वातंत्र्य - समता - बंधुता" ह्या तत्त्वांचा उद्घोष केला व वेठबिगार व गुलामगिरी झुगारून देऊन एका नवीन युगाचे स्वागत करण्यास मानव तयार झाला.

अब्राहम लिंकनने प्रथमच राज्य हे लोकांनी तयार केलेले, लोकांनी चालविलेले व लोकांकरिता असावे असे जाहीर करुन परिवर्तनाची दिशा स्पष्ट केली. (Govt. of the people, by the people for the people) व विचारवंतांना एक नवीन जग निर्माण करण्याचे आव्हानच दिले.

जनतेने चालवावयाच्या राज्याचे कायदे हे जनतेनेच करावयाचे हे ओघानेच आले. हे कायदे कसे तयार करावेत हया संबंधी प्रथम स्विट्सर्लन्डने विचार करुन कांही ठळक गोष्टी विचारार्थ मांडल्या.

(१) विधी उपक्रम : जनतेस कोणते कायदे हवे आहेत. हे जाणून घेण्याची सरकारने व्यवस्था करावी व जनमनातील आशय कायम ठेवून त्यास 'विधी' चे रुप द्यावे. हे सहभागी लोकशाहीनेच शक्य आहे.

(२) जनतेचा कौल घेणे : एखाद्या प्रश्नावर जनमत आजमावून त्यप्रमाणे सरकार निर्णय घेते.

सहभागी लोकशाहीची कल्पना आदर्श असली तरी ती व्यवहार्य नाही. म्हणूनच प्रातिनिधीक लोकशाहीची कल्पना मूळ धरु लागली. पूर्वीचे परंपरागत चालत आलेले प्रतिनिधी हे जनतेचे खरे प्रतिनिधी नव्हते म्हणून हे प्रतिनिधी निवडणूकीने जनतेच्या मार्फत निवडून दिले जावे असे ठरल. जनतेने प्रतिनिधी निवडून द्यावयाचे म्हणजे आपली कायदे बनविण्याची शक्ती प्रतिनिधीला देणे ही मूळ कल्पना आहे. परिस्थितीनुरुप लोकमत बदलू शकते म्हणून निवडणुकीला कालमर्यादा घालण्यात आली. प्रत्येक माणसाला प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार मान्य करण्यात आला. म्हणजे जात, धर्म, लिंग हया बाबतीत मतदार समान पातळीवर आणला गेला. इग्लंडमध्ये मताधिकार स्त्रियांना असण्याबद्दल, म्हणजे स्त्री-पुरुष समानतेकरिता अनेक वर्षे लढा द्यावा लागला.

हया चिंतनातून कांही गोष्टी निश्चित होत आल्या.

(१) जनतेचे सार्वभौमत्वाचे तत्त्व हा लोकशाहीचा मूलाधार आहे. हया करिता लोकशाही जीवन पद्धतीच स्वीकारली पाहिजे.

(२) व्यक्ति स्वातंत्र्य अबाधित राहिले पाहिजे. प्रत्येक व्यक्तीस आपल्या मतानुसाणे जगण्याचा, सुख प्राप्त करुन घेण्याचा व समाजाकडून संरक्षण मिळविण्याचा अधिकार आहे. अमर्याद व्यक्ति स्वातंत्र्य ही अव्यव-

हार्य कल्पना झाली. शेवटी व्यक्तो ही समाजाचाच एक भाग म्हणून जगत असते. समाज विकासात व्यक्ति स्वातंत्र्याची बाधा येऊ नये ही किमान मर्यादा सांभाळणे अपरिहार्य आहे,

(३) कायद्यापुढे सर्व समान आहेत, शासनाचे कोठलेही कृत्य कायद्याच्या आधाराशिवाय होत नाही.

लोकशाही समाजव्यवस्था पद्धतशीर चालविण्याकरिता घटना तयार करण्यात आली. प्रातनिधीक लोकशाहीत पार्लमेन्ट ही नियम करणारी सार्वभौम संस्था आहे. ह्यास विधीचालिका म्हणता येईल. ह्या नियमांचे पालन शासनाने करुन शासन चालवावयाचे असते, त्यास कार्यपालिका म्हणता येईल. शासनाचे सर्व नियम घटने प्रमाणे बरोबर आहेत कां हे बघण्याचा अधिकार न्यायालयास आहे. त्यास न्यायपालिका म्हणता येईल.

इंग्लंडमध्ये लोकशाहीची प्रस्थापना होन्यापूर्वी राजाचे राज्य होते तेव्हा राजाचा शब्द हा शेवटचा शब्द ही कल्पना रुढ होऊ लागली म्हणूनच इंग्लंडच्या पार्लमेन्टला सार्वभौम समजतात. हे घटनात्मक राज्य असले तरी घटनेची सर्वच कलमे लिखित नाहीत. ही पार्लमेन्ट फक्त दोनच बंधने पाळते, (१) रुढीचे (२) सुबुद्ध नागरिकांच्या मताचे. मताचे बंधन पार्लमेन्टला पाळावे लागत असल्यामुळे प्रत्येक व्यक्तीला एक मत असे रूढार्थाने म्हटले जात असले तरी सर्व साधारण पणे त्याची अट प्रत्येक घटनेने मान्य केली आहे व मत देण्याचा अधिकार २१ वर्षावरील व्यक्तीलाच प्रदान केला आहे. इंग्लंडच्या राज्यव्यवस्थेत राजाला कांहीही स्थान नाही. ज्याच्या मागे बहुमत आहे, त्याचेच सरकार बनते. हे सरकार लोकसभेला किंवा पार्लमेन्टला जवाबदार असते. लोकसभेची मंजुरी सत्ताधारी पक्षास मिळाली तरच त्यांना अधिकार वापरता येतात. इंग्लंडने कायद्याचे राज्य मान्य केले असून कायदा सर्वांना समान मानतो,

अमेरीकेची घटना तयार झाली तेव्हा त्यांना तेथे असलेल्या निर-निराळ्या वसाहतींचा विचार करावा लागला. बहुमताने निवडून येणारे

सरकार व अधिक्याने येणारी संसद, सोपविलेल्या अधिकाराचा दुरूपयोग करुन हुकूमशहा बनण्याची शक्यता टाळण्यासाठी सत्तेचे विभाजन केले गेले. विकेन्द्रित सत्ता क्षेत्रात, आता सत्ता (१) विधीपालिका (२) कार्यपालिका व (३) न्यायपालिका अशी विभागणी केली आहे. हे करीत असतानाच घटना कारांनो कायम सुरक्षिततेची व्यवस्था म्हणून (अ) जनतेचे मूलभूत अधिकार मान्य केले आहेत. ह्या अधिकारांवर अतिक्रमण करता येणार नाही. (ब) न्यांयिक तपासणी मान्य केली आहे. कौणाही व्यक्तीस कोठल्याही अन्याया विरुद्ध न्यायालयाचा आश्रय घेता येतो व न्याय संस्था घटनेने तयार केलेल्या कायद्यानुसार व्यवहार होतो काय याची तपासणी करू शकते.

भारतीय घटनेवर वरील दोन्ही घटनांचा कांही अंशी परिणाम झाला आहे. भारतीय घटना ही (१) लिखित घटना आहे. तिने (२) सत्तेचे विभाजन व (३) मूलभूत अधिकार मान्य केले आहेत.

मूलभूत अधिकारावर अतिक्रमण झाल्यास न्यायालयात जाण्याचा प्रत्येकास अधिकार आहे.

गेल्या अनेक वर्षापासून मानवी जीवन ज्या विकासाच्या टप्प्यातून जात आहे त्यांत सर्व मान्य जीवनपद्धती म्हणून आज लोकशाही जीवन पद्धती सर्वोत्तम मानली जात आहे. व्यक्ति विकासाचे व समृद्धीचे मूलाधिकार समाज विकासाच्या आड न येण्याची मर्यादा सांभाळून, सार्वजनिक आर्थिक व औद्योगिक क्षेत्रात एक प्रबळ राष्ट्रीय शक्ती निर्माण करण्याचे सामर्थ्य ह्यात आहे.

ह्या लोकशाहीच्या सार्वभौमत्वाचा आविष्कार व्हावयाचा असेल तर त्याचे प्रतिनिधीत्वही योग्य व यथार्थपणे व्हावयास पाहिजे हे ओघानेच आहे. मुलभूत अधिकार घटनेच्या तरतुदी, व सामाजिक वस्तुस्थिती ही परस्परातील पोषक झाल्यास एका आदर्श जीवन पद्धतीचा अविष्कार होऊ शकतो. जीवनपद्धतीत मेळ राहण्यासाठी, राष्ट्रीय एकात्मता, परस्परांच्या मतांचा आदर करण्याची वृत्ती व उदारमतवाद हे वाढणे अत्यंत आवश्यक आहे.

ह्या करिता जागरुक मतदारांची आवश्यकता असते. व तो लोक-शिक्षणाने साध्य करता येतो. सहिष्णुता व परिवर्तनाची योग्य दिशा इच्छित स्थळी पोहोचविण्यास समर्थ आहेत. विशेषाधिकारासहित सामाजिक समतेचा स्वाभाविक आविष्कार आणि विचार शासन व जीवन ह्यांची परस्परानुवृत्ती हीच आपणांस अभिप्रेत आहे.

●●●

लोकशाही समाजवाद

विसाव्या शतकात विज्ञानाने एवढी मोठी झेप घेतली आहे की, त्यामुळे सारे मानवी जीवन अत्यंत गुंतागुंतीचे बनले आहे. ख्रिस्त काळांत एवढी गुंतागुंत नव्हती, हे समजून घेणें आवश्यक आहे. तत्त्ववेत्यांनी मांडलेले विचार हे "सत्य"च असतात. परंतु बदलत्या कालमानाप्रमाणे त्यांचा संदर्भ लावावा लागतो.

जगातील सर्व समाजवादी विचारसरणीवर मार्क्सवादाचा फार मोठा परिणाम झाला आहे, हे कबूलच केले पाहिजे, पण मार्क्सचे विचारही कालौघात बाद होऊ शकतात – नव्हे होतातच. हे समाजवाद्यांनी दाखविले आहे. एका दृष्टीने मार्क्सच्या पुढे प्रगतीकडे त्यानी आपले पाऊल टाकले आहे.

भांडवलशाहीची प्रतिक्रिया म्हणून "साम्यवाद" जन्माला आला व साम्यवादाच्या प्रतिक्रीयेतून समाजवादी विचारसरणी पुढे आली असे म्हणणें

वावगे ठरणार नाही. "लोकशाही समाजवाद" हा म्हणूनच एक नवा विचार आहे. विश्वांत वैज्ञानिक संशोधनाची प्रक्रिया क्रमाक्रमाने होत असते. विश्वाची जो गती आहे त्यांत अंतीम सिद्धान्त नसतात. म्हणूनच "साचेबंद लोकशाही समाजवाद" आज सांगता येणार नाही, कदाचित् – पण तेही गतीमानतेचेच लक्षण आहे व ह्या गतीमान् विश्वातील, सत्याचा शोध घेत राहावा. त्याचा उपयोग व्यक्ती-जीवन व समष्ठीजीवन विकसित व समृद्ध करण्याकरिता करावा व शोषण मुक्त व निर्भय समाजाची निर्मिती करावी; आर्थिक सांस्कृतिक स्वातंत्र्याची जपणूक करावी हे लोकशाही समाजवादाचे व्यवच्छेदक लक्षण आहे.

भांडवलशाहीचे उगमस्थान "व्यक्ती" आहे. "व्यक्ती"स विकासाचे संपूर्ण स्वातंत्र्य असावे असे भांडवलशाही मानते. व्यक्तींचाच समाज बनतो त्याअर्थी व्यक्ती विकासातच "समाज–विकांसाची" मुळे आहेत असे वर वर पाहता वाटते पण ते खरे नाही. व्यक्ती विकासाचे स्वातंत्र्य मान्य करणे निराळे व ते प्रत्येक व्यक्तीस साधनांद्वारा उपलब्ध करून देणे निराळे ज्यांच्या हाती उत्पादनाची साधने, त्यांनाच विकासाची सर्व संधी उपलब्ध होऊ शकते, शासन व धर्म हे त्याच्याच बाजूने उभे असतात - ह्या केन्द्रियकरणाच्या प्रक्रियेत एकीकडे अत्याधुनिक सर्व सुखे हाताशी असलेली व्यक्ती व दुसरीकडे, ज्यांच्या बळावर हे सर्व घडते तो फार मोठा शोषित समाज असे चित्र निर्माण होते. ह्या शोषित समाजाला पर्यायी व्यवस्था म्हणून "साम्यवाद" पुढे आला. साम्यवादाने "शोषित" समाजाला शोषणमुक्त केले धर्माचे उच्चाटन केले, कांही सत्ता ही त्याच्या हाती दिली पण एक "साचेबंद" समाज (रेजिमेन्टेशन) निर्माण केला. समाजाच्या विकासासांठी सर्वांनी एका विशिष्ट चौकटीतच राहावयास पाहिजे, चौकटीतलेच विचार बोलले पाहिजे. चौकटीतीलच कृती केली पाहिजे हाच एकमेव विचार "साम्यवादा" मुळे प्रसृत झाला व त्यामुळे निसर्गाने निर्माण केलेले आचाराविचारावरील विविधतेवर फार मोठे बंधन पडले. अशा प्रकारे झालेला व्यक्ति - स्वातंत्र्याचा संकोच म्हणजे सांस्कृतिक सृजनशीलतेला लागलेले ग्रहणच म्हणावे लागेल. जेथे सृजनशीलताच संपली तेथे सांस्कृतिक विकासही थांबला असे म्हणावे लागते. किमान गरजा पशूच्याही भागू शकतात. केवळ किमान गरजा भाग-

ल्याने सृजनशीलता निर्माण होत नाही किंवा सांस्कृतिक विकासही होऊ शकत नाही. मनुष्य यंत्राचा फक्त एक भाग बनून राहील व आयुष्यभर एक रटाळ जीवन त्याच्यां नशिबी येईल.

अशातच १९३६ साली साम्यवादी रशियांत भयानक कत्तली झाल्या व "साम्यवादी" विचारांचा साचेबंदपणा नाहिसा करण्याचा विचार करणाऱ्या समाजवादी विचारांच्या लोकांत मोठी खळबळ माजली. समाज जीवनाचा साचेबंदपणा टिकविण्यासाठी चौकटी बाहेर गेलेल्यांना देहांत शासन देऊन साम्यवादी सरकारने विरोध निपटून काढावा हे बुद्धिवंतांना पटण्यासारखे नव्हते.

जशी भांडवलशाही, अत्यंतिक व्यक्तिवादास कारणीभूत होते व समाजास घातक ठरते तसेच साम्यवाद समाजविकासाच्या नांवाखाली व्यक्ती स्वातंत्र्यास बाधा आणू शकतो हे स्पष्ट झाल्यानंतर, व्यक्तिविकास समाज-विकासास बाधा न आणता होऊ शकेल व समाजविकास हाही व्यक्ति स्वातंत्र्याचा बळी घेणार नाही अशी समाज रचना निर्माण करण्याकरितां लोकशाही-समाजवादी तत्त्वज्ञान विकसित होत आहे

"भांडवलशाहीच्या नाशाची बिजे तिच्या विकासातच असतात" असे मार्क्सने नमूद केल्याचा प्रत्यय विसाव्या शतकाच्या सुरवातीसच येऊ लागला. जर्मनीत ही परिस्थिती निर्माण झाली. तेथील मजूर संघटीत झाला पण साम्यवादी क्रांती मात्र रशियांत "शेत कामगारांनी घडवून आणली". शेतकामगार क्रांती घडवून आणू शकतो हे लक्षात आल्यावर भांडवलशाही देशांनी कामगार संघटनांच्याकडे थोडे उदारमतवादी धोरणाने पहावयास सुरुवात केली.

शासन संस्था ही फक्त "शासन" करण्याकरिता जन्मलेली नसून ती लोककल्याणही करू शकते हा विचार बळावू लागला कामगार संघट-नांच्या दबावामुळे त्यांना सुधारित वेतनश्रेणी देणे, त्यांच्या रहाणीमानांत सुधारणा करणे, कामाचे तास कमी करणे, बोनस देणे हया गोष्टी मान्य होऊ लागल्या व त्यामुळे "शोषणा"चे प्रमाण कमी होत चालले.

ह्यातूनच "कल्याणकारी राज्या"च्या कल्पनेचा जन्म झाला व "शोषित" समाजाकडे पाहण्यांची शासनाची दृष्टी बदलत चालली. मग मागासवर्गांना आर्थिक सवलती, शिक्षणाच्या सोयीं करणे, घरे पुरविणे राहण्याच्या सोयी करणे, वैद्यकीय सोयी उपलब्ध करून देणे इ. लोक कल्याणाचे मार्ग शासनाने अवलंबिल्यामुळे मावर्सप्रणित "अतिरिक्त मूल्यांच्या" सिद्धांतावर परिणाम झाला व मावर्सच्या म्हणण्याप्रमाणे भांडवलशाही न कोसळता आपल्या भरभक्कम पायावर, समाजाचा विकास साधण्याचा प्रयत्न करीत उभीच राहिली.

साम्यवादाने शोषणमुक्त समाज निर्माण केला पण व्यक्तिस्वातंत्र्यावर आलेल्या बंधनामुळे व्यक्तिविकासाचे सर्वच मार्ग कुंठित केले. एका दृष्टीने अधिकारांच्या व सत्तेच्या केन्द्रीकरणामुळे भांडवलशाही राजवट व व साम्यवादी राजवट ही "हुकूमशाही" बनूनच राहिली.

ह्या हूकूमशाही राजवटीतून व्यक्ती व समाज मुक्त करण्याकरिता समाजवाद्यांनी राजकीय व आर्थिक पुनर्रचनेचा कार्यक्रम हाती घेतला. प्रथम विचार करावा लागला तो वापरावयाच्या साधनांचा.

क्रांतीकरता वापरावयाचे साधन हे शांततेचे असावे असे समाजवाद्यांनी मान्य केले. हुकूमशाही देशातल्या क्रांत्या ह्या शस्त्रबळावर व रक्तपातानेच झाल्या, ज्यात राष्ट्रीय संपत्ती, व्यक्ती व समाज ह्यांचा निष्कारण बळी गेला. हा बदल वा ही क्रांती शांततामय मार्गाने व्हावयाची असेल तर त्याकरितां तसेच साधन वापरावयास हवे. म्हणून "निवडणूका" मान्य केल्या. निवडून यावयाचा उमेदवार या मुद्यांवर निवडणूक लढवू इच्छितो तो मुद्दा मते मिळविण्याकरितां, लोकांना समजावून सांगणे ओघानेच आले म्हणजे "लोकशिक्षण व समाज-प्रबोधन" ह्या आवश्यक बाबी आल्याच. आर्थिक व शासकीय केन्द्रीकरणामुळे "हुकूमशाही" निर्माण होण्याचा धोका असतो हे लक्षांत घेऊन 'आर्थिक व शासकीय विकेन्द्रीकरण" मान्य करण्यात आले. सैन्यात फूट पाडून अथवा हिंसेच्या मार्गाने क्रांती न आणता ती सर्व साधारण माणसाच्या सृजनशील शक्तीतून प्रकट व्हावी हा प्रयत्न झाला.

गरिबांचा पूर्ण वेळ प्राथमिक गरजा भागविण्यात जातो. त्यामुळे प्राथमिक गरजा भागविण्याची जबाबदारी "लोकशाही-समाजवादी" व्यवस्थेने पत्करली. नवीन आकांक्षांमधून नवीन संस्कृती निर्माण होते. सृजनशीलतेतून नवीन विकासाप्रत समाज जात असतो. हे घडविण्याची जशी लोकशाही समाजवाद्यांची प्रतिज्ञा आहे तसेच, शोषणमुक्त समाज निर्माण करणे, भांडवलशाहीचा नाश करणे व विकेंद्रीकरण साधून, केन्दीकरणामुळे होणाऱ्या हुकूमशाहीकडील वाटचालीला रोखणे ही देखील समाजवाद्यांची प्रतिज्ञा आहे.

विज्ञानाच्या प्रचंड वेगामुळे पोथिनिष्ठा निरर्थक ठरत आहे, म्हणूनच सत्याचा सातत्याच्या सिद्धान्तावर समाजवाद्यांची अविचल निष्ठा आहे.

शासनाच्या विकेन्द्रीकरणाकरिता डॉ. राममनोहर लोहिया ह्यांनो "चौखंबी शासन यंत्रणा" सूचविली आहे. केन्द्र, राज्य, जिल्हा व ग्राम अशा चार स्थरांवर ही यंत्रणा काम करील. "ग्राम सभेतून सर्वांनी एकत्र बसून घेतलेले निर्णय हा लोकशाही प्रस्थापनेचा फार मोठा भाग आहे. संवेदनात्मक सरकारला ह्या निर्णयाची दखल घ्यावी लागेल व केन्द्रीकरणाचा धोकाही त्यामुळे टळू शकेल.

आर्थिक पुनर्रचनेच्या बाबतीत कमाल व किमान वेतनाचा सिद्धान्त समाजवाद्यांनी मान्य केला आहे व हा फरक १:१० पेक्षा जास्त असणार नाही. सर्वसामान्यांना पूरक होईल असे, अल्पप्रमाण, आधुनिक यंत्राचा उपयोग, व्यक्तिविकास व समाजविकास ह्यांच्या संतुलनातून व सृजनशील शक्तींचा उपयोग करून साधला जाणारा सांस्कृतिक विकास, आर्थिक व शासकीय विकेन्द्रीकरणामुळे, हुकूमशाहीपासून, अलिप्त होऊन, निर्माण झालेला शोषणमुक्त लोकशाहीवादी समाज, विकसनशील देशाबद्दल प्रेम व म्हणूनच समाजवादाचा परिस्थिती सापेक्ष विचार, हो लोकशाही समाजवादी विचारधारधारा म्हणता येईल.

क्रांतीकारी नव मानवता-वाद

भारतांतील बुद्धिवादी लोक स्वतःस "रॉयीस्ट" म्हणून घेण्यांत धन्यता मानतात. मानवेंद्रनाथ राय हे प्रखर बुद्धिवादी. त्यांनी प्रसृत केलेल्या तत्त्वज्ञानाची पकड फार थोडचा लोकांपर्यन्त पोहोचली हे खरे असले तरी त्यांची तात्त्विक भूमिका ही सुस्पष्ट, कणखर व मानवतावादी विचारांना सामोरी जाणारी होती हे नाकारता येणार नाही.

मानवेंद्रनाथ रॉय ह्यांचे मूळ नांव नरेंद्र भट्टाचार्य, लहानपणीच क्रांतिकारक चळवळीत ते ओढले गेले व ब्रिटीशांनी चालविलेल्या अन्यायाचा प्रतिकार करीत असतांना, कोठे क्रांतिकार्याकरिता पैसे जमव, शस्त्रे जमव, शस्त्रे जमव, हातबॉम्ब तयार करण्याच्या विद्येचा प्रसार व प्रात्यक्षिक इ. कामांत ते पकडले गेले पण पुरेसा पुरावा न मिळाल्यामुळे सुटले व क्रांती-कार्याशी संबंध ठेवून असल्यामुळे शस्त्रे आणण्याकरिता "जावा" येथें त्यांची रवानगी झाली. शस्त्रास्त्रांची निटशी जुळवाजुळव न होऊ शकल्यामुळे ते भारतात न परतता पाश्चिमात्य राष्ट्रांत गेले. मार्क्सच्या सिद्धान्ताचा

परिणाम त्यांच्यावर होऊन ते कट्टर मार्क्सचे पुरस्कर्ते बनले. मेक्सिकोत कम्युनिस्ट पक्ष कायम करणे, वाढविणे व प्रसार करण्याचे महत्त्वाचे काम त्यांनी केले. केन्द्रीय कम्युनिस्ट पक्षाच्या पोलिट ब्युरो चे ते सभासद होते. तेथून माओत्सेतुंगला मदत करण्याकरिता त्यांची चीनला रवानगी झाली. पण तोवर, अनुभव, वाचन आणि चिंतन ह्यामुळे त्यांची मने मार्क्सच्या चौकटीबाहेर डोकावू लागली होती. त्यामुळे तेथे जास्त दिवस न राहता ते भारतात परतले व त्यांनी स्वतंत्र पक्षाची स्थापना केली. (रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टी). कांही दिवस त्यांनी कॉंग्रेसशी सहकार्य करण्याचा प्रयत्न केला पण तेथेही त्यांचे न पटल्यामुळे त्यांनी आपला पक्ष स्वतंत्रपणे जोपासला. भारतांतही त्यांना बराच काळ तुरूंगात काढावा लागला. ह्या काळांत त्यांचे लेखन व वाचन सतत चालू असे. १९५४ मध्ये त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या विचारांचे पैलू बुद्धिवादी माणसाला कसे आकर्षक ठरले हे पाहिले म्हणजे ह्या गृहस्थाच्या चिंतनाची व प्रखर बुद्धीमत्तेची खात्री पटते.

माणूस हा जन्मतःच बुद्धिवादी असतो हे त्यांच्या विचारांचे पहिले सूत्र. बुद्धी हाच मानवी प्रगतीचा आवश्यक व मूलभूत मानदंड आहे. न्युटने फळ पडतांना पाहिले व गुरूत्वाकर्षणाचा सिद्धान्त मांडला. त्यापूर्वी फळ काय जमिनीवर पडत नव्हते ? पण हा सिद्धान्त मांडतांना कार्यकारण विवेक न्यूटनने वापरला. न्यूटनने वापरलेला विवेक हा "ईश्वरी संकेत" किंवा "दैवी देणगी" नसून तो बुद्धीचाच निष्कर्ष आहे. बुद्धीची झेप ही अमर्याद असते. ही बुद्धीची अमर्याद झेप माणसाला प्रगतीकडे नेते. जेथे बुद्धी थांबते तेथे "श्रद्धा" सुरू होते. ही श्रद्धा प्रगतीची दारे बंद करते व परागतीस नेते, म्हणूनच प्रगतीकडे जाण्याकरिता प्रत्येक व्यक्तीने आपल्या बुध्दीचा विकास व वापर केला पाहिजे तसेच तो मुक्तपणे करू देणारे शासनही लाभले पाहिजे,

आपली बुध्दी वापरण्यांचे मुक्त अवधान व्यक्तीस लाभावे ह्या करितां संपूर्ण व्यक्तिस्वातंत्र्य आवश्यक आहे, म्हणूनच "व्यक्ति स्वातंत्र्य" हे त्यांनी सर्वश्रेष्ठ मूल्य मानले. व्यक्ति स्वातंत्र्याच्या आड येणाऱ्या गोष्टींची त्यांनी मोठ्या विचारपूर्वक मैत्री केली. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे व्यक्ति

स्वातंत्र्यास पहिला अडथळा होतो शासनाचा. रॉय पूर्वाश्रमीचे मार्क्सिस्ट. कम्युनिस्ट "हुकूमशाही" त्यांनी अनुभवलेली. तशातच विसाव्या शतकाच्या प्रारंभी पाश्चिमात्य देशांतील "व्यक्ती" स पिळून काढणारी भांडवलशाहीही त्यांनी पाहिलेली. ह्या पार्श्वभूमीवर त्यानी त्या काळांत मांडलेला शासनाबद्दलचा विचार हा क्रांतिकारकच म्हणावा लागेल. ह्याच विचारातून लोकशाही समाजवाद व विकेंद्रित राज्यव्यवस्था उदयास येत आहे व व्यक्ति-स्वातंत्र्य जास्तीत जास्त अबाधित कसे ठेवता येईल व व्यक्तीस आपल्या बुध्दींचा जास्तीत जास्त कसा मुक्त वापर करता येईल, ह्याचा शासन विचार करीत आहे, हे रॉय नी दिलेल्या विचारांमुळेच असे म्हणावे लागेल !

धर्म हा एक व्यक्तीस्वातंत्र्यास अडथळा त्यांनी मानला आहे. पौर्वात्य व पाश्चिमात्य राष्ट्रांत धर्म हा नेहमीच बलवानांच्या मागे उभा राहिलेला आपण पाहतो. दिन-दलित दुबळे ह्यांना धर्माने कधीही दिलासा दिला नाही उलट त्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेण्याकरिताच धर्माचा उपयोग केला गेला आहे. सध्याच्या जिवनांतही धर्म ही श्रध्दा व अंधश्रध्दा बळावणारी बाब आहे हे आपण पाहतो व ती अंधश्रध्दा व्यक्तीस आपली बुध्दी वापरण्या-पासून परावृत्त करते हे नाकारता येणार नाही.

विवाह, कुटुंब संस्था, वर्ग व समाज हा बुध्दिवादातील आणखी एक अडथळा त्यांनी मानला आहे. रुढी, परंपरा व वर्णव्यवस्था वा वर्गव्यवस्था ह्यांनी जखडलेला समाज जेव्हा एखाद्या बंधनाने व्यक्तीस जखडून ठेवतो तेव्हा ती व्यक्ती ही त्या रूढीपरंपरेची भागीदार बनते व ती बंधने तोडणे तीस कठीण जाते. अशा कृत्रिम बंधनांनी जखडलेली व्यक्ती आपल्या बुध्दीचा वापर करण्यास असमर्थ ठरते व पर्यायी प्रगतीस अडथळे आणते. प्रगतीतील हे अडथळे दूर करण्याकरिता ही बंधनेच नाहीशी केली पाहिजेत असे त्यांचे स्पष्ट मत आहे.

व्यक्ती, व्यक्तिस्वातंत्र्य व तिच्या बुध्दिमत्तेचा वापर हेच साध्य असावयास पाहिजे. एका विचारांच्या व्यक्ती एकत्र येतात व त्यांच्या एकत्र येण्याने संस्था स्थापन होते. ही संस्था म्हणजे व्यक्तीच्या बुध्दि विकासाचे

साधन होय, साध्य नव्हे, हा विवेक आवश्यक आहे. संस्थेला चौकट निर्माण झाली तर व्यक्तीची बुध्दिमत्ता गुदमरते व ते व्यक्तीस घातक होते. अशा परिस्थितीत संस्था मोडून टाकणेच आवश्यक ठरते. व्यक्तिस्वातंत्र्य हेच मुलभूत व महात्त्वाचे आहे.

त्यांचा संघटित लोकशाहीवर विश्वास आहे. पक्षीय लोकशाहीवर नव्हे. पक्षरहित लोकशाही ही मोकळ्या वातावरणांत होणाऱ्या निवडणुकीतून प्रकट व्हावी व त्यात व्यक्तीस्वातंत्र्याची पूर्ण जपणूक व्हावी हा त्यांचा आग्रह आहे.

आपले आर्थिक विचार प्रकट करतांना त्यांनी भांडवलशाहीस टाकाऊ ठरविले आहे. त्यांच्या मते राष्ट्रातील अर्थव्यवस्था ही सहकारी पध्दतीने व नियोजनांवर भर देऊन आधारलेली असावी. सध्याच्या उत्पादन व विवरण व्यवस्थेत अमूलाग्र बदल त्यांना हवा आहे. सामान्य माणसाला. त्यांच्या नित्याच्या गरजा भागविणाऱ्या गोष्टींच्या उत्पादनावर भर दिला जावा व वितरणव्यवस्था अशी असावी की त्या गरजेच्या वस्तू त्याला परवडणाऱ्या दरांत सहज मिळतील. परदेशी हुंडणावळ जमा करण्याच्या उद्देशाने मोठे कारखाने (हेवी इण्डस्ट्रीज) राबविले जातात व मालाची परदेशी निर्यात करून परदेशातून पैसा गोळा केला जातो किंवा भांडवलदार नफ्याच्या आशेने चैनीच्या वस्तू निर्माण करून त्या भरमसाठ किंमतीस विकतो. ह्यांत भांडवल गुंतून पडले, वरच्या वर्गासच परवडणाऱ्या वस्तूंचे उत्पादन कमी झाल्यामुळे त्याला जास्त किंमत देऊन घ्याव्या लागतात किंवा मिळतच नाहीत. अन्नधान्य, तेल, साधे कापड, छोटी यंत्रे, ह्यांच्या उत्पादनास प्राधान्य दिले पाहिजे. पुरेसे अन्न काढता आले पाहिजे. भांडवलाचा पुरवठा ह्याच गोष्टींवर लक्ष केन्द्रित करून केला पाहिजे व नियंत्रित दरांत ते सामान्य माणसास सहज उपलब्ध झाले पाहिजे हे त्यांचे विचारांचे सूत्र. समाजवादी सरकारेही आज ह्याच पध्दतीने विचार करीत आहेत.

वसाहतवाद व वांशिकवाद ही मानवाला संकुचित करून त्याच्या प्रगतीत अनेक बंधने व अडथळा निर्माण करतात त्यामुळे ह्यांचा त्याग तर केलाच पाहिजे शिवाय माणसाने राष्ट्रवादाच्याही मर्यादा उल्लंघन करून सर्व

जगातील माणूस हा प्रथम माणूस आहे हा विचार केला पाहिजे. मानवतावादी बनले पाहिजे.

राय हे कट्टर मार्क्सवादी पण विचारांनी हा मार्क्सवाद सुधारित केला पाहिजे हा सिध्दान्त त्यांनी मांडला. ज्या काळांत त्यांनी हे सांगितले त्या काळांत "मार्क्सवादाची" पकड जगांतल्या सुशिक्षित तरुणांच्या मनावर एवढी जबरदस्त होती की, रॉयच्या हचा विधानाचा कोणी गांभीर्याने विचार तर केला नाहीच व उलट त्यांच्या वाटेला फार मोठी हेटाळणी आली. काळ बदलला, परिस्थिती बदलली तसे रॉयच्या म्हणण्यांतील सत्य लोकांना पटू लागले. इतिहासाची सडवादी भूमिका, द्वंद्वात्मक भौतिकवाद, पोथिनिष्ठा हचांचे पुन्हा एकदा संशोधन करून सुधारित मार्क्सवाद तयार करता येईल हा त्यांचा विश्वास होता.

रॉयनी विचार केला तो सर्व बुद्धीच्या पातळीवर, पण त्याला त्यांची स्वतःची तपश्चर्या, प्रत्यक्ष कार्यानुभव, वाचन, चिंतन व मानवी स्वभावाच्या पैलूंचे निरीक्षण हचांची फार मोठी साथ होती हे विसरता येणार नाही.

त्यांचे सर्वच विचार सर्वांना सारखे पटणे शक्य नाही पण ते वाचत असतांना ह्या गृहस्थाच्या बुध्दीमत्तेच्या अलौकिकतेची कल्पना येते व आजचे जग त्याच विचारांच्या दिशेने जात असलेले पाहून हचा महान व्यक्तीचे द्रष्टेपण जाणवते.

●●●

गांधी-वाद

"गांधी-वाद" हा शब्दप्रयोगच एका दृष्टीने अप्रस्तुत वाटतो. ज्या पध्दतीने म. गांधीनी विचार केला त्याच पध्दतीने ते वागले. त्यामुळे त्या पध्दतीस गांधी-विचार म्हणणे जास्त योग्य होईल. प्रत्यक्ष महात्माजींनाही "वाद" किंवा "तत्त्वज्ञान" हा शब्दप्रयोग न रुचणारा होता. "वाद" म्हटले की त्याला विचारांची चौकट आली. चौकटीत बंदिस्त केलेले तत्त्वज्ञान "पोथीनिष्ठे" ला जन्म देते, असे ते म्हणत स्वत: महात्माजी पोथीनिष्ठेच्या विरुध्द होते. त्यांचा विचार-विकास हा अनुभवजन्य आहे. ते म्हणत "माझे पहिले विधान व दुसरे विधान ह्यात विसंगती असेल तर नंतरचा विचार खरा मानावा" ह्याच कारणामुळे त्यांचे निकटचे सहाध्यायी श्री. किशोरीलाल मशुवाला किंवा विनोबाजींनी त्या विचारांना तत्त्वज्ञानाच्या चौकटीत बसविण्याचा प्रयत्न केला नाही त्यांनी फक्त गांधीविचार मांडला. गांधीवादाबद्दल मात्र कांही लिहीले नाही.

इंग्लंडमधून बॅरिस्टर होऊन आल्यानंतर व्यवसायानिमित्त ते दक्षिण आफ्रिकेत गेले. काळे-गोरे वाद आफ्रिकेत बोकाळला होताच पण भारतीय

नागरिकांना इंग्रज अन्यायाने वागवीत. त्याकरिता आपण कांही करावे असे त्यांच्या मनाने घेतले. जॉन रस्कीन चे "अन् टु दी लास्ट" पुस्तक त्यांच्या वाचनात आले व त्यांचा फार मोठा परिणाम त्यांच्यावर झाला.- सर्वोदयाची – सर्वांचे भले व्हावे ही कल्पना त्यांना रस्किनच्या विचारावरून सुचली. दुसरा मोठा परिणाम त्यांच्यावर झाला तो "टॉलस्टॉय" च्या विचारांचा. माणसाचा माणुसकीने विचार, त्याच्या दुःखाबद्दल करुणा व त्याच्या उध्दाराची – आर्तता माणसाला माणूस म्हणून जगण्याचा मुलभूत हक्क व त्यातून निर्माण होणाऱ्या स्वतंत्र व मुक्त जीवनाचा आविष्कार ह्या प्रेरणा बळावत गेल्या व त्याच्या चिंतनास सुरवात झाली. चिंतन व वृत्ती किंवा विचार व आचार ह्यांच्यात त्यांनी भेद न करण्याचा निश्चय केला. आपल्याकडे आलेल्या लोकांनी वापरलेले "कमोड" (संडास) साफ करण्याचे काम असो किंवा जखमी व आजारी सैनिकांच्या शुश्रुषेचे काम असो त्यांनी मनापासून ते केले व असल्या असंख्य छोटच्या छोटच्या प्रयोगातून त्यांचे विचार विकसित होत गेले व अन्यायाचा प्रतिकार करण्याचा एक नवीन मार्ग, नवा आचार, नवी दिशा त्यांनी जगाला दाखविली. त्यांच्या विचारांचे समाजशास्त्रीय व मानसशास्त्रीय विश्लेषण अनेक त्या त्या विषयांतील तज्ज्ञांनी केलेले आहे.

ज्या कालखंडात म. गांधी जगत होते त्या कालखंडात युरोपांत औद्योगिकरणाची लाट आली होती. एकीकडे औद्योगिकरणामुळे उत्पादन वाढ होत होती तर दुसरीकडे भांडवलशाही विकसित होत होती. भांडवलशाहीत माणुसकीचा जो बळी जात होता ते पाहून मार्क्सचे संवेदनाक्षम मन तळमळले. बारा बारा तास काम करूनही उपाशीपोटी राहणारी, पोटभर अन्न न मिळवू शकणारी लहान लहान मुले, मार्क्सच्या डोळ्यापुढे होती. त्यातून मुक्त होण्याकरिता त्याने साम्यवादाचा सिध्दान्त मांडला, व भांडवलशाही विरुद्ध बंड पुकारले.

म. गांधींच्या मते, साम्यवादाने भांडवलशाहीतील फक्त शोषणाचा विचार केला व आपले तत्त्वज्ञान विकसित केले. त्यांत कामगारांचे पुढे मागे भले होईलही पण "भांडवलदार माणूस" माणूस म्हणूनही नामशेष होईल. त्यांच्याही भल्याचा विचार करायला पाहिजे.

आपल्यापुढे भौतिक समस्या तर आहेतच त्यांचा विचार भौतिक पातळीवरून म्हणजे व्यावहारिक पातळीवरुन होणे आवश्यक आहे. पण ह्याच्याही पलिकडे माणसाला "मन" ही एक बाब असते. तिचाही विचार करावयास पाहिजे. एखाद्या आजारी मुलाची आई शुश्रुषा करते. नर्स ही आईपेक्षा जास्त जाणकार व तिच्या विषयात तज्ज्ञ असते. आईला कांही माहीत नसलें तरी मुलाला आईच्या शुश्रुषेपासून एक निराळाच सुखद अनुभव मिळतो. तो कशामुळे ? आई जवळ आईचे मन असते व ती जे कांही करते ते आपले मन पूर्णपणे त्यांत ओतून ते करीत असते. त्यामुळेच आई व नर्सच्या कामातून मिळणाऱ्या आनंदात थोडासा तरी फरक जाणवतो.

ही मनाची शक्ती - आंतला आवाज किंवा सद्सद्विवेक बुध्दीचा कौल ह्याला राजकारणात महात्माजींनी नुसते स्थानच दिले असे नव्हे तर फार मोठे स्थान दिले. त्यांनी राजकारणांत "निती" आणली किंवा राजकारणाचेही "आध्यात्म" बनविले म्हणतात ते ह्याच अर्थाने

आफ्रिकेत असतांना बोअर युध्दातील "प्रथमोपचार" केन्द्रात काम करण्याची संधी त्यांना मिळाली. अन्यायाचा प्रतिकार करण्याकरिता रणांगणांवर आव्हान करण्याची पद्धती जुनीच आहे. त्यांत सबळ पक्षाचा विजय होतो. विजयी पक्ष आपली बाजू जिंकली गेली असे समाधान मानतो पण ज्या पक्षांवर तो विजय मिळवितो त्या पक्षाच्या मनातील कटुता तो नाहीशी करु शकत नाही. जोपर्यन्त ही कटुता नाहीशी होत नाही तोवर रणांगणावरील विजयाला फारसा अर्थ नाही. हरलेला पक्ष सबळ होण्याचा प्रयत्न करतो, पुन्हा युद्धे होतात - प्राणहानी वित्तहानी उभयपक्षी होते, सबळ पक्ष जिंकतो पण शत्रुत्व कायम राहते. ते पुढील युद्धाची तयारी करु लागते.

हा विचार करून, दोन मानव समुहांत अन्याय दूर करून सामंजस्य निर्माण करण्या करिता मानव समुदाय वर्तनात बदल घडवून आणण्याची त्यांना आवश्यकता वाटली म्हणून त्यांनी पहिल्या प्रथम अंगिकार केला तो "अहिंसेचा" व "सत्याचा" भारतीयांवर होत असलेल्या अन्यायाचा प्रतिकार करण्याकरिता त्यांनी अहिंसेचा मार्ग स्वीकारला व सत्याचा आग्रह धरून इंग्रज सरकारवर दडपण आणले त्यांनी विचार कराव्यास भाग पाडले प्रबो-

धन आणि विचारांची कांस धरल्याने झालेल्या बदलात, दोन्ही पक्षाचे मानव समूह परस्परांजवळ येत व परस्परांस समजून घेत गेले. यथार्थ विचार करण्यास प्रतिपक्षाला सहयोग देणे हे एक सूत्र त्यांनी मांडले व अवलंबिले. अहिंसा व सत्याग्रहाचा मार्ग अन्याय निवारण करण्याकरिता वापरून राजकारणांत निती व शुचिता आणली.

अशा प्रकारे "सत्याग्रहा" चा जन्म द. आफ्रिकेत झाला. नंतर महात्माजी भारतात आले व १९२० नंतरभा रतीय राजकारण सर्व दृष्टींनी त्यांनी व्यापून टाकले. भारत देश गरीब, माणसाला पुरेसे कपडे अंगावर घालणे ही परवडत नाहीत म्हणून त्यांनी मोजके कपडे, धोतर पंचा एवढेच वापरावयाचे ठरवले. स्वत: कष्ट करुन मिळविलेल्या वस्तूवरच आपला अधिकार आहे हे मनाला पटलेले असल्यामुळे स्वावलंबन व स्वदेशीवर त्यांनी भर दिला. स्वत: चरख्यावर सूत काढून ते विणून तेवढेच कपडे आयुष्यभर त्यांनी वापरले व स्वत:च्या आचरणातून एक फार मोठा आदर्श देशातील जनतेपुढे ठेवला. चैनीची तर कोठलीच वस्तू ते वापरत नसत, आवश्यकतेपेक्षा जास्त वस्तूंचा उपभोगही ते त्याज्य समजत असत, खऱ्या अर्थाने साधी राहाणी, उच्च विचारसरणी, सत्य, अहिंसा, त्याग ह्यांचा अवलंब व हे सर्व राजकारणाशी मिसळून चालत असल्यामुळे त्यांच्या प्रत्येक विचार आचारांत नितीमत्तेचे फार मोठे बल मिळत गेले.

त्यांनी आपल्या कार्याच्या दिशेचे चार पैलू मानले.

(१) सत्याग्रह :- मानवसमूहांत सत्य-अहिंसेने केवढी तरी शक्ती निर्माण होऊं शकते ह्याचा प्रत्यय भारतीय राजकारणांत त्यांनी आणून दिला. इंग्रजांनी केलेला कायदा जेव्हा अन्यायाचा वाटत असेल तेव्हां त्यावरुन 'सत्याग्रह' करण्याचा आदेश त्यांनी जनतेस दिला. भारतात 'मिठाचा' सत्याग्रह हा १९३० साली झालेला देशव्यापी पहिला सत्याग्रह आहे. 'मीठ' हे गरीब माणसाचेही खाणे आहे. त्यावर सरकारने कर लावूं नये, ते सर्वांना मिळालेच पाहिजे हा त्यांचा विचार जनतेने आत्मसात केला व मीठागरांवर जाऊन मूठ मूठ मीठ कर न देता आणले, सरकारी कायदा मोडला व जनतेने आपली मागणी व्यापक स्वरुपांत, कृतीने शासनापुढे मांडली. हजारो

लोक सत्याग्रहांत सामिल झाल्यामुळे सरकारला ह्या गोष्टीची दखल घ्यावीच लागली व कित्येकांना पकडून त्यांनी तुरुंगात टाकले, कित्येक ठिकाणी सत्त्याग्रह दडपण्यासाठी लाठीहल्ले केले. अहिंसा हा चळवळीचा स्थायीभाव असल्यामुळे लोकांनी लाठीमार सहन केला पण त्याला हिंसेने प्रत्युत्तर दिले नाही. तुरुंगांत गेल्यानंतर तेथील सर्व कायदे पाळावेत हा त्यांचा दंडक असे. त्यामुळे एककिडे नको असलेला कायदा मोडणे, दुसरीकडे तुरुंगांतील कायद्याचे काटेकोर पालन करणे व लाठीमारासारख्या दडपशाहीस मनोबलाने तोंड देणे अशा प्रकारचा 'सहिष्णुतेचा' व मनोबल वाढविण्याचा अद्वितीय प्रयोग ह्या भूमीवर झाला. जेव्हां जेव्हां आपल्या चळवळीत हिंसा ही जनतेकडून झाली असे त्यांच्या लक्षांत आले तेव्हां त्यांनी सत्याग्रह थांबविला आहे. ह्या प्रयोगामुळे जनतेचे प्रबोधन होत गेले, मनोबल वाढत गेले व अन्यायाचा प्रतिकार करण्याचा निती व शुचिता असलेला नवीन मार्ग जगांतील दडपलेल्या लोकांना उपलब्ध झाला.

भक्त प्रल्हादानेही सत्याचा आग्रह धरला होता. 'सत्य' त्याच्या बाजूने होते म्हणून तो अखेरीस विजयी झाला. भक्त प्रल्हादाचा हा सत्याग्रह वैयक्तिक पातळीवर झाला. त्याला सामूहिक पातळीवर नेण्याचे काम म. गांधींनी केले.

(२) दुसरा पैलू म्हणजे सर्वोदय मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा विजय कम्युनिस्ट क्रांतीत झालेला त्यांनी पाहिला. पण ह्या क्रातीनंतर व क्रांतीकाळांतील हत्याकांड त्यांना नामंजूर होते. भांडवलशाहीतील मालक-मजूर संघर्ष त्यांना अभिप्रेत होता. ह्या संघर्षात भांडवलशाही नष्ट झालेली त्यांना मान्य होती. पण भांडवलशाही नाहीसी करणे म्हणजे, त्या वृत्तीला नाहीसे करणे नव्हे, हा विचार, विरोध निपटून टाकण्यासाठी, कोणीही क्रांतिपर्वात झाला नाही. म गांधींना भांडवलदार, भांडवलदार म्हणून नव्हे तर माणूस म्हणून जगायला हवा होता व माणसाचा माणूस म्हणून जगण्याचा अधिकार त्यांना मान्य होता. सर्वांचेच भले व्हावे. सर्वेपि सुखिनः सन्तुः अशा प्रकारच्या मानवतेचा महान् साक्षात्कार घडविणारा हा त्यांच्या विचारांचा पैलू आहे.

(३) त्यांच्या विचारांचा तिसरा पैलू म्हणजे समन्वय. राज्यकर्ते व सामान्य जनता, भांडवलदार व कामगार सुष्ट किंवा दुष्ट अशा परस्पर विरोधी प्रवृत्ती समाजात असतात त्यांना ते रावण–राम असे म्हणत. समाजाचे भले व्हायचे असेल तर ह्या दोन प्रवृत्तीमधले अंतर कमी केले पाहिजे, त्यांना जवळ आणले पाहिजे. त्यांचे आपआपसांतील गैरसमज कमी करून त्यांना जवळ आणतां आले तर त्या घटकांना परस्परांच्या सुखदुःखाची जाणीव होऊन त्यामधून परस्पर सहानुभूतीमुळे, समाज जीवन कमी संघर्षाचे व जास्त एकात्मतेचे होईल ही त्यांची कल्पना आहे.

(४) साम्ययोग :– हा त्यांच्या विचारांचा चौथा पैलू, साम्ययोग म्हणजे समानता. कम्युनिस्ट राज्यांची उदाहरणे त्यांच्या डोळ्यासमोर असल्यामुळे हीं समानता एकाच विचाराच्या मुशींतून काढलेल्या माणसासारखी असावी ह्या मताच्या ते विरुद्ध होते. माणसा माणसाच्या प्रवृत्तीत फरक असणार त्यामुळे प्रत्येक माणूस हा निरनिराळ्या प्रकारचा असणार हे त्यांना मान्य होते. पण ही असमानता किती असावी ? ही असमानता आपल्या हाताच्या बोटांसारखी असावी असे ते म्हणत. हातांची बोटे सारख्या आकाराची नसतात पण त्यामुळेच त्यांना एकत्रित काम करणे सोपे जाते. माणसांचे लहान मोठेपण हे असेच समाजाला पूरक असावे.

हा सिद्धान्त विस्ताराने मांडत असतांना विकासाच्या समान संधी सर्वांना उपलब्ध असाव्यात ह्यांवर त्यांनी जोर दिला आहे. त्याकरिता उत्पादनाची साधनेही 'समाजाची' असावीत असे ते म्हणतात. ह्या देशांतील भांडवलदारांनी समाजाचे 'विश्वस्त' म्हणून काम करावे असे त्यांचे मत होते.

वरील चारही विचारांच्या पैलूतून एक नवीन शोषणहीन, सामंजस्य व समानता असणाऱ्या समाजाची निर्मिती होईल हा त्यांचा विश्वास अनाठायी म्हणता येणार नाही.

ह्या परिवर्तनाप्रत जाण्याकरितां त्यांनी तीन साधने वापरली.

(१) वेद, बायबल, कुराण अथवा मार्क्सचे तत्वज्ञान हे एका

विशिष्ट परिस्थितीत समाजास मार्गदर्शन करण्याकरितां निर्माण झाले. ती मार्गदर्शक तत्त्वे बदलत्या काळांत व बदलत्या परिस्थितींत तंतोतंत लागू पडणे अशक्य आहे. ते तंतोतंत लागू करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे 'पोथिनिष्ठा आली व पोथीनिष्ठ माणूस हा आपल्या चौकटीत पण बदललेल्या परिस्थितीतून व समाजापासून निराळे व दूरस्थ जीवन जगत असतो. ह्या पोथीनिष्ठेतूनच ग्रंथप्रामाण्य व संप्रदायवादाची निर्मिती होते व माणूस डोळे बंद केलेल्या बैलाप्रमाणे घाण्याभोवती फिरत राहतो. नवीन विचार आत्मसात करण्याची वा रुजविण्याची क्रिया बंद पडली की प्रगतीही थांबते व प्रगतीहीन समाज नष्ट होण्याच्या मागे लागतो. हे व्हावयाचे नसेल तर ग्रंथातले चिरकाळ टिकणारे सत्य तेवढे आत्मसात् करावे व ह्या ग्रंथाचे प्रयोजन संपले आहे असे समजून अनुभव, विचारातून समृद्ध होणाऱ्या नवीन जीवनाची वाटचाल करावी. संप्रदायवादांतून बाहेर पडण्याचा हा एकमेव मार्ग आहे. सर्व धर्मग्रंथांचे सत्य ते सार पचवून आपण त्या चौकटीबाहेर पडूं तेव्हांच सर्व मानव समाज एकत्र येऊं शकेल व आपापसांत जवळीक व सामंजस्य निर्माण करुं शकेल व खऱ्या अर्थाने "सर्व धर्म समभाव" ह्या अवस्थेप्रत आपण येऊन पोहचूं.

(२) त्यांचे दुसरे साधन म्हणजे विज्ञान : विज्ञानामुळे मानव हा निसर्गातील अन्तर्गत व बाह्य शक्तींचा शोध घेऊं शकतो. विज्ञानाचा अंतर्गत शोध हा निरनिराळ्या यंत्रांना जन्म देण्यास, त्यामुळे उत्पादन साधने वाढविण्यास मदत करूं शकतो. यंत्रे ही मानवांच्या भल्याकरितां आहेत हा विवेक सतत जागृत ठेवावयास पाहिजे, तरच त्या शक्तींचा कोणत्या हद्दीपर्यन्त उपयोग करावयाचा त्याचे भान राहते, मानवच जेव्हां यंत्राला शरण जातो तेव्हां यंत्रे त्यांच्यावर स्वार होतात व त्यांतून भांडनलशाही सारख्या दुष्ट आर्थिक प्रवृत्ती व ॲटमबॉम्बसारखी विनाशी शस्त्रे निर्माण होऊन जगाच्या संहाराची वाटचाल सुरु होते. हे व्हावयाचे नसेल तर परिग्रहात्मक शक्तीचा नाश, सर्जनशील शक्तींचा विकास व विज्ञानासंबंधी विवेकशीलता ही आवश्यक आहे.

प्रत्यक्ष मनुष्य ज्या गोष्टी करूं शकतो त्यापेक्षां जास्त गोष्टींची तो

कल्पना करुं शकतो. चांगल्या गोष्टींची कल्पना करणे ही अध्यात्मिक सर्जनशीलताच आहे. सर्व मानवांच्या भल्याचा विचार करण्यास हीच प्रवृत्ती कामी येते.

(३) राजकारणात दोन किंवा अधिक पक्ष असतात. सर्व पक्षांचे ध्येय समता व समृद्धी हेच असले तरी त्यांचा एकमेकांवर विश्वास नसतो. हा एकमेकांबद्दल विश्वास निर्माण करणे हे महात्माजींना अत्यंत आवश्यक वाटते. त्यावरुनच त्यांनी ग्राम स्वराज्याची कल्पना विकसित केली. गांवांचे भले सर्वांनाच करावयाचे असते. त्याचा विचार निरनिराळे पक्ष आपापल्या कचेरीत आपआपल्या पद्धतीने करतील. त्या ऐवजी त्या सर्वांनी एकत्र बसून विचार करावा, चर्चा करावी व एकमताने निर्णय घ्यावा हे त्या विचारांचे सूत्र. येथें परस्परांवरील अविश्वास संपून विश्वासाचे वातावरण निर्माण होते व ह्या विश्वासाच्या वातावरणांत पक्षांचीही समाप्ती होते. ह्या साधनांस त्यांनी 'लोकनीती' म्हटले आहे. शासनविरहित व वर्गविरहित समाजाच्या रेखाटलेल्या चित्रांशी हयाची तुलना करता येईल.

महात्माजींच्या राजकारणाचे एक महत्त्वाचे अंग म्हणजे "विधायक कार्यक्रम" जेव्हां जनतेची पुरेशी मानसिक तयारी अन्यायाचा प्रतिकार करण्याची झाली आहे असे त्यांना वाटले तेव्हां त्यांनी जनतेला सोबतीस घेऊन 'सत्याग्रह' केला. सर्व शक्ती सत्याग्रहांत वापरली. आपली शक्ती येथे पूर्ण कामी आली आहे असे समजल्यानंतर त्यांनी सत्याग्रहे थांबविला आहे. सत्याग्रहाच्या काळांत तुरुंगांत गेलेली मंडळी, तुरुंगातून बाहेर आल्यानंतर त्यांना त्यांनी 'विधायक कार्या'चा आदेश दिला आहे. हे कार्यकर्ते विधायक कार्यांच्या मागे लागल्यामुळे त्यांना अनेक कार्यकर्ते आपल्या भोंवती जमा करता आले. त्याना विचाराची दिशा देतां आली व पुन्हां एकवार निर्माण झालेली ही जनजागृती व जनशक्ती, सतत जनतासंपर्क कायम ठेवण्यास तर उपयोगी पडलीच पण पुढील चळवळीतही वापरता आली.

महात्माजींच्या मते 'विधायक काम' म्हणजे परिवर्तनाचे काम, साधे लोकसेवेचे काम, दुष्काळात लोकांनां मदत देणे. वैद्यकीय मदत पुरविणे. इ.

फक्त मदतीची कामे आहेत. ती अवश्य करावीत. महात्माजींना अपेक्षित असलेले विधायक कार्य हे नेहमी परिवर्तनाशी जोडलेले असते व अपेक्षित परिवर्तन साधता येईल. त्यालाच त्यांनी विधायक कार्य ही संज्ञा दिली आहे. मग ती अस्पृश्यता मोहीम असेल, स्वदेशी वस्तूंचे उत्पादन केंद्र असेल, प्रशिक्षणाचे व प्रबोधनाचे वर्ग असतील किंवा राष्ट्रीय शाळा असतील. ह्या कार्याभोंवती जमा झालेले कार्यकर्ते हा सामाजिक व राजकीय परिवर्तनाचा मंत्र घेऊन आपआपले कार्य करीत असतांना आपण त्यांत फारसे गुंतून पडणार नाही ह्याची काळजी घेत. महात्माजींची हांक आल्याबरोबर हे कार्यकर्ते सत्याग्रहासारख्या कार्यक्रमाकरितां धांवून जात व त्यांच्यामागे विधायक कार्यही बिनबोभाट, आपले परिवर्तनाचे कार्य करीत चालू राहत असे. ह्या विधायक कार्यक्रमांतूनच नवसमाज रचनेचा प्रयोग त्यांनी केला. विधायक कार्याची पूर्तता म्हणजे स्वराज्य असे त्यांनी मांडलेले गणित होते व ते खरेही आहे.

ह्या विचारांतूनच 'लोकसेवक संघाची' कल्पना त्यांनी मांडली. एक गांव हे एक केंद्र असावे. तेथे एकच कार्यकर्ता राहावा. त्याने स्वत: सत्ता स्विकारु नये. सत्तेबाहेर राहावे. पण सत्तेला नियमित करावे. सत्ता न स्वीकारता सत्तेला वळन लावावे ही त्यांची अपेक्षा आहे.

महात्माजींच्या दृष्टीने लोकशाही म्हणजे विविध जनसमूहांच्या शारीरिक, आर्थिक व मानवी शक्तीचे जनशक्तींतून लोकशाही प्रकट होते व विकसीत झालेली लोकशाही – शासन अनेक रुपाने विकेंद्रित करीत – शासन-मुक्ती पर्यन्त येऊन पोहचूं शकते.

कोणत्याही साध्याकडे येणारे साधन हे तेव्हढेच चांगले असावे असे त्यांचे मत आहे. त्याला 'साधनशुचिता' म्हणतां येईल, हिंसा वापरून एखादी गोष्ट प्राप्त केल्यास ती दुसऱ्या हिंसेला जन्म देऊं शकते. युद्धांतून युद्धे निर्माण झालेली आपण इतिहासांत अनेक ठिकाणी पहातो.

दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी नेताजी सुभाषचंद्र बोस हे भारताबाहेर जर्मन, जपान (व इटली) च्या सहाय्याने आझाद हिंद फौज उभारुन

भारताच्या स्वातंत्र्याचा एक धाडसी व महान प्रयोग करीत होते. नेताजींच्या राष्ट्रभक्तीबद्दल महात्माजींना यत्किंचीतही शंका नव्हती. पण फॅसिस्टांच्या मदतीने मिळविलेले स्वातंत्र्य फॅसिझमकडे झुकण्याचा फार मोठा धोका त्यांना दिसत होता त्यामुळे हया गोष्टीस महात्माजींना तात्त्विक विरोध होता. स्वाराज्यही जनतेने लोकशाही पद्धतीनेच मिळवावे हा त्यांचा आग्रह हया पार्श्वभूमीवर समजून घेतला पाहिजे.

भारतांतील ऐंशी टक्के जनता खेडयांत राहते. त्याकरितां ग्रामसभा हीं महात्माजींना प्रयोगशाही असावी असे वाटे. एक गांव आपल्या गरजांच्या बाबतींत स्वयंपूर्ण होऊं शकले, तेथील कारभार, सामान्य जनतेच्या हिताच्या दृष्टीने, जनमत आजमावून ग्रामसभा करीत राहिली तर तो स्वराज्याचाच आविष्कार नव्हे काय ? स्वराज्य प्राप्त करण्याचा हा त्यांचा सरळ व सुगम मार्ग होता.

राज्यव्यवस्था विकेंद्रित झाल्यानंतर ग्रामसभेने घ्यावयाचे निर्णय हे एकमताने व्हावेत एवढे जनमानस परस्परांशी समरस झाले पाहिजे असे त्यांना वाटे. ह्या एकमताच्या निर्णयालाच ते एकायतन म्हणून संबोधित.

मनुष्य जीवनाला स्पर्श करणाऱ्या सर्व गोष्टींचा महात्माजींनी फार बारकाईने विचार केला व त्या प्रत्येक विषयावरील आपली अनुभवजन्य मते मांडली. विवाह, शिक्षण. कौटुंबिक संबंध, परराष्ट्रांशी संबंध, राहणी जीवन-मान, लैंगिक कल्पना व ब्रम्हचर्य, श्रम, प्रतिष्ठा, व्यसने, भोजन इ. सर्व बाबतीत त्यांनी बनवलेली मते स्वतंत्र आहेतच पण ती अद्यापही कोणी चुकीची म्हणून दाखवूं शकले नाहीत, लॉटरीबद्दलही बोलतांना "हा अनैतिक पैसा आहे – हयाचा वापर अनैतिक गोष्टींनाच जन्म देईल" असे त्यांनी स्पष्ट म्हटले आहे.

म्हणूनच गांधीवाद हा एक जीवनस्पर्शी विचार आहे असेच म्हणावे लागते. कित्येक अविकसित व विकसनशील देशांनी त्यांच्या विचारांचे मार्ग-दर्शन पत्करले आहे.

●●●

स्वातंत्र्योत्तर भारतीय राजकारण

सतराव्या शतकांत ईस्ट इंडिया कंपनी द्वारे व्यापाराकरिता प्रवेश करून थोडयाच काळांत इंग्रजांनी आपली सत्ता भारतावर आणली. आधुनिक शास्त्र, तंत्र व नवे शोध हयांचा उपयोग राज्य चांगले चालविण्यास होऊ शकतो हे त्यांनी दाखविले. त्यावेळी इंग्लंडमध्ये औद्योगिक विकास होत होता. इंग्लंडच्यां मालाला भारतात त्यांनी बाजारपेठ तयार केली. हजारो कुशल कारागीर भारतात होते पण त्यांना नोकऱ्या दिल्या नाहीत. ह्या देशातील कच्चा माल परदेशी रवाना होत असल्यामुळे येथील उद्योगधंदे बसले, ज्या थोडयाफार उद्योगांनी तग धरला त्यांना माल खपविण्याकरिता बाजारपेठ शिल्लक राहिली नाही. बेकारीची ही अशी सुरवात झाली.

येथील हिंदु-मुस्लिम समाज एकमेकांशी सामंजस्याने वागत असे. हिंदु व मुस्लिम एकत्र येणे हे इंग्रजांना धोक्याचे ठरणारे वाटले. १८५७ मध्ये इंग्रज राज्या विरूद्ध लढल्या गेलेल्या क्रांती युद्धांत त्याचा प्रत्यय आला. व ह्या दोन्ही जमाती परस्परांपासून वेगळ्या पाडण्याचे धोरण तेव्हांपासून इंग्रजांनी स्वीकारले.

१८६१ साली इंडियन पिनल कोडचा कायदा केला तो सर्वव्यापक असून अद्यापिही मान्य केला जातो. राजा राम मोहन राय व त्यांचे सहकारी ह्यांनी भारतीय प्रबोधनाचे कार्य सुरु केले होते. जुन्या दुष्ट रुढी मोडून टाकाव्यात व नवीन ज्ञानाचा फायदा जनतेचा स्तर उंचावण्याकरिता करावा ही त्यांची धडपड होती. १८५७ च्या युद्धानंतर भारतीयांच्या धार्मिक प्रश्नांत लक्ष घालावयाचे नाही असे इंग्रजांनी ठरविले होते तरी राजा राम मोहनराय-च्या दबावामुळे "सती-बंदीचा कायदा" त्यांना करावा लागला. सामाजिक सुधारणेकरिता सरकारी स्तरांवर झालेला हा पहिला प्रयत्न म्हणून नमुद करावा लागेल.

इंग्रजांनी केलेला पिनल कोडचा अंमल व सुरू केलेले शालेय शिक्षण ह्यामुळे सामाजिक समतेचा विचार सुरू झाला. शिक्षित लोकांवर युरोपातील प्रबोधनाचा परिणाम होऊन, नवीन शास्त्रांचा अभ्यास, वैज्ञानिक दृष्टीकोन व भौतिक प्रगती. ह्याकडे सर्वांचे लक्ष केन्द्रित झाले. नवीन विचारांचे वारे इंग्रजांमुळे आपल्या देशांत आले, त्यामुळे भारावून जाऊन त्यालाही "परमेश्वरी कृपा आहे" असे म्हणण्यापर्यन्तही कित्येकांची मजल गेली.

एकीकडे आर्थिक शोषण होत असल्यामुळे व त्याला केवळ इंग्रजच जबाबदार आहेत, ह्याची जाणीव झाल्यामुळे इंग्रजांचे राज्य जाऊन आपले राज्य म्हणजे स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय देश सुखी होणार नाही हा विचार प्रसृत होत होता व राजकीय स्वात्र्यांकरिता कांही प्रयत्न सुरू झाले होते.

केवळ राजकीय स्वातंत्र्य म्हणजेच सर्व कांही नव्हे, समाज सुखी होण्याकरिता सर्व समाजच बदलावयास पाहिजे ही तीव्रतर जाणीव कांही पुढा-ऱ्यांमध्ये होती व त्यांनी त्या दिशेने प्रयत्नचालविले होते, म. फुले ह्यांनी सुरु केलेल्या प्रयत्नास राजर्षि शाहू महाराजांच्या काळांत चांगलेच स्वरूप आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांनी आपले सर्व जीवनच समाज परिवर्तनाच्या कामी लावले. संसदीय मार्गाने स्वराज्य मिळविण्याचा प्रयत्न करणारे गोखले किंवा प्रबोधनाचा मार्ग आक्रमणारे चिपळूनकर, परांजपे, सामाजिक सुधारणांना अग्रक्रम देणारे आगरकर, कर्वे इ. विद्वानांच्या कार्यामुळे सर्व समाजच ढवळून निघाला व जुन्या रूढींची कात टाकून देऊन वैज्ञानिक दृष्टी आत्मसात

करून राजकीय, सामाजिक व आर्थिक स्वातंत्र्याचा विचार निरनिरांळ्या स्तरांवर सुरू झाला.

१९०५ मध्ये वंगभंगाचा प्रश्न निर्माण झाला. वंगभंगाविरूध्द सर्व देश एकवटला. लो. टिळकांनी जनतेचे नेतृत्व केले व प्रथमच "स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे" अशी घोषणा करून भूलमूत हक्कांच्या जाणीवेलाच हात घातला.

१९२० मध्ये म. गांधीचे राजकारण सुरु होऊन स्वदेशी, अहिसा, सत्य हया नैतिक मूल्यांच्या पाठींब्यावर त्यांनी स्वातंत्र्याची चळवळ उभी केली व १९२९ ला लाहोर काँग्रेसमध्ये प्रथमच "संपूर्ण स्वराज्या" चा ठराव मंजूर झाला. ज्याला सर्व भारतीय जनतेने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

बॅ. जिनाच्या मुस्लीम लीगने मात्र १९४० मध्ये स्वतंत्र राज्याची मागणी केली व इंग्रजांनी हा फुटिरपणा पूर्णपणे पोसला. हा देश अखंड राहावा म्हणून बराच प्रयत्न झाला पण तो अयशस्वी होऊन १९४७ च्या १५ ऑगस्ट ला देशाची फाळणी होऊनच स्वातंत्र्य हया देशाच्या पदरांत पडले.

भारत स्वतंत्र झाला व लाखो लोक पाकिस्तानातून निर्वासित होऊन भारतात यैऊ लागले. त्यांचे पुनर्वसन करण्यांत भारताची फार मोठी शक्ती खर्च झाली व नवीन निर्माण झालेल्या पाकिस्तान व हिंदुस्थान हया दोन देशातील कटुता पराकोटीला पोहचली. हया संक्रमणांत किमान पाच लाख लोक मारले गेले व दहा लाख कुटुंबांना निर्वासित होऊन आपली सर्व मिळकत पाकिस्तानात सोडून भारतात यावे लागले त्यामुळे भारतातील वातावरण प्रक्षुब्ध होणे अनिवार्य होते हया निर्माण झालेल्या कटुतेनेच महात्मा गांधींचा बळी घेतला व निराशामय वातावरणाने देशाला पछाडले.

तशातच मुजाहिदांच्या रुपाने पाकिस्तानने आपले सैन्य काश्मीर-मध्ये घुसविले, काश्मीरच्या महाराजांची तीव्र इच्छा, स्वतंत्र राहण्याचीच होती पण हया आक्रमणामुळे ऑपण टिकू शकत नाही हे लक्षात येताच

भारतात सामिल होण्याचे मान्य केले. महाराजाकडून सूचविण्यात आलेले सामिलीकरण स्वीकारले असते तर पुढे अनेक अडचणी उभ्या राहिल्या असत्या हैद्राबाद, जुनागढ हे अजून भारतीय संघराज्यात सामिल झाले नव्हते, त्यामुळे सार्वमताचा पर्याय पुढे ठेंवून ताबडतोब सैन्य पाठविण्यात आले. भारतीय सैन्याने पाकिस्तानची आगेकुच रोखली पण थंडी, बर्फ व लढण्यास अयोग्य डोंगराळ भाग ह्यामुळे भारतीय सैन्यास फारशी हालचाल करता आली नाही. १ जाने. १९४८ ला भारताने काश्मीरचा प्रश्न युनोत नेला पण शस्त्र संधी केली नाही. पुढील वर्षभराच्या काळातही भारतीय सैन्य फार आस्ते आस्ते प्रगती करू शकत आहे हे लक्षात आल्यावर, सैन्याधिकाऱ्यांच्या सल्ल्याप्रमाणे व युनोच्या सूचनेवरून १ जाने. १९४९ ला शस्त्रसंधी स्विकारला. हा संधी स्विकारताच युनोने पाकिस्तानने आपले सर्व सैन्य काश्मीर मधून बाहेर कांढावे व सार्वमत घ्यावे असे ठरविले, ह्यासाठी सहा महिन्यांचा कालावधी दिला. ह्या अवधीत पाकिस्तानने सैन्यही बाहेर काढले नाही कारण सार्वमत त्यांच्या बाजूनें येण्याची त्याना खात्री नव्हतीच व युनोने दिलेला सहा महिन्याचा कालावधीही आता केव्हाच उलटून गेला आहे.

बाबु राजेंद्रप्रसाद, पं. जवाहरलाल नेहरू व सरदार पटेल ह्या तिघांच्या सामर्थ्याने भारतीय राजकारणाची वाटचाल तेव्हा होत होती.

सरदार पटेल ह्यांना "पोलादी पुरुष" अशी संज्ञा आहे. बोलणे थोडे पण मुद्देसुद, ठरवलेले उद्दिष्ट ठरविलेल्या काळांत गांठण्यासाठी लागणारा कणखरपणा हा त्यांचा गुण, स्वातंत्र्यपूर्व काळांत बहुतेक संस्थानांत "प्रजापरिषद" व "काँग्रेस" च्या नांवाखाली जनता संघटित होत होती. आपणही ह्या लोकशाही प्रजासत्ताकाचे घटक व्हावे ही प्रजेची तीव्रतर इच्छा होती. त्या इच्छेमुळे संस्थानिकांना भारतीय राज्यांत सामील व्हावेच लागले. जुनागढ व हैद्राबादच्या संस्थानाधिपतीने जास्त ताणण्याचा प्रयत्न करताच आतून जनतेची चळवळ व बाहेरून पोलीस ॲक्शनच्या मदतीने सर्व संस्थानांचे भारतीय संघराज्यांत कायदेशीर विलीनीकरण झाले. त्याचे बरेचसे श्रेय सरदार पटेलांच्या कणखर धोरणास व जनतेच्या जागृतीस आहे.

जे भारतीय संघराज्य कांही दिवसांतच अधिक छिन्नविछिन्न होऊन, त्याचे अस्तित्वही शिल्लक राहणार नाही असे विन्स्टन चर्चील ह्यांना वाटत होते ते संघराज्य संकटांशी झगडत, यशस्वीपणे व खंबीरपणे मजबुतीकडे वाटचाल करीत होते.

१९३५ च्या कायद्याप्रमाणे १९४६ साली झालेल्या निवडणुकीच्या आधारे "घटना समिती" नियुक्त करण्यांत आली व "घटना" बनविण्याची जबाबदारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांनी पूर्ण केली. त्यांनी व त्यांच्या सहकार्यांनी ह्या देशास एक आदर्श घटना दिली. घटनेनेच हे राज्य धर्मातीत. लोकशाही व समाजवादी पध्दतीचे राहील हे ठरविल्या गेले. अल्पसंख्यकांना व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गांचे सर्व हितसंरक्षण करण्याची जबाबदारी घटनेनें स्वीकारली व राष्ट्रीय एकात्मता दृढ होण्याच्या दृष्टीने घटनेच्या ४४ व्या कलमाद्वारे सर्वांना समान कायदा" करण्याचे मार्गदर्शन केले.

हा देश आर्थिक दृष्टया मागासलेला होता. शे. ६० च्या वर लोक दारिद्र्य रेषेच्या आसपास जीवन जगत होते. जनतेची आर्थिक परिस्थिती सुधारण्याकरिता उत्पादनवाढ करणे आवश्यक होते व त्याकरिता उद्योगधंदे वाढविणे हे अपरिहार्य ठरले. सरकारी सहकारी व खाजगी क्षेत्रातले उद्योग-धंदे वाढतील असे धोरण स्वीकारण्यात आले.

देशाची आर्थिक प्रगती व्यवस्थित होण्याकरिता नियोजनाची आवश्यकता असते. त्याप्रमाणे नियोजन मंडळाची स्थापना पं. जवाहरलाल नेहरु ह्यांच्या अध्यक्षतेखाली १९५० साली झाली व पहिल्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा तयार करण्यांत आला.

देशाच्या बनलेल्या नवीन घटनेप्रमाणे १९५२ साली १ ली सार्वत्रिक निवडणूक झाली, त्या निवडणूकीत काँग्रेसलाच भरघोस यश मिळाले कारण स्वातंत्र्यपूर्व काँग्रेसचे सर्व कर्तृत्व व पुण्याई स्वातंत्र्योत्तर काँग्रेसमागेही उभी होती.

नियोजन मंडळाने आखलेल्या चार पंचवार्षिक योजना आता पार

पडल्या असून पांचवी कार्यान्वित आहे. शेतींचा आधुनिक पद्धतीने विकास, पाटबंधारे, जलसिंचन योजना, बीज, उद्योगधंदे, दळणवळण, वाहतुक, सामाजिक सुविधा अशा क्षेत्रात विकासाची दृष्टी ठेवून भांडवल गुंतवणूक करण्यांत आली.

१९६० साली दरडोई असलेले २६१ रू. चे उत्पन्न १९७० साली द. डो. २८९ रू. झाले. राष्ट्रीय उत्पन्नांत २१६ टक्के वाढ झाली. १९७५ अखेर हे उत्पन्न आणखी ३ टक्क्यानी वाढले आहे. पण ह्यांतील बरीच दर्शनी वाढ ही वस्तुरुप किंमतीत झालेल्या वाढीमुळे आहे. विकासाचा मंद वेग, त्यापासून होणाऱ्या फायद्याचे विषम वाटप, अल्प राष्ट्रीय उत्पन्न व विषम विभाजन, भांडवल गुंतवणुकीच्या कार्यक्रमातील अकार्यक्षमता व लांचलुचपत, वाढत्या विषमतेची व ग्रामीण भागातील लोकांची शहरांतील स्थलांतराची न घेतली जाणारी दखल, लोकसंख्येतील ३१ टक्के वाढ, ही अपयशाची कांही कारणे आहेत.

फक्त विकासाचा उत्तम वेग कांही साध्य करु शकणार नाही. विकासाच्या लाभाचे न्याय वाटपही व्हावयास हवे.

१९६१ साली चिनी आक्रमणाला भारतास तोंड द्यावे लागले, अकार्यक्षम सैनिकी व्यवस्थेमुळे व अवस्थेमुळे एक दारुण पराभव पत्करावा लागला. नैतिक पराभवा बरोबरच मनुष्यहानी व वित्तहानी अपरिमित झाली पण ह्या धक्क्यातून लवकरच सावरून देशाने आपली संरक्षण व्यवस्थेची पुनर्रचना केली व १९६५ व १९७० साली पाकिस्तानबरोबर झालेल्या युद्धांत आपल्या पराक्रमाची व परिश्रमाची एक नवीन झलक दाखविली.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अविकसित व विकसनशील देशांशी आपण जास्तीत जास्त सामंजस्य व सहानुभूती निर्माण करावयाचा प्रयत्न करावयास हवा होता. पण तसे न होता परदेशांतील आपल्या वकिलाती विकसित देशातच राहत गेल्या व बरोबरीच्या राष्ट्रांशी सुसंवाद त्यामुळे होऊ शकला नाही. अनेक परराष्ट्रीय वकिलांची कामगिरी निराशाजनक राहिली.

१९४७ च्या तुलनेने झालेली प्रगती ही लक्षांत घेतली पाहिजे. अन्न धान्याचे उत्पन्न ५ कौटी टनावरून १५ कोटी टनावर आले आहे. पाण्याखाली भिजणारी जमीन ११ टक्के होती ती २३ टक्के झाली आहे. पोलादाचे उत्पन्न द. वा. १६ लाख टनावरून १०० लाख टनापर्यन्त वाढले आहे. वीजेचे उत्पन्न २००० पटींनी वाढले आहे.

१३ टक्के असलेल्यांची संख्या ३५ टक्यावर गेली आहे. ९ कोटी विद्यार्थी आज शाळा कॉलेजात शिकत आहेत. संरक्षणाची तयारीही आता समाधानकारक झाली आहे. मोटर, रेल्वे इंजिन, रेल्वे डबे इ. सामुग्री ह्या देशातच तयार होऊ लागली आहे.

१९४७ पर्यन्त काँग्रेस हाच एकमेव बलवान राजकीय पक्ष होता. हिंदु महासभा, रिपब्लीकन पार्टी. कम्युनिस्ट पक्ष हे अखिल भारतीय म्हणवीत असले तरी त्यांचे बलाबल काँग्रेसच्या तुलनेने फार कमी होते. १९४७ नंतर काँग्रेस पक्षान्तर्गत काम करणारा समाजवादी विचारांचा गट काँग्रेस बाहेर येऊन स्वतंत्रपणे काम करु लागला. भारतीय जनसंघाची स्थापना डॉ. मुखर्जी ह्यांनी केली. १९५२ च्या निवडणुकीत काँग्रेसला मिळालेले भरघोस यश कायमचे टिकविता आले नाही. १९५७ व ६२ साली काँग्रेस पक्ष बहुमताने निवडून आलेला असला तरी त्याला मिळालेली मते ही ४०-४५ टक्के होती तर विरोधी पक्षाला मिळालेली मते जास्त असूनही ती विभागली गेलेली असल्यामुळे त्यांच्या निर्वाचितांची संख्या कमी राहिली. १९६७ साली विरोधी पक्षांनी संयुक्त आघाडी निर्माण करून काँग्रेसला शह देण्याचा प्रयत्न केला व तो यशस्वी होऊन नऊ प्रांतात काँग्रेसेतर मंत्रीमंडळ आले. पण विरोधी पक्षांना ती टिकविता आली नाहीत. १९६५ नंतर जवळ जवळ सर्वच राजकीय पक्षात मतमतांतरे झाल्यामुळे पक्षाची विभागणी होण्यात त्याचा परिणाम झाला. काँग्रेसमधून "संघटना काँग्रेस" निराळी झाली. समाजवादी पक्षाचे "प्रजा समाजवादी" व "संयुक्त समाजवादी" पक्ष झाले. कम्युनिस्ट "डावे" व "उजवे" व नक्षलवादी बनून वेगळे झाले. भारतीय जनसंघातून प्रा. मधोक बाहेर पडून त्यांनी स्वतंत्र पक्षाची स्थापना केली. रिपब्लिकन पक्ष आपल्या नेत्यांच्या मागे जाऊन "गायकवाड गट" "कांबळे गट", खोब्रागडे गट असा विभागला गेला.

विरोधी पक्षाच्या मते विभागण्याच्या सातत्याच्या प्रयोगामुळे काँग्रेस पक्ष सतत सरकारमध्ये स्थिर झाला. त्याचे आर्थिक धोरण समाजवादास पुरक न राहता भांडवलशाहीस पोषक असेच राहिले. त्यामुळे एकीकडे मुंबई सारख्या शहरांत गगनचुंबी इमारती उभ्या राहू लागल्या. ओबेराय शेरेटन सारखी महागडी हॉटेल निर्माण होऊ लागली गुंडगिरी व लैंगिकतेस प्राधान्य देणाऱ्या सिनेमा सृष्टीत करोडो रुपयांची गुंतवणूक झाली. तस्करांची संख्या वाढींस लागून काळाबाजार तेजीत चालू लागला व दुसरीकडे निकृष्ट, अस्वच्छ, जीवन जगणाऱ्या झोपडपट्टींची संख्या वाढू लागली. विषमता शिगेस पोहोचली. बिर्ला समूहाची गुंतवणुक ह्या काळांत ४० कोटीहून ८०० कोटीवर व टाटा समुहाची ५० कोटीवरुन १००० कोटीवर गेली आणि ६० टक्के लोकांचे उत्पन्न दररोज दरडोई एक रूपयाच्या आसपासच राहिले. परदेशी कर्ज वाढत आहे. परकीय चलनांत आपली शिल्लक १६०० कोटी रु. आहे, तर कर्ज १०,००० कोटी रुपयाच्या वर आहे.

ह्या सर्व बाबींचा विचार करता, हा देश समता व समृद्धीकडे नेण्याकरिता दृढनिश्चयाने व नियोजित पद्धतीने सर्व स्तरांवर काम झाले पाहिजे हे निश्चित.

पहिली समस्या आहे ती सरकारमध्ये असलेला काँग्रेस पक्ष, भारतीय घटना गुंडाळून ठेवून हुकूमशाहीकडे झुकत आहे. त्याची लोकशाही यशस्वी होण्यासाठी किमान दोन प्रबल पक्ष असावयास हवेत. म्हणजे विरोधी पक्ष सत्ताधारी पक्षावर अंकुश ठेऊ शकतो व आपण चुका केल्यास विरोधी पक्ष जनमत आपल्या बाजुला वळवून घेऊ शकतो व सत्ता काबीज करू शकतो ह्याची संतत जाणीव सत्ताधारी पक्षास असते. समर्थ विरोधी पक्षाकडे शॅडो कॅबिनेट – त्यांचे स्वतःचे मंत्रिमंडळ नेहमीच तयार असते. निरनिराळे तज्ज्ञ लोक आपापल्या विषयाचा सातत्याने अभ्यास करीत असतात. आपली प्रभावळ निर्माण करीत असतात व सत्ता हाती येताच ती ती तज्ज्ञ मंडळी आपापली खाती तत्परतेने सांभाळतात व सत्तेवर नसतांना त्या खात्यातील लहान लहान गोष्टींचीही जाणीव असल्यामुळे, राष्ट्रीय दृष्टीकोनातून त्या खात्याच्या कामकाजावर लक्ष ठेवतात व योग्य त्या सूचनाही करू शकतात.

प्रबळ विरोधी पक्ष ही लोकशाही टिकण्याकरिता आजची गरज आहे. १९६७ साली संयुक्त सरकारे टिकू शकली नाहीत कारण त्यावेळी भिन्न धोरणे बाळगणारे पक्ष व माणसे एकत्र आली होती. पुरोगामी धोरण असणारा पक्षच समर्थ बनू शकतो. त्या पार्श्वभुमीवर भारतात आज झालेली जनता पक्षाची स्थापना ही ऐतिहासिक बाब आहे.

अफाट वेगाने वाढणारी लोकसंख्या ही दुसरी महत्त्वाची समस्या आहे. गेल्या तीस वर्षात जनगणना दुपटींने वाढली. उत्पादनाचा वेग कितीही वाढविला तरी तो लोकसंख्येच्या प्रमाणांत वाढू शकत नाही. म्हणजे उत्पादन वाढूनही आपण दारिद्र्य रेषेच्यावर जाऊ शकणार नाही. म्हणूनच कुटुंब नियोजनाला पर्याय नाही. ते समजून उमजून व जाणीवपूर्वक झाले पाहिजे. फसवून व जबरस्तीने करू नये हे जसे खरे तसे त्याचे महत्त्व जाणून व ती सामाजिक गरज आहे हे लक्षात घेऊन जनतेनेही आपल्या पारंपारिक वा धार्मिक विचारांना बाजूला ठेऊन ह्या समस्येचा विचार करणे आवश्यक आहे. प्रबोधन हे उत्कृष्ट साधन आहे. पण वेळ पडेल तर वापरण्याकरिता "कायदा"ही आवश्यक आहे तीन अपत्यांच्या वरील अपत्यांना मनाई करणे, त्यांची जबाबदारी पालकांवर टाकून त्यांना वैद्यकीय मदत मिळवून देणे व इतःपर कोणी त्याची अंमलबजावणी करण्याचे नाकारल्यास शिक्षा करणे हे धोरण सरकारी पातळीवर अवलंबिणे आवश्यक आहे.

शासनांतील भ्रष्टाचार, लांचलुचपत व दिरंगाई ही तिसरी समस्या आहे. जनतेची होणारी ससेहोलपट व शेवटी त्यातून होणारी राष्ट्राची पिछेहाट हा गंभीरपणेच सोडविण्याचा प्रश्न आहे. राष्ट्रीय प्रेमाने आपले कर्तव्य बजावण्याचे संस्कार तरुणांवर घडवणे आवश्यक आहे. अशा भ्रष्टाचारांची दखल घेण्याकरिता सामाजिक स्तरांवर लोकपाल समिती स्थापून काही अंशी हे काम होऊ शकेल. राष्ट्रीय नीती व राष्ट्रीय प्रामाणिकपणा वाढविणे, पोसणे व अंमलात आणणे हे काम घरोघरच व्हावयास पाहिजे. भ्रष्टाचाऱ्यांना आपल्या पाठीशी न घालता त्यांना कडक शासन देण्याचे धोरण अवलंबिल्यास त्याचाही परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही

सदोष शिक्षण व्यवस्था ही आपली आणखी एक समस्या आहे.

आजच्या शिक्षणातून शिक्षण घेतलेला तरुण हा मध्यमवर्गीय बनून शहरांकडे धावण्याची अपेक्षा बाळगून असतो. नोकरी हेच त्याचे सर्वस्व असते कोठारी कमिशनने सुचविलेली धोरणे अवलंबिली तर शक्यता आहे की, हा तरूण "धंदे शिक्षणात" रस घेईल, स्वत:च्या पायावर उभा राहून स्वत:ची उपजीविका करील व त्यांनी काढलेले उत्पादन त्याच्या भोवतीच्या समाजास उपयोगी पडेल. स्वावलंबी जीवन आंमचे तरुण जगू लागले तर त्यांच्यातील लाचारी जाऊन अस्मिता जागृत होईल व पुरुषार्थाची खऱ्या अर्थाने चढाओढ सुरू होईल.

सदोष शिक्षण व भांडवलशाही वृत्तीतून आलेली शासनातील माणसे ही अनेक दुष्प्रवृत्तीने बरबटलेली आहेत अनेक जीवनमूल्ये ही त्यामुळे नामशेष झाली आहेत. श्रमाचा तिटकारा व श्रमाशिवाय पैसा मिळविण्याची वृत्ती बळावली आहे त्यामुळे असत्य आणि कुटिल कारस्थानांना ऊत आला आहे. राष्ट्रीय हिताचा विचार, समाजाचे एक घटक म्हणून सामाजिक जबाबदारीची जाणीव, सहिष्णुता हया गोष्टी जीवनातून बाद होत आहेत त्यामुळे सर्व समाज जीवन कनिष्ट दर्जाला जाऊन पोहचले आहे. व्यक्तीचीं सर्जनशीलता नाहीशी झाली की सांस्कृतिक विकास कोठून अपेक्षिणार ? हे चित्र बदलावयाचे असेल तर तरूणांच्या सर्जनशिलतेला उत्तेजन व प्रोत्साहन मिळाले पाहिजे, तें देण्याकरिता आवश्यक ती वातावरण निर्मिती करण्याची जबाबदारी समाज धुरिणांचीच आहे. राष्ट्र मोठे होते ते राष्ट्रीय चारित्र्यामुळे व उच्च जीवन मूल्यामुळेच.

सामाजिक विषमता व अन्याय हयांनी समाज पोखरून निघाला आहे. जातीभेद व त्यामुळे दलितांवर होणारे अन्याय ही एक चिंतेचो बाब आहे. "हुंडा" सारख्या कित्येक अमानुष रुढी समाजात रुजल्या आहेत व फोफावत आहेत. त्यांना आळा घालण्याचे काम तरूणांच्या ध्येयनिष्ठ संघटनाच करू शकतील.

खर्चिक व भ्रष्ट निवडणूक पद्धतीमुळे जनतेचा लोकशाही वरील विश्वासच कमी होतो आहे की काय अशी साधारण भीती वाटते. जो जास्त

पैसा खर्च करू शकतो तोच निवडून येतो हे सर्वसाधारण दृश्य आपण पाहत असून त्यामुळे निवडणूक ही फक्त पैसेवाल्यांची मिरासदारीच बनून राहिली आहे. पक्ष, उमेदवार निवडीच्या वेळी, त्याचे कार्य, समाजाशी संबंध ह्याचा विचार न करता, त्याची पैसा खर्च करण्याची पात्रता व बहुजनसमाजास मान्य होईल ती "जात" आहे कां एवढेच बघत असल्यामुळें तो जनतेचा खरा प्रतिनिधी होऊच शकत नाही. शिवाय त्याची कारकीर्द त्याला निवडून दिलेल्या जनतेस समाधानकारक वाटली तर त्याला परत बोलविण्याचा अधिकार आज जनतेस नाही त्याचा दुरूपयोग होण्याची शक्यता असते. पक्षांतर करणे, जनतेला नको असलेल्या लॉबीत उमेदवाराने जाणे, किंवा ज्या भागातून तो निवडून आला आहे त्या भागाचे योग्य प्रतिनिधीत्व न करणे ह्या गोष्टी नेहमी घडतात. शासकीय पातळीवरुन निवडणूकीतला भ्रष्टाचार कमी करता येईल. जनतेला हवा असेल तोच उमेदवार निवडणुकीस उभा राहिल्यास जनता व त्याच्याकरिता निवडणुकीचे काम करील ज्यामुळे त्याला खर्च कमी येईल व त्याला परत बोलावण्याचा हक्क जनतेस असेल तर उमेदवार जास्त जाणतेपणानें काम करील हे निश्चीत.

या शिवाय, देशातील मागास भागाचा पूर्णपणे विकास करुन विकासातील असमतोल नाहीसा करणे, राजकीय व आर्थिक केंद्रिकरण टाळून त्यांचे विकेन्द्रिकरण करणे, उत्पादनाचा वेग कमी होत राहतो ते टाळणे, जीवनावश्यक वस्तू रास्त भावात सामान्य जनतेस उपलब्ध करून देणे, ही कामे वेगाने होण्याकरिता लोकशाही राष्ट्रवादाचाच प्रभाव पडावयास पाहिजे.

लोकनायक जयप्रकाशजींना अभिप्रेत असलेली "संपूर्ण क्रांती" ती हीच सप्तरंगी क्रांती आहे. "जनता पक्ष" सारख्या एका पुरोगामी प्रभावी व ध्येयवादी पक्षाच्या निर्मितीने राष्ट्रवादी जीवनांत समता व समृद्धी येईल अशी अपेक्षा करण्यास बराच वाव आहे.

•••

स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील राजकारणाचे स्वरुप

स्वातंत्र्यपूर्व काळांत, जनतेला येणाऱ्या अडीअडचणी, त्यांच्या मागण्या, शासनापर्यन्त पोहोचविणे, योग्य प्रकारे जनतेची बाजू मांडणे व त्या अडचणी सोडविण्याचा प्रयत्न करणे हे काम कांही लोक सातत्याने करीत. शासन व जनता ह्यांच्यांत दुरावा असल्यामुळे जनतेची दुःखे शासनाला कळणे शक्य नव्हते. शिवाय शासनांत असणारी मंडळी ही प्रामुख्याने इंग्रज व इंग्लंडमध्ये शिक्षण घेतलेली शिक्षित मंडळी असल्यामुळे, त्यांचा संपर्क सर्वसामान्य माणसाशी राहणे शक्य नाही हे बघून असली कामे कांही लोकांना करणे आवश्यक आहे असे वाटे. निस्वार्थीपणा, प्रामाणिकपणा व जनतेची दुःखे जाणण्याची संवेदनक्षमता हा जसा एका बाजूस अशा कार्यकर्त्यांचा गुण होता तसाच ह्या मागण्या शासनापुढे ठेवतांना बुद्धिमत्ता, चौफेर माहिती, कायदेज्ञान ही तर आवश्यकच होती पण वेळप्रसंगी सरकारी रोषालाही बळी पडावे लागे व ती तयारी ठेवावी लागे. जनतेची असली कामे करणाऱ्यांना 'राजकारणी' ही संज्ञा प्राप्त झाली.

स्वातंत्र्योत्तर काळांत, विशेषतः १९५२ नंतर निवडणुका होऊन जनतेचे प्रतिनिधी सरकारांत निरनिराळ्या पदांवर आरुढ झाले व सत्तेच्या जागा काबीज करणे हेच राजकारण होऊन बसले. विशेषतः सत्तेच्या विकेंद्रीकरणानंतर म्हणजे जिल्हापरिषदा अस्तित्वांत आल्यानंतर सत्तेची अनेक क्षेत्रे, तसेच सहकारी क्षेत्रे उपलब्ध झाली व सत्ता ताब्यांत घेण्याकरितां, ती टिकविण्याकरितां आपला गट बनविण्याची, जवळच्यांची वर्णी त्या जागी लावून देण्याची प्रथा सुरूं झाली व शासन व राजकारण समांतर चालूं लागले. शासन जसजसे व्यापक होत गेले तसेच राजकारणही सर्वसमावेशक व शासनान्तर्गत काम करूं लागले. राजकारण हे शासनाचाच एक अविभाज्य भाग बनले.

महाराष्ट्र हा भारताचा एक महत्त्वाचा घटक आहे. १९५६ ते ६० पर्यन्त महाराष्ट्र हे द्विभाषिक राज्य होते. १९६० नंतर संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती होऊन विदर्भ, मराठवाडा, कोंकण व पश्चिम महाराष्ट्र हा सर्व मराठी भाषिक भाग एकत्र आला. महाराष्ट्राची लोकसंख्या साडेपाच कोटी असून, ८० टक्के जनता ही ग्रामीण भागांत राहते व २० टक्के शहरी भागात राहते. ७० टक्के लोक शेतीवर उपजीविका करतात. जलसिंचनाचा उपयोग ८ टक्के जमिनीस होतो. (पंजाबांत ६३ टक्के जमीन पाण्याखाली भिजते). जवळ जवळ पावणेदोन कोटी हेक्टर जमीन ही वहितीयोग्य आहे. ज्याकडे पांच एकरापेक्षां कमी जमीन आहे अशा शेतकऱ्यांची संख्या शे. ४४ आहे.

९० टक्के औद्योगिकरण हे मुंबई किंवा मुंबईच्या आसपासच झालेले आहे. एकांगी औद्योगिक विकास व दुर्लक्षणीय शेतीची प्रगती ह्यामुळे ६० टक्क्याच्यावर लोक दरिद्री रेषेच्याखालील जीवन जगतात तर मुठभर लोकांच्या हातांत आर्थिक विकास केन्द्रित झालेला असल्यामुळे आर्थिक विषमता फार मोठ्या प्रमाणावर येथे आहे.

आर्थिक विषमतेबरोबरच सामाजिक विषमता हे महाराष्ट्राचे एक अंग बनले आहे. महाराष्ट्रांतील प्रमुख जाती म्हणजे मराठी वर्ग. हा ३८ टक्के आहे, हरिजन वर्ग १२ टक्के आहे व मुस्लिम समाज १० टक्के आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांची दृष्टी फार व्यापक होती. शासक वर्गात त्यांनी मराठा व ब्राम्हणवर्गाचीं नियुक्ती केली तेव्हांपासून म्हणजे मराठेशाहीपासून मिळालेली निरनिराळी वतने वंशपरंपरा ही मंडळी सांभाळत आली आहेत. छत्रपतींचा व्यापक दृष्टीकोन पुढे नाहीसा होऊन ही वतनदार मंडळी सरंजामशाहीच्या अवशेष रुपाने शिल्लकच राहिली व स्वत: इतर समाजापेक्षां आर्थिक दृष्टीने स्वयंपूर्ण असल्यामुळे इतर सामान्य समाजास ह्यांच्या वर्चस्वाखाली, ह्यांच्याच मताप्रमाणे, प्रसंगी गुलामी व वेठबिगारीचे जीवन जगावे लागले.

इंग्रजी राज्याच्या उदयानंतर, जुनी वतने पोट भरण्यास अपुरी पडूं लागल्यामुळे व दुसऱ्यावर वर्चस्व गाजविण्या इतके सामर्थ शिल्लक न राहिल्याने ही मंडळी आपली गांवे सोडून शहरांत स्थायिक होऊ लागली, शहरांत शाळांचा फायदा ह्या वर्गास मिळून हा वर्ग प्रथम शिक्षित बनला. शिक्षणाचा लाभ ह्या मंडळीस लवकरच झाला कारण इंग्रजांनाही आपले राज्य चालविण्याकरितां अशा शिक्षितांची गरज होती. शिक्षणामुळे होत असलेला आर्थिक लाभ लक्षांत येतांच ह्या मंडळींनी भराभर आपले नातेवाईक – ओळखीचे लोक बोलावून घेतले व त्यांना सरकारी नोकरीत प्रवेश मिळविण्यास मदत केली. हा वर्ग बहुतांशी ब्राम्हणवर्ग होता. सो अशा प्रकारे शासनात गेल्यामुळे शासनांवर पुन्हां एकदा वर्चस्व निर्माण झाले.

ह्या वर्गातील विद्वान मंडळींनी आपल्या बुद्धिमत्तेचा उपयोग भारतातील 'प्रबोधन युग' चालू ठेवण्यांत केला व राजकीय, सामाजिक व आर्थिक अन्यायाविरूद्ध जनजागृती करण्यांत आपले जीवन घालविले. लो. टिळक, आगरकर, चिपळूणकर, रानडे, परांजपे इ. त्यांचे प्रतिनिधी होत.

मराठा समाजास प्रथम सैन्यांत नौकऱ्या मिळाल्या पण त्या एकतर सर्व समाज सामावून टाकील एवढ्या मोठ्या प्रमाणांवर नव्हत्या. 'सैन्याची' संख्या वेळोवेळी कमी होत गेल्यामुळे अनेकांना सैनिकी पेशा सोडून पुन्हां शेतीवर जीवन जगण्याची पाळी आली.

शेतीवर राहणाऱ्या लोकांना खेड्यांत राहावे लागे. शालेय शिक्षणाचा

फायदा त्यांना मिळणे शक्यच नव्हते. वाहतुकीची साधनेही सहज उपलब्ध नसल्यामुळे शहरी विभागांशी, तेथील ज्ञानाशी, रीतिरिवाजांशी, नवीन विचारांशी हया लोकांचा संबंध राहिला नाही. त्यामुळे एकीकडे आधुनिक ज्ञानाने भारावलेला शासनांत महत्त्वाचे स्थान असलेलां समाज, व दुसरीकडे शिक्षणाशी संबंध नसलेला, जुन्या रुढी व परंपरा बाळगणारा, प्रबोधनापासून दूर असलेला असा एक मोठा समाज असे चित्र निर्माण झाले.

महात्मा फुलेंचा प्रवेश नेमका हया वेळी महाराष्ट्रांतील राजकारणात झाला. इंग्रजी राज्य येथे आल्यामुळे एका नवीन विद्येचा साक्षात्कार आपणास घडला आहे. वैज्ञानिक शोधांचा फायदा माणसांचे भौतिक जीवन उन्नत करण्याकडे होऊं शकतो हे लक्षांत आल्यामुळे हया राज्याचे त्यांनी प्रथम स्वागत केले. नंतर त्यांचे लक्ष वळले ते स्त्री व दलित समाजाकडे. शहरांत राहणाऱ्या स्त्रियांची परिस्थितीही त्याकाळी फार भयानक होती. त्यांना शिक्षणाचा गंध नसे. स्वतःचे मत मांडण्याचा व बोलण्याचा अधिकार नसे. रूढी व परंपरानी त्यांना इतके करकचून बांधले होते की, खऱ्या अर्थाने त्या 'अबला' होत्या व पुरूष प्रधान संस्कृतीत हे अबलापण अनंत यातनांना जन्म देत असे. दलित माणूस हाही असाच उपेक्षित, बेठबिगारी व गुलामाचे जीवन जगणारा होता. "माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार आहे." असा समतेचा संदेश महाराष्ट्रांत सर्वप्रथम महात्मा फुलें नी दिला व ह्या गुलामीच्या बेडयातुन स्त्रियांची व दलीतांची मुक्तता करण्याचा प्रयत्न हाती घेतला. रुढी व परंपरा हया कृत्रिम असल्यातरी धर्माच्या नांवाखाली त्याचा पगडा मानवी मनावर फार प्रबल असतो. कांही वेळां हया बेडयांचीच एवढी संवय झालेली असते की, त्या टाकणे नकोसे वाटते. सत्य समजून घ्यावयाचे असेल तर शिक्षितच व्हावयास पाहिजे, सारासार विचार करावयास शिकले पाहिजे. वेळप्रसंगी बंडही केले पाहिजे हे त्यांनीच प्रथम बहुजन समाजास शिकविले व धर्माचा पगडा ज्या कारणाने कायम ठेवला गेला होता त्या ब्राम्हण्यावर त्यांनी कडाडून हल्ले चढविले.

समाजाला धक्के दिल्याशिवाय समाज जागा होत नसतो. हे धक्के देण्याचे काम महात्मा फुलेंनी केले व समतेचा संदेश देणाऱ्या साक्षरतेची कास

दलितांना व स्त्रियांना धरावयास लावली व नवीन ईर्षेने भारलेल्या समाजाच्या निर्मितीस सुरवात केली.

महात्मा फुलेंचे हे काम पुढे महर्षी शाहूंनी आत्यंतिक आत्मियतेने केलें व बहुजन समाजांत फार मोठी जागृती घडवून आणली. एवढंच नव्हे तर त्यांना आपल्या संस्थानांत मोठ्या पदाच्या जागीं नेमून शासनांतील महत्वाच्या जबाबदाऱ्या पेलण्याची व पार पाडण्याचीं कामे त्यांच्याकडून करवून घेतली.

ह्यांतूनच पुढे सत्यशोधक समाजाची स्थापना झाली. व ही संस्था बहुजन हिताय – बहुजन सुखाय विविध स्तरांवर कामे करुं लागली.

ह्याच सुमारास डॉ बाबासाहेब आंबेडकर ह्यांनीही दलितोद्धाराच्या कार्यक्रमात स्वत:स वाहूंन घ्यावयाचे ठरविले व दलितांची अस्मिता जागृत करून त्यांना सुधारणेकडे वाटचाल करण्याचीं प्रेरणा दिली. डॉ. आंबेडकरांच्या कार्याने लवकरच मूळ धरले पण त्यांच्या भोंवती जमा झालेली मंडळी दलितांतील ही एका विशिष्ट गटाचीच असल्यामुळे इतकी प्रगती होऊनही दलितांमधले अनेक गट अप्रगत व मागासच राहिले. सर्वांच्या बरोबरीने आपणांस जावयाचे असेल तर ज्ञान संपादन केले पाहिजे. ज्ञानानेच समता निर्माण करता येते हे त्यांनी जनमानसांवर बिंबविण्याचा प्रयत्न केला.

ह्याप्रमाणे सर्वच महाराष्ट्र खऱ्या अर्थाने शिक्षित, प्रगत व सुधारणावादी होंऊं लागला पण ही प्रगती सर्व समाजाची एक संघ वाटचाल न होता परस्परांपासून दूर राहूनच होत गेली.

महर्षी शाहूनंतर, सत्य शोधक समाजाची सूत्रें ज्या पुढाऱ्यांच्या हाती गेली. त्यांनी ह्या प्रबोधनाचा गाभा नीट लक्षांत न घेतां स्वत:ची निराळी अस्मिता निर्माण करण्याचा प्रयत्न केला व त्याची निष्पत्ती ब्राम्हण-ब्राम्हणेतर वादांत झाली. म. फुले नी, राजर्षी शाहूंनी वा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे प्रहार केले ते 'ब्राम्हण्यावर' केले म्हणजे त्या रुपांने उभे असलेल्या धर्मावर, धर्म रुढीवर व धर्मपरंपरांवर केले पण ही जाणीव न ठेवता

'ब्राम्हण' ही परकीय जात आहे अशा भावनेने तिच्यावर केलेल्या हल्ल्याचा भीषण परिणाम पश्चिम महाराष्ट्रांत गांधीवधानंतर पहावयास मिळाला. एकाही ब्राम्हणाचे घर, वाडा, दुकान जळाल्याशिवाय येथे राहिले नाही. ह्यामुळे परस्परांमधील कटुता वाढत गेली व त्याचा परिणाम ग्रामीण भागांतून बहुतांशी ब्राम्हण कुटुंबाच्या परागंदा होण्यांत झाला.

बहुजन समाजांमधील जागृतीमुळे त्यांना शासनातील महत्त्वाची स्थाने प्राप्त होऊं लागली पण ग्रामीण पातळीवर दुसऱ्या कोणी आंपल्या गुलामगिरीतून मुक्तता करून घेणे हे रास्त आहे ही व्यापक भूमिका चळवळीने सोडल्यामुळे, दलित व अल्पसंख्यांकांवर अन्याय हे होतच राहिले व अनेक कायदे करून आजही ते चालू आंहेत प्रसंग निरनिराळे असतील, घटना बदलेल्या असतील, पण अन्यायाला बळी पडणारी मंडळी ही अल्पसंख्यांकच आहेत.

म्हणूनच खऱ्या अर्थाने 'समता' अद्यापिही निर्माण झालेली नाही. निवडणुकांमुळे शासनांत जाण्याचा हमखास अधिकार हा बहुजन समाजाचा आहे. कारण त्यांनाच बहुजन समाजाची मते मिळणार हे निश्चित असते. दोन बहुजन समाजाचे उमेदवार एकाच जागेकरितां उभे असले तरी ते आंपल्या 'पोटजातीचा' आश्रय घेतात व जी पोटजात त्या भागांत संख्येने जास्त असते, तो उमेदवार हमखास निवडला जातो. राजकीय पक्षांनाही आपला उमेदवार निवडून आणण्याकरितां हे पोटजातीचे भान नेहमीं ठेवावे लागते.

ह्यांतून बाहेर पडण्याचा मार्ग उपलब्ध होऊ शकणार नाही असे बाकी म्हणतां येणार नाही शिक्षणाने समाज साक्षर होतो व ज्ञानाने तो सुशिक्षित होऊं शकतो. प्रबोधनाचा लाभ सर्वांना एकसंघ व सारखा मिळत गेला. विकासाची समान संधी उपलब्ध झाली, मागास भागांतील आर्थिक--मागासलेपण उद्योगधंद्याच्या वाढीने नाहिसें झाले तर समाजाची एकमेकांत मिसळण्याची प्रवृत्ती वाढीस लागते व परस्परांना समजून घेण्याची प्रक्रिया सुरूं झाल्यावर राष्ट्रवादी समाज निर्माण होऊं शकतो व एकात्म समाजाचो

वाढ होऊं शकते. अल्पसंख्याकांना त्यांच्या अडचणींच्या निवारणाचे आश्वासन बहुजन समाजातील सर्व समावेशक दृष्टिकोनच हे करूं शकेल.

एरव्ही जातीपातीचे प्रभाव मानणाऱ्यांना जेव्हां भाषिक प्रभाव तीव्रतेने जाणवला तेव्हां, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या काळांत नाशीकहून गायकवाड निवडून येणे किंवा हुकुमशाहीविरूद्ध जनता पक्षास उमेदवारांच्या जातीपातींचा विचार न होतां भरघोस मतें मिळणे हे त्या दृष्टीने मोठे आशादायक लक्षण आहे.

म्हणूनच यापुढे ज्या राजकीय पक्षाला महाराष्ट्रांत यशस्वी व्हावयाचे आहे त्याला, महाराष्ट्रांतील विकासाचा असमतोल प्रथम घालवावा लागेल, मराठवाडा, कोंकण, विदर्भ ह्या भागांत औद्योगिक विकासाच्या योजना व जलसिंचनांच्या योजना राबवून आर्थिक मागासलेपण घालवावे लागेल. पुरोगामी दृष्टिकोन समोर ठेवून, वैज्ञानिक दृष्टी, अर्थार्जनाच्या नवीन बाबी, संशोधन, क्रीडा व पुरूषार्थाची निरनिराळी क्षेत्रें, सर्वांना सारखी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करावा लागेल, राष्ट्रीय वृत्ती जागृत ठेवून एका मोठ्या ध्येयाकरितां एकात्मता टिकविण्याची दृष्टी द्यावी लागेल व मुख्य म्हणजे सर्व राजकारणालाच सरंजामी अवस्थेंतून बाहेर काढावे लागेल.

• • •

जागतिक युवक आंदोलने

युवक कोणास समजावे हा थोडासा वादग्रस्त प्रश्न आहे. ज्याला न्यायाची चाड आहे, जो अन्याया विरूद्ध पेटून उठतो व तो निवारण्याकरिता संघर्षास सामोरा जातो तो युवक अशी सर्वसाधारण मानसिक वृत्ती दर्शविणारी व्याख्या आपणांस करतां येईल. अन्यायाची चीड असणे व तो निवारणार्थ संघर्ष करणे हा एक स्थायी भाव लक्षात घेउनही युवक आंदोलनांचा विचार करतांना शाळेतील वरच्या वर्गात व प्रामुख्याने कॉलेजात शिकत असलेल्या वयोगटांचा म्हणजे १८ ते २५ वयांतील तरुणांचा विचार आपल्यासमोर आहे.

दुसऱ्या महायुध्दात अणुस्फोटाचा शोध लागला व हया जहाल शस्त्राने जगाच्या राजकारणास कलाटणी दिली. दुसऱ्या महायुध्दा नंतर " संघटित-युवा शक्ती " ही अणुस्फोटा पेक्षाही फार मोठी शक्ती आहे. हे लक्षात येऊं लागले व त्याचा समाज शास्त्रीय दृष्टिकोनांतून अभ्यास अल्बर्ट शीस्त, ॲटबॅक सारख्या कांही शास्त्रज्ञानी करून कांही अचूक निष्कर्षही काढले,

म्हणूनच हचा युवाशक्तीचा मागोवा घेणे मोठे मनोरंजक ठरेल. ही युवाशक्ती 'विधायक' स्वरुपाची जशी. तशी विध्वंसक स्वरुपाचीही आढळते इतके असूनही गेल्या १५–२० वर्षातील निरनिराळ्या देशांतील युवक आंदोलनांवरुनही युवाशक्ती एका युगप्रवर्तक विश्वशांतीचा संकेत वाटते.

'अन्यायाची चीड' हा तरूण मनाचा स्थायीभाव, सामूहिक स्वरूपात होणाऱ्या अन्यायाचा प्रतिकार जमेल त्या मार्गाने संघटित रूपाने करु लागतो. प्रस्थापित राज्यव्यवस्थेची असफलता हे आपल्या सामूहिक अन्यायाचे महत्त्वाचे कारण मानावे लागेल. शिक्षणाबरोबर बेकारी वाढली, मोठाली सर्टिफिकेटस् व पदव्या पदरांत पडूनही, पोटापुरती नौकरी मिळू शकत नाही म्हणून भारतीय युवकांनी उभे केलेलेआंदोलन अद्यापि लक्षात आहे. बर्कले विद्यापीठांत विद्यार्थ्यांना आपली मते व्यक्त करण्यावर बंधनें घालण्यांतत आली होती, नंतर विद्यापीठाने तर व्यक्तिस्वातंत्र्याचाच संकोच केला होता, अमेरिकन तरूणांना सक्तीने लष्करांत जावे लागे व ही तरुन मंडळी 'व्हिएटनाम' मध्ये युद्धभूमीवर पाठविली जात, केवळ आपल्या राजकीय धोरणांचा पूरस्कार करण्याकरिता या धोरणामुळे युवकांची होत असलेली कुचंबणा विकासाचे रोखलेले मार्ग व तरुण शक्तीचा अपव्यय, हा तरूण मनास व्यापून टाकने स्वाभाविकच होते. हा अन्याय सहन करणे शक्य नाही अशी जाणीव वाढवित जाऊन युवाशक्ती संघटित होत गेली व तिथे या गोष्टीचा प्रतिकार केला. 'प्रस्थापिता' विरुद्ध लढा पुकारला हे महत्त्वाचे.

जसे देशव्यापक प्रश्नावर तरूण मंडळी जागृत होऊन उठली तशी स्थानिक प्रश्नांवरही ही मंडळी संघटितपणे प्रतिकारार्थ उभी राहिली. कोठें मेसमध्ये चांगले अन्न मिळत नाही म्हणून, कोठे एका विशीष्ट मतांच्या राज्यकर्त्यांना वाव दिला जातो म्हणून, कोठे शिक्षणक्षेत्रातील भ्रष्टाचाराविरुद्ध तर कोठे सामाजिक रूढी व परंपरा व राजकीय भ्रष्टाचाराविरुद्ध ही युवाशक्ती संघटित पणे उभी राहिली आहे असे दृश्य दिसते.

विज्ञानाच्या प्रगतीमुळे जग झपाट्याने बदलत आहे. बदलाचे गणित आपल्यापुरते आपण मांडून पाहू शकतो. आजपर्यन्त ह्या पृथ्वीवर एक हजार

पिढ्या झाल्या असे आपण गृहित धरले तर, त्यापैकी ८५० पिढ्याचे जिवन रानटी अवस्थेत-गुहेत गेले आहे हे समजून घ्यावे. जी कांही प्रगती आहे ती गेल्या १५० पिढीतील आहे. हयावरून हया बदलाचा वेग आपण समजू शकूं. दोनशे वर्षापूर्वी जेव्हा वाफेच्या इंजिनाचा शोध प्रथम लागला व ते ताशी मैल वेगाने धावू लागले तेव्हां त्या काळच्या माणसाने आश्चर्याने तोडांत बोट घातले, कारण हा 'वेग' त्याला अनाकलनीय होता. हया दोनशे वर्षाच्या प्रगतीत, आजचा मानव, ताशी बारा हजार मैलांच्या वेगाने प्रवास करु शकतो. विज्ञानाच्या झपाटयाने मानसाचे माणसिक संतुलन, जीवनांतील संघर्ष हा दर दहा वर्षानी तितक्याच वेगाने बदलत असतो व वाढत असतो. हया बदलत्या माणसिक संतुलनाला सावरु शकणारी सामाजिक बैठक नसेल तर हा तरूण त्या समाजाच्या मागासलेपणाला नांवे ठेवणार, कंटाळणार व शक्य झाल्यास त्या विरूद्ध बंड करुन उठणार हे निश्चित आहे.

'प्रस्थापिता' विरुद्धचा राग जसा तरुणांच्या मनांत असतो तसे ते राष्ट्रीय प्रश्नाबद्दलही जागरूक असतात असे आढळून आले आहे. हॉलंडच्या राजकन्येचे परदेशी तरूणाशी होणारे लग्न न मानवल्या मुळे तेथे युवकांनी आंदोलन केले. पश्चिम जर्मनीत इराणच्या बादशहाची भेट अशीच तेथील युवकांना अनावश्यक व अर्थहीन वाटत होती म्हणून त्या विरुद्ध आंदोलन उभे केले. जपान मध्ये युवकांना, ज्या आमेरिकेने पहिला रफोट आपल्या भूमीवर लेला त्या आमेरिकेच्या राष्ट्रपतीची भेट नको होती तर बांगला देशांत पश्चिम पाकिस्तानने, बांगला हीत्यांची मातृभाषा असतांना उर्दू त्यांच्यावर लादली म्हणून आंदोलन उभारले. ही सर्व आंदोलने कमी अधिक अर्थाने यशस्वी झाली आहेत. त्या देशांतील विचारांना वळण देऊन गेली आहेत हे नकारता येणार नाही.

व्हिएटनामाच्या युद्धाविरुद्ध अमेरिकन तरूणांनी केलेल्या आंदोलनाचा वर उल्लेख आला आहेच, एखाद्या राष्ट्राच्या आंतरराष्ट्रीय धोरणाविरूद्ध उभारलेले आंदोलन म्हणून ह्याचा उल्लेख करावा लागेल.

तरूणांनी केलेल्या ह्या आंदोलनाचा विचार करता कांही गोष्टी आपणापुढे स्पष्टपणे येतात. पहिली म्हणजे ही आंदोलने प्रामुख्याने त्या त्या

सरकार-विरोधी, म्हणजे सरकारी धोरणाविरोधी म्हणजेच 'प्रस्थापिता, विरुद्ध उभी लेलेली होती.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे ही आंदोलने सर्व युवकांनी संघटित होऊन उभारली - 'युवा-शक्तीचे' प्रदर्शनच एका अर्थाने घडले. हे युवक ह्या प्रश्नांवर संघटित होत असतांना आपले आंदोलन राजकीय पक्षांपासून निराळे ठेवण्याचा त्यांनी प्रयत्न केला. पण ह्या आंदोलनांत देशांतील राजकीय पक्षही संमीलित झाल्यानंतर ह्या युवक संघटना ह्या राजकारणाचे केंद्रच बनल्या.

कांही ठिकाणी तर युवकांचे सहभागीत्व अल्प आहे असेही घडले आहे. आंदोलन राजकीय पक्षाने व्यापल्यामुळे 'युवाशक्ती' संघटितपणे उभी राहूं शकली नाही.

ज्या ठिकाणी ही आंदोलने राजकारणापासून अलिप्त ठेवण्याचा प्रयत्न झाला त्या ठिकाणी राजकीय कार्यकर्त्यांवरील राग हा प्रामुख्याने कारणीभूत झालेला आहे. राजकीय कार्यकर्त्यांनी ही आंदोलने राजकारणापासून अलग ठेवण्याचा प्रयत्न केला.

कांही ठिकाणी राष्ट्रीय नेत्यांच्या विचारांचा फार मोठा प्रभाव ह्या आंदोलनांवर पडलेला दिसतो. उदाहरणार्थ - लोकनायक जयप्रकाशजींचा भारतीय युवक आंदोलनावर पडलेला प्रभाव उल्लेखितां येईल.

ह्या आंदोलनामध्ये प्रथम अहिंसक मार्गांचाच वापर करण्यांत आला. सभा, पत्रके, संप, मोर्चे, बैठक, गेट-मिटिंग्ज ह्याद्वारे आपला प्रश्न समजावून सांगणे व अनुकूल लोकमत तयार करण्याचा प्रयत्न झाला. त्याच्यापुढे सत्याग्रह, उपोषण बैठा सत्याग्रह हे मार्ग वापरले गेले. व्यंगचित्र, घोषणांचे फलक, घेराओ, ह्या मार्गाचाही अवलंब केला गेला.

हे आंदोलन मोडून टाकण्याकरितां सरकारने जेव्हां जेव्हां दडपण व अत्याचाराचा अवलंब केला तेव्हां तेव्हां ह्या आंदोलनास हिंसक वळण लागले व दगडफेक, जाळपोळ इ. प्रकार घडले पण ते नंतर हे लक्षांत ठेवले पाहिजे.

पाठिंबा मिळविण्याकरितां मुक्तविद्यापीठ, प्रतिविद्यापीठ असले प्रयोगही करण्यांत आले. कांही ठिकाणी भूमीगत रेडिओचा वापरही झाला.

ही युवा आंदोलने ज्या ठिकाणी युवाशक्ती सहजपणे संघटित होऊं शकली अशा ठिकाणीच म्हणजेच शहरांत झाली आहेत. शहरांत झालेल्या आंदोलनामुळे मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांचा सहभाग ह्या आंदोलनास प्रामुख्याने लाभला. आंदोलनाचे नेतृत्व मात्र श्रीमंत तरुणांनी केलेले आढळले.

अशा प्रकारे जागृत झालेली ही युवाशक्ती, मर्यादित ध्येयाकरितांच न राबवता देशव्यापक देश-हितैषी कारणाकरतां वापरतां येईल हे एक सुचिन्ह स्पष्ट दिसत आहे.

युवाशक्तीचे दोष व त्यांतील त्रुटी लक्षांत घेऊन ते नष्ट केले व ह्या शक्तीस योग्य वळण दिले तर ही शक्ती मानवी जीवनांत एक नवीन अध्याय निर्माण करूं शकेल हा विश्वास निर्माण होण्यास भरपूर जागा आहे.

म्हणूनच ही युवाशक्ती " संपूर्ण क्रांती " करितां वापरली जावी असा मा. जयप्रकाशजींचा आग्रह होता.

क्रूर राजकीय पद्धती, राजकीय अन्याय व हुकूमशाही नष्ट करण्याकरिता ही शक्ती वापरतां येईल.

शिक्षणांत अमूलाग्र बदल करुन विज्ञान-निष्ठ स्वावलंबी बनविणारे शिक्षण देण्यांत यावे हा आग्रह ही शक्ती धरू शकेल.

आर्थिक विषमता कमी करण्याकरिता, समाजवादी समाजरचनेकरिता राष्ट्रीय वितरण व्यवस्था भ्रष्टाचारापासून मुक्त करण्याकरिता ही शक्ती वापरतां येईल.

जाती संस्थांचा उच्छेद, हुंडा निर्मूलन आदि सांस्कृतिक अनावश्यक रुढी परंपरा ह्यापासून समाज मुक्त करण्याचे काम ही शक्ती करू शकेल.

* * *

भारतीय युवक आंदोलने

भारतीय युवक आंदोलनास फार जुना इतिहास नाही. भारतीय स्वातंत्र्याकरितां इंग्रजाविरुद्ध जो लढा हया देशांत दीडशे वर्षे चालला होता त्यात तरुणांचाच प्रामुख्याने सहभाग होता हे खरे असले तरी, देशाच्या पातळीवर युवक संघटना वा युवक आंदोलन उभे राहिलेले नाही स्वा. सावरकरांनी उभी केलेली क्रांतिकारकांची संघटना "अभिनव भारत" किंवा लाला हरदयाळांनी चालवलेली " गदर " हया संस्था अपवादात्मक म्हणता येतील. त्यांत मोजक्या तरुणांनीच भाग घेतला, संघटना म्हणून गुप्ततेनेच तिला वावरावे लागले. व देशाकरितां पडलेली कामगिरी पार पाडून हया तरुणांनी हौतात्म्य पत्करले. हे क्रांतिकारी युवकांचे गट कांही ठिकाणीच कार्यरत होते.

महात्मा गांधींच्या असहकार आंदोलनांत प्रथमच तरुणवर्ग मोठ्या प्रमाणांत सहभागी झाला. हा तरुणवर्ग कांही वेगळ्या संज्ञेने (आयडेंटिटि)

आलेला नव्हता. चळवळीचा एक भाग तो बनला होता. त्याच्या पराक्रमाचे व पुरुषार्थाचे दर्शन १९४२ च्या चळवळीत घडले. जयप्रकाश नारायण, अच्युतराव पटवर्धन, रावसाहेब पटवर्धन, अरूणा असफअल्ली, डॉ. राममनोहर लोहिया आदि तरूणांच्या नेतृत्वाने तरूणांना जागृत ठेवणे, चळवळ चालू ठेवणे, इंग्रजांच्या शासनांत अडथळे आणणे व भारतीय - जन - सहयोगाशिवाय इंग्रजांना हे राज्य चालवितां येणार नाही, ह्या गोष्टीचे दर्शन घडविणे तसेच हे राज्य जबरदस्तीने भारतीयांवर लादले गेले आहे ह्याची जाणीव निर्माण करणे ही महत्त्वाची कामे ह्या कालखंडांत ह्यांनी केली, तो इतिहास ताजाच आहे.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर बाकी, अशा प्रकारचे अखिल भारतीय स्वरूपांचे एकही आंदोलन भारतीय युवकांनी उभे केलेले नाही.

१९६५ नंतर निरनिराळ्या युवक संघटनांद्वारां युवक एकत्र येण्यास सुरवात झाली व स्थानिक प्रश्नावरून स्थानिक स्वरुपाचे लढे सुरूं झाले युवकांची संघटना बनविण्याची संधी प्रामुख्याने कॉलेजमध्येंच मिळत असल्यामुळे ही आंदोलनेही त्या अर्थाने युवक आंदोलने न राहतां विद्यार्थी आंदोलनेच ठरली. ह्या आंदोलनांतून भारतीय जनतेला युवा शक्तीचे अस्तित्व जाणवले, हे जरी खरे असले तरी ती जाणीव ही एक उत्पाती किंवा उपद्व्यापी शक्ती आहे एवढ्यापुरतीच मर्यादित होती हे नमूद करणे आवश्यक आहे.

युवक असंतुष्ट झाला की त्याचे प्रकटिकरण आंदोलनांत होते असे ही आंदोलने तपासली असतांना दिसून येते. ही असंतुष्टता निरनिराळ्या कारणाने, वेळोवेळी निर्माण झाली व ती पोसली गेली व जून्या पिढीपेक्षां कांही निराळे उत्तरदायित्व आपल्यावर आहे ह्याची प्रथमच जाणीव झाली व ह्या निराळेपणाच्या भावनेतून, हा जुन्या पिढीचा दुःस्वास उदयास आला.

पं नेहरू, पटेल यांसारखे पुढारी देखील, स्वातंत्र्यपूर्व काळांत, तरुणांनी राजकारणांत रस घ्यावा, चळवळीत सामील व्हावे व पुरुषार्थाचे

दर्शन घडवावे असे अट्टाहासाने सांगत. तेच पुढारी स्वातंत्र्यानंतर, तरूणांनी राजकारणापासून दूर राहावे, चळवळीत पडूं नये असे प्रतिपादू लागले. स्वातंत्र्यपूर्व काळांत स्वदेशी, स्वावलंबन, काटकसर आदिंनी भारलेली पिढी स्वातंत्र्य मिळतांच उपभोगाचे निरनिराळे मार्ग शोधू लागली, त्याचा कळत नकळत परिणाम तरूण पिढीवर होऊन जुन्या पिढीस त्यांनी "हिपॉक्रसी" त (बोलायचे एक व करावयाचे दुसरेंच) जमा केले व त्या पिढीच्या विरोधी भूमिका घेतली.

ह्या मानसिक बदलांस खतपाणी घातले ते शिक्षण पद्धती व त्यांतील उणीवांनी सुशिक्षित झाल्याशिवाय आपली वैयक्तिक व कौटुंबिक प्रगती होऊ शकत नाही ह्याची जाण फार मोठ्या समाजास आली व तो समाज शिक्षण घेऊं लागला, ही जमेची बाजू ठीक झाली. पण ह्या शिक्षणाचा उपयोग अर्थार्जनाकरितां व्हावयास पाहिजे, कारण प्रगती नुसत्या शिक्षणाने कशी होणार ? त्याला अर्थार्जनाची जोड हवीच. त्यामुळे मागील पिढीने अर्थार्जनाचे शिक्षणाशी जुळविलेले गणित चुकूं लागले. कितीही नवीन खाती सरकारने उघडली तरी नोकरी मागणाऱ्यांची संख्या, सुशिक्षित पिढी तयार होऊं लागल्यामुळे, नोकरीच्या जागांच्या प्रमाणांत जास्त होऊं लागली व अपेक्षित नौकरी मिळेनासी झाली. सहाजिकच त्यामुळे निर्माण होणारी बेकारी. विद्यार्थी दशेतील कल्पनांचा व स्वप्नांचा चुराडा व त्याचबरोबर कौटुंबिक अपेक्षांना धक्का बसूं लागला व तरुणांतील असंतुष्टता वाढूं लागली. ह्या मिळणाऱ्या शिक्षणाचा उपयोग फक्त नोकरीतच होऊं शकतो हे निदर्शनाला आल्यामुळे तर मानसिक तोल जाण्याचीच पाळी आली व हीच असंतुष्टता सामुदायिक रीतीने तरूणांना एकत्र आणण्यास व एखाद्या तत्सम प्रश्नावर आंदोलन उभारण्यास कारणीभूत झाली.

अनेक राजकीय पक्ष, इतकी वर्षे कार्यरत राहूनही ह्या देशांतील सामाजिक वा आर्थिक विषमता कमी करूं शकले नाहीत हे एक सत्य आहे. समाजांतील शोषण त्याचे होणारे दुष्परिणाम, आर्थिक विषमता, त्यामुळे झालेल्या आकांक्षांचा चुराडा ही वास्तव परिस्थितीची जाण तरुणांना चीड आणण्यांस कारणीभूत झाली नाही तरच नवल !

युवकांची असंतुष्टता निरनिराळ्या मार्गाने प्रकट होत असतां शासनाने, वा समाजानेही त्यांच्याकडे सहानुभूतीपूर्वक पहाण्याचे टाळले आहे. शासनाची दमन यंत्रणा ही अशा बाबतीत अति कार्यक्षम राहिली. झालेले आंदोलन लाठीमार, गोळीबार, अटक इ. मार्गाने दडपून टाकण्याचा त्यांनी सपाटाच चालविला व सामाजिक कार्यकर्त्यांनीही कांही मूलभूत विचार करुन समस्या मुळांतून सोडविण्याचा कधी विचारच केला नाही. त्यामुळे तात्पुरती आंदोलने भिटली असे वाटले तरी खऱ्या अर्थाने ती न संपता धुसमुसतच राहिली व दुसरा प्रश्न हाती आल्यावर अधिक वेगाने उफाळून वर आली. सर्व सामान्यपणे, "सरकार" ची प्रश्न सोडविण्याची असमर्थता प्रकट होत गेल्यामुळे ही आंदोलने सरकारविरोधी म्हणजे "प्रस्थापिता विरुद्ध" अशा स्वरुपांत राहिली.

ही युवक आंदोलने विद्यार्थी - आंदोलनेच असल्यामुळे ती शहरांपुरतीच मर्यादित राहिली. तिची व्याप्ती ग्रामीण भागांत वाढू शकली नाही. जो कांही ग्रामीण युवक कॉलेजांत शिकत असे तोच कांही अंशी आंदोलनांत ओढला गेला. शहरी स्वरुपाच्या आंदोलनामुळे ह्याचे नेतृत्व नेहमीच वरील वर्गातून येणाऱ्या व श्रीमंत तरुणांकडे राहिले. त्यांची वृत्ती कोठल्याही विषयाच्या मूलभूत समस्यांचा विचार करण्याची नसल्यामुळे हे नेतृत्व त्या दृष्टीने मोठें थिटे पडले. एवढेच नव्हे तर ग्रामीण व मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांच्या आशा-आकांक्षा, भावना, ह्यांशी हे नेतृत्व कधीच समरस होऊं शकले नाही. श्रीमंत तरुणांचे पालक शासनाशी बांधिलकी ठेवून असणारे असल्यामुळे ज्यांनी ह्या तरुण नेतृत्वास "प्रस्थापिता विरुद्ध" फारसे पुढे सरकूं दिले नाही त्याचे अनेक परिणाम आंदोलनांवर झाले.

मुख्य म्हणजे श्रीमंत वर्ग व मध्यमवर्ग व ग्रामीण वर्ग ह्यांत एक फार मोठी दरी निर्माण झाली व त्यामुळे ही आंदोलने तत्वज्ञान विरहित, केवळ स्वत:च्या नेतृत्वाचा मोठेपणा मिरवणारी अल्पजीवी राहिलीं. त्यामुळेच ह्या आंदोलनांत आत्मकेंद्रितता व संकुचित वृत्ती निर्माण झाली. कोठल्याही प्रकारची मूलगामी आशय असणारी, प्रभलभ जाणीव किंवा वैचारिक खोली ह्या आंदोलनांत आढळली नाही.

केवळ, एखादा प्राध्यापक, प्राचार्य नको, एखादा विषय नको किंवा हवा, परीक्षा पुढे ढकलावी किंवा मागे घ्यावी इ. फार लहान व दुर्लक्षण्या-योग्य कारणाभोवतीच ही आंदोलने फिरत राहिली.

आंदोलनाचे मार्ग सर्वमान्य हेच होते. बहिष्कार, संप, मोर्चे, पत्रके घेराओ, क्वचित् ठिकाणी सत्याग्रहाचा मार्ग अवलंबिला गेला.

ही आंदोलने वास्तविक सरकार विरोधी असली तरी त्यांनी कोठ-ल्याही विरोधी पक्षाचे नेतृत्व स्वीकारले नाही किंवा कोठल्याही प्रस्थापित युवक संघटनांशी जवळीक साधली नाही.

१९७३ नंतर गुजराथ व बिहार येथे झालेल्या तरुणांच्या आंदोलनाने मात्र हया चळवळीचे स्वरुप पार बदलून टाकले. गुजराथमध्ये सुरू झालेल्या आंदोलनाचे कारण विद्यार्थ्यांना वसतिगृहांत मिळणारे निकृष्ट अन्न हे होते तर बिहारमध्ये परीक्षेतील भ्रष्टाचार हे होते. हया आंदोलनांस सामाजिक आशय लवकरच प्राप्त झाला व त्याची व्याप्ती झपाटयाने वाढू लागली. हया आंदोलनास नेतृत्व ग्रामीण व मध्यमवर्गीय तरुणांचे मिळाल्यामुळे "प्रस्थापिता" विरुद्ध कणखर भूमिका ते घेऊं शकले व लो. ना. जयप्रकाशजींचे मार्गदर्शन लाभल्यामुळे, वैचारिक मूल्यांची सखोलता त्यांत प्राप्त झाली. ग्रामीण व मध्यमवर्गीय नेतृत्वामुळे हो आंदोलने भारतभर पसरूं लागली व परिवर्तनाचा एक भाग त्याने निश्चित केला.

सामाजिक, राजकीय व शैक्षणिक भ्रष्टाचाराचे निर्मूलन ही हया आंदोलनांतील प्रमुख मागणी आहे लोक-निर्वाचित सभासद आपल्या सत्तेच्या पदी गेल्यावर स्वतःचा, स्वतःच्या कुटुंबाचा स्वार्थच पहात असतील तर त्याचा समाजावर होणारा विपरित परिणाम लक्षांत घेतां त्यांना मुदतपूर्व परत बोलावण्याचा लोकशाही अधिकार वापरतां यावा ही दूरदर्शी मागणी हया आंदोलनांत आहे. असे कायद्याने तर झालेच पाहिजे, ते शक्य नसेल तर लोकांची जागृती व लोकांचा दबाव एवढा असावा की त्या सत्तेवर गेलेल्या व्यक्तीस हया अंकुशाची वारंवार जाणीव होऊन, आपले सामाजिक

व राजकीय कर्तव्य करण्यास तो प्रेरित व्हावा हा फार मोठा आशय ह्या मागणीत आहे.

जातपात, हुंडा ह्या सारख्या ज्या सामाजिक वाईट रुढी व परंपरांनी हा समाज दुर्बल बनत आहे. त्यांचा नाश व्हावा व एक बलवान विशुद्ध समाजाची निर्मिती व्हावी ही त्यामागील भावना आहे.

शिक्षणाने नुसते सुशिक्षित न बनवता सुसंस्कृतही बनविले पाहिजे व त्या दृष्टीने त्याची आंखणी झाली पाहिजे. ह्या सुशिक्षित तरुणांस केवळ नोकरीचा आश्रय न घेता स्वत:च्या पायावर उभे राहता आले पाहिजे व त्या करिता त्याला तसे मूलोद्योगी (बेसिक) शास्त्रीय, वैज्ञानिक आणि औद्योगिक शिक्षण मिळाले पाहिजे.

थोडक्यांत, जातपातविरहित, जुन्या वाईट रुढी, परंपरा मधून बाहेर पडलेला, शोषणविरहित, विषमता नसलेला राष्ट्रीय जाणीवांचा विचार करणारा बलवान समाजाच्या निर्मितीचे हे चित्र व हा आशय ह्या आंदोलनाने स्वीकारला आहे.

ह्या आंदोलनाचा भारतीय जनतेवर फार मोठा परिणाम झाला. पक्षीय राजकारणाने, विशेषत: शासन संस्थेच्या धोरणामुळे आगतिक व उदासीन झालेल्या जनतेला युवाशक्तीच्या रुपाने दिलासा मिळाला. कुंठित झालेल्या समाजांत चैतन्य व आत्मविश्वास प्रगटला ह्या निमित्तानेच सर्वशक्तीमान् शासन संस्थेशी संघर्ष करु शकणारी शक्ती निर्माण झाली. ह्याच आंदोलनामुळे शिक्षणाच्या दुरावस्थेचे विदारक दर्शन समाजांस घडले. व सामाजिक अंतर्विरोधाचीही स्पष्टपणे जाणीव झाली. ह्या सर्व गोष्टींचा उपयोग होऊन देशभर क्रांतीसाठी वातावरण निर्माण करण्याचे प्रयत्न झाले व सुदैवाने त्याला मिळत असलेले भरलेले यश आपण अनुभवतो आहोत. ह्या आंदोलनामुळे संसदेतर विद्यार्थी शक्ती ठळकपणे प्रकट झाली.

हे आंदोलन येथे संपलेले नाही. सत्ता कोणाच्याही ताब्यात जावो राजकीय, सामाजिक, शैक्षणिक भ्रष्टाचार पूर्णपणे निपटून निघेपर्यन्त ते

आतां थांबूही नये. स्वा. सावरकरांनी म्हटले आहे –

"A battle of Freedom once begun, is carried down from Sire to Son, though often lost is ever won"

ही भ्रष्टाचारा विरुद्ध सुरु झालेली लढाई – चालू राहिली पाहिजे – चालूच राहिली पाहिजे !

केवळ आंदोलन हे संघर्षाचे एकाकी स्वरुप झाले, त्याला आता रचनेची, प्रत्यक्ष कृतीची जोड देण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. केवळ उस्फूर्तता हा दोष ठरण्याचा संभव आहे, त्याला सातत्याची जोड ही अत्यावश्यक आहे. शैक्षणिक क्षेत्रातील परिवर्तन ह्याची फारकत न करता ते परस्परांस पूरक होऊन जोडले जातील ह्याची काळजी घेतली पाहिजे. आंदोलन क्रांतीकारक बनण्याकरिता मालकी हक्कासारख्या मूलभूत प्रश्नाला हात घातला पाहिजे, म्हणजे आंदोलनाची सामाजिक उपयुक्तताही वाढत राहील.

●●●

मराठी ग्रंथ संग्रहालय पुणे
३७५
दि. ब. स्पृहे
विषय मालक
क्रमांक स्थळ

नियोजन

नियोजन म्हणजे आखणी. देशाचे आर्थिक नियोजन म्हणजे देशाच्या आर्थिक विकासक्रमाची शिस्तबध्द आखणी. विकासाचे साध्य, विकासांची साधने व विकासाचा मार्ग याचा विचार करून ते ठराविक मुदतीत अंमलात आणण्याचा प्रयत्न करणे म्हणजे नियोजन करणे होय.

दुसऱ्या महायुध्दानंतर "आर्थिक नियोजनास" तज्ज्ञांनी अधिकृत मान्यता दिली व आज तर मागास देशाच्या आर्थिक विकासाकरितां ती गरज होऊन बसली आहे महायुध्दापूर्वी १९२८ साली रशियाने प्रथम नियोजन अंमलात आणून आर्थिक विकास साधला. कम्युनिस्ट राज्यांत सर्व उत्पादनाची साधने सरकारच्या मालकीची असल्यामुळे, कोणती साधने किती प्रमाणात वाढवायची वा कोणते उत्पादन किती प्रमाणात करावयावे हे ठरविणे आवश्यक व सोयीचेही असते. त्यामुळे नियोजन म्हणजे सरकारी ताब्यात उत्पादन यंत्रणा जाणे म्हणजेच हुकूमशाही आणणे अशा कांही निग्रह

करून घेतला व नियोजनापासून दूर राहण्याचा प्रयत्न केला. पाश्चिमात्य देशांत नियोजन न करतांही त्यांचा विकास कसा झाला पण ती परिस्थिती फार निराळी होती. पाश्चिमात्य देशांत प्रथम औद्योगिक क्रांती झाली. यंत्राच्या साह्याने उत्पादनाचा वेग खूपच वाढला. कच्चा माल स्वस्त दरांत मिळविण्याकरितां व पक्का माल विकण्याकरितां त्याच्या हाती हमखास वसाहती होत्या. त्यांचे शोषण त्यांना करता आले. त्या काळात लोकसंख्येचा प्रश्न भेडसावणारा नसल्यामुळे नियोजन न करताही पाश्चिमात्य राष्ट्रांना आर्थिक प्रगती करता आली.

मागास देशांना आज आर्थिक प्रगती करण्याकरितां अनेक गोष्टींना तोंड द्यावे लागत आहे. त्यांच्याकडे करण्याकरतां वसाहती नाहीत व तसे शोषण आज कोणी सहनही करणार नाही. औद्योगिक क्रांतीच्या काळांत मजुरांना अर्धपोटी ठेवून देशांत आर्थिक-नफा वाढविता आला. तो दडपशाही आज चालणार नाही. लोकसंख्येच्या वाढीचा प्रश्न हा फार मोठा प्रश्न मागास राष्ट्रांपुढे आहे. उत्पादन थोडेसे वाढेपर्यन्त लोकसंख्येतही वाढ होते व उत्पादन वाढूनही माणसी उत्पन्न तेच शिल्लक राहते. पाश्चिमात्यांच्या कुशल तंत्रज्ञानांशी स्पर्धा करणारी जास्त प्रभावी यंत्रणा हाताशी नसणे हाही एक अडचणींचा घटक आहे. ह्या सर्वांचा विचार करतां, पाश्चिमात्य देशांनी आर्थिक प्रगतीकरिता घेतलेला वेळ मागास देशांना घेता येणार नाही व त्यांच्याप्रमाणे शोषणही करता येणार नाही, हे लक्षांत घेऊन आर्थिक प्रगती करून घ्यावयाची असेल तर पद्धतशीरपणे, साधने, साध्य व विकासाचा मार्ग निश्चित करून निश्चित लक्ष ठरविणे आवश्यक आहे व त्यानुरूप प्रगतीचा टप्पा गाठणे आवश्यक आहे.

नियोजन कां हवे ह्याचा विचार करतानां त्याची कारणे आपणास अशी मांडता येतील.

(अ) जलद आर्थिक विकास साधणे.

(ब) देशातील सर्व साधन संपत्तीचा योग्य उपयोग होईल अशी व्यवस्था करणे.

(क) आर्थिक विकासास योग्य वळण व दिशा देणे.

(ड) विकासाचा फायदा सर्व वर्गांना योग्य प्रमाणांत मिळवून देणे.

(इ) आर्थिक विकासाच्या आड येणाऱ्या सामाजिक, राजकीय, आर्थिक परंपरा व रुढींच्या अडचणी दूर करणे.

(ह) प्रौढ व्यक्तीस योग्य ते काम व पुरेसे वेतन मिळेल अशी व्यवस्था करणे इ.साठी नियोजन हे टप्प्याटप्प्याने करावयाचे असते.

प्रत्येक योजनेचा (टप्प्याचा) काळ किती असावा हे निश्चित सांगता येणार नसले तरी तो फार छोटा – वर्षा-सहा महिन्यांचा वा फार मोठा – १५–२० वर्षाचा असू नये. सर्वसाधारणपणे पांच वर्षाचा असावा म्हणजे आपण ठरविलेली ध्येये कितपत पूर्ण झाली व त्याकरता काय करावयास पाहिजे ह्याचे सिंहावलोकन दरवर्षी करता येते. तसेच नियोजन म्हणजे केवळ एखाद दुसरी पंचवार्षिक योजना नव्हे. प्रत्येक योजना भावी विकासाची पायाभरणी करीत असते व पुढील पंचवीस तीस वर्षाचे चित्र डोळ्यापुढे ठेऊन आजची आखणी होत असते.

सर्व समाजाच्या गरजा व आकांक्षा लक्षांत घेऊन नियोजनाची आखणी करणे जास्त उपयुक्त ठरते. अशा योजनांत समाजवादाची व्यापक तत्त्वे असली तर तो लोकांचा उत्साहही वाढवू शकते व अशा योजनेने सामाजिक व आर्थिक विषमता निघून जाईल असा विश्वास निर्माण होतो.

सध्या जगांत आर्थिक विकासाच्या तीन निरनिराळ्या पद्धती आहेत.

(१) अनिर्बंधपणे खाजगी कारखानदारीस वाव ठेवणे (भांडवलशाही)

(२) सर्व उत्पादन साधने शासनाच्या हाती ठेवणे (साम्यवादी)

(३) वैयक्तिक नफ्यावर नियंत्रण ठेऊन खाजगी कारखानदारीचे क्षेत्र कायम ठेवणे पण कांही क्षेत्रे शासनाने आपल्या हाती घेणे.

आपल्या देशाने तिसरी पद्धती स्वीकारली असल्यामुळे भांडवलदारांची आर्थिक मक्तेदारी व शासन संस्थेची राजकीय मक्तेदारी हे दोन्ही दोष आपण टाळले आहेत.

देशाचे सामाजिक व आर्थिक जीवन सर्व प्रकारच्या शोषणांपासून मुक्त करणे व सर्वांना विकासाची समान संधी प्राप्त करून देणे हा नियोजनाचा व्यापक हेतू असला पाहिजे.

नियोजनामुळे अशी उत्पादनवाढ होणार हे आपण गृहित धरतो, तसेच त्यामुळे रोजगाराच्या संधी वाढणे, जीवन वाढणे हेही अपेक्षित आहे. राजनैतिक सुरक्षितता हा नियोजनाचा जसा एक पैलू आहे, तसेच सामाजिक समानता व सुरक्षितता निर्माण होणे हाही महत्त्वाचा भाग आहे. एकूण, नियोजनामुळे केवळ आर्थिक विकासच साधत नसून सामाजिक व राजकीय पूनर्रचना योग्य मार्गाने साधता येते.

मागास देश प्रामुख्याने शेतीप्रधान आहेत त्या देशाचा विकास करण्याकरितां शेती विषयक उत्पादनवाढींच्या योजनांना तर प्राधान्य द्यावेच लागते पण त्याचबरोबर औद्योगीकरणांच्या वाढीकडेही लक्ष द्यावयास पाहिजे. दोन्हीपैकी कोणत्याही एकाच गोष्टीकडे लक्ष दिल्यास तो विकास असमतोल होईल. शेतीचा विकास साधण्याकरिता शेतीतून उत्पादन करणाऱ्यास त्याचा वांटा मिळण्याची निश्चिती देता आली पाहिजे. म्हणजेच "कसेल त्याची जमीन" हे तत्त्व मान्य केले पाहिजे. उत्पन्न वाढू शकणारा फार मोठा वर्ग भूमिहीन कामगारांचा आहे. त्यांना जर पडीत जमिनी दिल्या तर त्या जमिनी उत्पादनक्षम होतीलच शिवाय कामगारवर्ग स्वत:च्या जमिनीतून जास्त उत्पादन काढण्याचा प्रयत्न करील. सरंजामशाही पद्धतीत हजारो एकराची जमीन एकाच्याच मालकीची असते व तो सर्व कामे नोकराकरवी करुन घेत असतो. अशाप्रकारे दुसऱ्याकडून जमिनीची वहिती करणाऱ्या व स्वत: फक्त नफ्याचे वाटेकरी असणाऱ्या व्यक्तीस स्वत:च्या मालकीची जमीन ठेवण्याचा नैतिक अधिकार नाही. ती जमीन त्याच्या मालकीतून काढून घेण्याकरिता योग्य कायदे करणे, त्यांची अंमलबजावणी करणे, जमिनीचे फार लहान तुकडे न होऊ देता प्रत्येक कुटुंबांकडे त्याला

किमान निर्वाहक्षम एवढी जमीन ठेवणे हा त्याचा प्राथमिक भाग झाला. दुसऱ्या भागात प्रत्यक्ष उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने जलसिंचनाच्या योजना आखणे, नवीन धर्तीवर शेती करण्यास उत्तेजन देणे, सुधारित बी-बियाणे, शेतीची अवजारे, खते योग्य भावांत पुरविणे व तशा सोयी करणे ह्यांचा विचार होईल. प्रत्यक्ष उत्पन्न निघून भागणार नाही. ते बाजारपेठेपर्यन्त नेण्याकरिता वाहतुकीची साधने निर्माण करणे व शेतीमालाला योग्य भाव मिळण्याची तजवीज करणे हे तेवढेच महत्त्वाचे आहे.

उद्योगधंद्यांचा विचार करता कांही उद्योगधंदे सरकारी मालकीचे (पब्लीक सेक्टर्स). कांही सहकारी पद्धतीचे (को-ऑपरेटिव्ह सेक्टर) व कांही खाजगी मालकीचे (प्रायवेट सेक्टर) राहतील. त्यांना योग्य भांडवल, कच्चा माल, बीज, पाणी व बाजारपेठा उपलब्ध करून देण्याचा विचार करावा लागेल.

कामधंदा, उत्पादन व मालाचा खप ह्या गोष्टी एकमेकांशी अत्यंत निगडित असल्यामुळे त्यात व्यत्यय उत्पन्न होणार नाही ही काळजी घ्यावी लागते.

थोडक्यांत नियोजनाची योग्य आंखणी झाल्यास जनतेच्या गरजा, अन्नधान्य, शिक्षण, निवारा, वैद्यकीय मदत, इ. तांतडीने भागण्यास मदत होतेच शिवाय शास्त्रीय संशोधन, उच्चशिक्षण मोठ्या कारखान्यांची उभारणी अशा खर्चिक बाबीचाही विचार करतां येतो.

ह्या पार्श्वभूमीवर भारताची पहिली पंचवार्षिक योजना १९५१ ते १९५५ अशी राबविली गेली. योजनेच्या अखेरीस राष्ट्रीय उत्पन्नांत १८ टक्के वाढ झाली. अन्नधान्य २० टक्केनी वाढले. कापूस ४५ टक्के तर तेलबिया ८ टक्क्यानी वाढल्या. १ कोटी ७० लक्ष एकर जमीन पाणीपुरवठ्याखाली आली. वीजेचे उत्पन्न २.३ दशलक्ष किलोवॅट वरून ३.५ दशलक्ष किलोवॅट एवढे झाले. सिमेंटचे उत्पादन २ ७ दशलक्ष टनावरुन ४.३ दशलक्ष टन झाले. लोखंड व पोलादाच्या अवजड उद्योगधंद्याची उभारणी पूर्ण होत आली. उद्योगधंदे वाढल्यामुळे समाजविकासाच्या योजना, शिक्षण, ग्रामीण उद्योगधंदे

लहान उद्योगधंदे हे वाढू लागले च उत्पादनांत झालेल्या वाढीमुळे लोकांच्या दैनंदिन गरजा भागविणे सोपे जाऊ लागले.

उत्पादनांत भरपूर भर पडल्याशिवाय राष्ट्रीय उत्पन्नांत वाढ होत नाही व लोकांचे राहणीमानही उंचावू शकत नाही. उत्पादनांत वाढ व्हावयाची म्हणजे देशांतील नैसर्गिक साधनसंपत्तीचा शोध, उपयोग व हा कार्यक्रम हाती घेणे आवश्यक असते. म्हणूनच पोलाद, यंत्रसामुग्री, कोळसा, रासायनिक द्रव्ये यासारख्या मूलभूत उद्योगधंद्यांना वाढवावे लागते.

ज्या देशांत लोकसंख्या जास्त आहे तेथे लष्करी कार्यक्रम आंखून लोकांना कामधंदा पुरविला जातो पण असा कार्यक्रम आंखतांना शांतता व समानतेची मूल्ये जपण्याचा प्रयत्न केला जात नसल्यामुळे भारताने ते कटाक्षाने टाळले आहे.

भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा काल १९६१–६६ आहे. ह्या काळांत राष्ट्रीय उत्पन्न २५ टक्क्याने वाढले आहे.

तीसरी योजना १९६६ ते ६९ व ४ थी ६९ ते ७४ आंखली गेली होती. सध्या ५ वी पंचवार्षिक योजना चालू आहे.

देशांतल्या आर्थिक विकासाच्या कार्यक्रमांत प्रत्येकजण हा उत्पादक, उपभोक्ता व नागरिक ह्या नात्याने संबंधित असतो. समाजाला उपयुक्त असे कोणतेही काम आपण करतो त्यावेळी आपली उत्पादनाची भूमिका असते जीवनांतील अनेक गरजा भागविण्याकरिता आपण निनिराळ्या वस्तूंचा उपभोग घेत असतो व नागरिक म्हणून आपणांस आपले कर्तव्य पार पार पाडावयाचे असते. नागरिक म्हणून आपल्या समोवतालच्या सामाजिक व राजकीय प्रश्नांबद्दल आपण नेहमी जागरुक असले पाहिजे व आपले विचार-पूर्वक बनविलेले मत प्रभावी करण्यासाठी योग्य दिशेने प्रयत्न केले पाहिजे.

अज्ञान व आळस ह्यांचा त्याग करून जेवढे आपण आपल्या कामाशी समरस होऊ तेवढा जन-कल्याणाचा हा कार्यक्रम योग्य प्रकारे पार पाडण्यास मदत केल्यासारखेच होईल.

कालच्यापेक्षा आज नवीन कांही केले पाहिजे, शिकले पाहिजे ही जाणीव निर्माण झाली की व्यक्ती व समाज परंपरागत जुनाट चाकोरीतून बाहेर पडतात प्रगतीशील बनत असतात, आपली उपक्रमशीलता वाढवित असतांना, येणाऱ्या अडचणी सरकार समोर मांडीत राहिले पाहिजे, पण शेवटी समजूतदारपणा जितका अधिक तितका तो सर्वांच्या फायद्याचा होतो.

आर्थिक विकासाकरितां भांडवलसंचय आवश्यक आहे. इन्शुरन्स, सी. टी. डी, कर्जरोखें, बँक ह्यांत गुंतविलेला पैसा हा भांडवलाचे काम करतो. प्रत्येकांने नागरिक म्हणूनही बचत स्वीकारली पाहिजे व भांडवल संचयाकरिता सरकार वेळोवेळी जी करवाढ करेल ती ही स्वीकारली पाहिजे. मागास देशातील लोकांना बचत करावयास सांगणे म्हणजे एक क्रूर चेष्टाच आहे, पण तो भांडवल संचयाचा मार्ग आहे हे विसरून चालणार नाही.

भाववाढ झाल्याबरोबर वेतनवाढीची मागणी पुढे येते. वेतनवाढ करीत गेल्यास अधिक भाववाढ होते. हे दुष्टचक्र थांबविण्यासही मदत केली पाहिजे. लोकांनी विवेकशील बनून आर्थिक विकासाला आवश्यक अशा सुधारणांचा अंगिकार केला तर समाजजीवन जलद्गतीने चैतन्यशील बनू शकेल.

मागास देशांनी आर्थिक विकास साधण्याच्या भरांत लोकशाहीचा बळी देता उपयोगी नाही. ह्या करिता राजकीय बाबतीत फारच जागरूक राहण्याची आवश्यकता आहे. नियोजनाची आंखणी व योजनांची पूर्ती ह्या बाबतीत जनतेने दक्ष सहकार्य देणे आवश्यक आहे. लोकशाहीवर श्रध्दा असणारे सर्व पक्षातीत भूमिकेवरुन ह्या बाबतीत सहकारी होऊ शकले तर फार मोठे कार्य होईल. सरकारवर अंकुश राहण्याबरोबरच नियोजनाला आवश्यक असे नवे नेतृत्वही हळूहळू वाढीस लागेल.

हे सर्व घडत असतांना सरकारनेही अत्यंत प्रामाणिक व भ्रष्टाचारापासून मुक्त राहणे किती आवश्यक आहे हे सांगणे नकोच.

संपूर्ण क्रांती

मित्रांनों क्रांती आहे – संपूर्ण क्रांती आहे – हे आंदोलन केवळ बिहार विधानसभा विसर्जित करण्याकरितां नाही. आपल्याला दूरचा पल्ला गांठावयाचा आहे. ह्या क्रांतीसाठी तुम्हाला हालअपेष्टा सहन कराव्या लागतील, त्याग सहन करावा लागेल, लाठीमाराला तोंड द्यावे लागेल, छातीवर गोळ्या झेलाव्या लागतील, कदाचित् मालमत्तेलाही मुकावे लागेल.

अशा प्रकारची संपूर्ण क्रांतीची घोषणा लोकनायक जयप्रकाशजींनी ५ जून १९७४ ला पाटणा येथील गांधी मैदानावर दहा लाख लोकांच्या विराट सभेत केली. तत्पुर्वी त्यांनी एक प्रचंड मोर्चा राजभवनावर नेऊन राज्यपाल आर. डी. भंडारे ह्यांना लाखों मतदारांच्या सह्या व अंगठे असलेले निवेदन दिले. १९७२ साली लोकांनी निवडून दिलेला काँग्रेस पक्ष, हा लोकांच्या किमान गरजा – अन्न, वस्त्र, निवारा – पुरवूं शकला नाही त्यामुळे ह्या पक्षाला सत्तेवर राहण्याचा कोणताच नैतिक अधिकार नाही. त्यांनी राजीनामा

द्यावा व दुसऱ्या योग्य व्यक्तींना कारभार करण्याची संधी द्यावी अशी मागणी जयप्रकाशजींची होती.

त्यापूर्वी जयप्रकाशजी गुजराथेत जाऊन आले होते. मोरवा येथील इंजिनियरींग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी, बोर्डींगांत चांगले अन्न मिळत नाही म्हणून पुकारलेला संप सर्व राज्यभर पसरला व सरकारी भ्रष्टाचाराचे अनेक दाखले समोर यावयास सुरवात झाली. अशा भ्रष्ट राज्यकर्त्यांना सरकारमध्ये राहता येणार नाही. ही राज्यव्यापी चळवळ युवकांनी उभारली. परिणामतः सरकारला नमावे लागले – विधानसभा बरखास्त करावी लागली व नवीन निवडणूकी द्याव्या लागल्या.

युवा शक्तीचे हे अपूर्व दर्शन जयप्रकाशजींना घडले व त्यांच्या चिंतनास जोर आला. सर्व जीवन देशास अर्पण करणाऱ्या ह्या त्यागी पुरूषाची गेली पन्नास वर्षे मातृभूमीच्या सेवेत गेलेली आहेत समाजकारणांतले व राजकारणांतले सर्व चढउतार त्यांनी अनुभविलेले - त्यामुळे त्यांच्या चिंतनांत अनुभवाचे चित्र न उमटल्यासच नवल !

गुजराथेतून बिहारमध्ये आल्यानंतर विद्यार्थ्यांनी आपल्या भ्रष्टाचाराच्या विरुद्ध चालविलेल्या आदोलनास त्यांची – मदत मागितली, त्यांनी मार्गदर्शन करण्याकरितां अट घातली. ते म्हणाले, "लोकशाही हा नागरिक जीवनाचा मूलाधार – पण निवडणुकांच्या पद्धतींत भ्रष्टाचार शिरल्यामुळे निवडणुकीच्या मूळ कल्पनेला मूठमाती देणाऱ्या गोष्टी घडूं लागल्या आहेत. पैसे चोरणे, खोटेपणा, लांचखोरी, बळजबरी याद्वारे जेथे मते मिळविली जातात तेथे निवडणुकांना व लोकशाहीला अर्थच उरत नाही." त्यांनी विद्यार्थ्यांना बजावले "ज्या लोकशाहीसाठी तुम्ही लढणार त्या लोकशाही तत्त्वांशी एकनिष्ट राहून आंदोलन करावयाचं असेल तर ते फक्त शांततामय मार्गाने व पक्षांतीत असले पाहिजे.

इंग्रजांविरूद्धच्या लढ्यांत जयप्रकाशजी क्रांतीकारकांचे नेतृत्व करीत होते. तेव्हां इंग्रजी राज्य हे प्रस्थापित होते. भारतीय स्वातंत्र्य हे सर्वांना

मोह पाडणारे उच्च व उत्तुंग ध्येय समोर होते. ह्या ध्येयप्राप्तीमुळे प्रस्थापितांविरुद्ध जाण्याकरितां लोकमत तयार करणे हे काम क्रांतिकारकांनी व देशभक्तांनी केले. त्यांकरितां त्याग केला, हालअपेष्टा, तुरुंगवास पत्करला मातृभूमीच्या चरणी जीवन बलीदान केले व लोकमत तयार होताच "राजकीयदृष्ट्या भारतावर पकड ठेवणे अशक्य आहे." ही जाणीव होऊन इंग्रजाने येथून काढतां पाय घेतला. ह्या घटना समोरच असल्यामुळे तरूणांना मार्गदर्शन करतांना त्यांनी एक एक विचारांचा पैलू त्यांच्या समोर ठेवला.

राजकीय भ्रष्टाचाराचे निर्मूलन हा त्यांनी आपल्या संपूर्ण क्रांतीचा एक महत्त्वाचा पैलू मानला. निवडणुकांतील भ्रष्टाचार हा लोकशाहीतील भ्रष्टाचारास जन्म देतो व निवडणुकीतील अनीती हे सर्व राजकारणच अनीतीमय करून टाकले. निवडणुकीत पैसा खर्च करून निवडून येणारा उमेदवार, निवडून आल्यानंतर तो पैसा वसूल करण्याचे व पुढच्या निवडणूकीच्या तरतुदीचे मार्ग शोधत असतो व मिळेल त्या वैध व अवैध मार्गाने पैसा गोळा करतो. असा उमेदवार जनतेचे काम केव्हां व कसे करूं शकणार ? उलट सर्व लोकशाहीचा ढाचाच तो खिळखीत राहतो. ह्याकरितां कमी खर्चाच्या, भ्रष्टाचारविरहित निवडणुका झाल्या पाहिजेत उमेदवार, पक्षाने लोकांवर न लादतां, लोकांनीच त्याची निवड केली पाहिजे व निवडणूक यंत्रणा सोपी व जनताभिमुख केली पाहिजे.

लोकांनी निवडून दिलेला उमेदवार आपले काम व्यवस्थित करीत नसेल तर त्याला परत बोलाविण्याचा अधिकार मतदारांना असला पाहिजे (राईट ऑफ रिकॉल) निवडणूक यंत्रणेत ही सुधारणा करणे आवश्यक आहे, असे मत त्यांनी मांडले.

देशांत जर एकच बलवान पक्ष असेल व त्याला पर्यायी पक्ष नसेल तरच तो पक्ष हळूहळू हुकुमशाहीत परिणत होत जातो. हे व्हावयाचे नसेल तर सत्ताधारी पक्षाला विरोध करणारा तेवढाच बलवान् पर्यायी पक्ष असणे लोकशाहीच्या संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे,

विद्यार्थ्यांचे नेतृत्व संपूर्ण क्रांतीकडे नेण्याकरितां युवकांनी बदलण्याची

आवश्यकता जयप्रकाशांनी प्रतिपादन केली व त्यांना जातपात तोडून नव-समाज निर्मितीचे आव्हान केले. अस्पृश्यता, हुंडा, कर्मकांड ह्यांचा त्याग केल्यानेच तरुण एकत्र येऊं शकेल व युवकांचा विकास खुंटविणाऱ्या जुन्या रुढी, परंपरा ह्यांतून मुक्त होणारा युवकच सामाजिक क्रांतीचे प्रतीक बनूं शकतो. हे त्यांनी आग्रहाने मांडले. ते म्हणतात, "आपले ध्येय उदात्त आहे म्हणूनच आपण शुद्ध साधने वापरायला हवीत. दुष्ट साधनांचा वापर करून चांगले फळ कधीच मिळणार नाही. अलीकडे जगांत व देशांत ज्या घटना घडल्या त्या पाहून साधन शुचितेवरील माझा विश्वास दृढ झाला आहे."

ह्या देशाचा आर्थिक प्रश्न सोडविण्यांस समाजवादाशिवाय दुसरा पर्याय नाही हे त्यांचे स्पष्ट मत आहे. जयप्रकाश म्हणतात, "समाजवाद म्हणजे नुसता मीठ भाकरीचा प्रश्न सोडवणे आहे काय ? नाही असे मी म्हणायला तयार नाही. समाजवादी समाज रचनेने लोकांना खऱ्या स्वातंत्र्याचा आनंद चाखायला मिळेल."

सांस्कृतिक व वैचारिक पैलूवद्दल जयप्रकाश म्हणतात, "मनुष्य त्याची चेतना किंवा जाणीव आणि त्याने बनविलेला समाज व संस्कृती ह्या गोष्टी केवळ जड परंतु द्वंद्वात्मक प्रवृत्तीचा आविष्कार असेल तर मनुष्यांत माणुसकीची प्रेरणा कशामुळे येते ? दुर्बल, गरीब, रुग्ण ह्यांची माणसाला कणव कां यावी ? मनुष्याने सदाचरण कां करावे ? ह्याचे उत्तर भौतिक वादांत सापडत नाही. वस्तुनिष्ठ वैज्ञानिक निरीक्षणांत ज्ञाता व ज्ञेय हे द्वैत कायम असते. जेव्हां आत्मज्ञानाची प्रचीती येते तेव्हा त्या ज्ञानाच्या पोटी हे लोप पावते व ज्ञाता व ज्ञेय एकरुप होतात, याच आत्मज्ञानाच्या, एकरुपतेच्या, अद्वैतावस्थेच्या अनुभूतीच्या धडपडीत नैतिकतेचा पाया आहे. ज्याला हे आत्मज्ञान झाले आहे त्याला नितीचे बंधन, बंधन म्हणून राहातच नाही, त्याच्या हातून सद्वर्तन व सदाचार श्वासोच्छ्वासाप्रमाणे सहज होत राहतो."

राजकीय व आर्थिक प्रश्नांचा विचार करतांना त्याला जयप्रकाशांनी दिलेली अध्यात्मिक विचारांची बैठकही अत्यंत महत्त्वाची समजावी लागेल,

त्याबद्दल ते म्हणतात, "वैयक्तिक असो, सार्वजनिक असो, राजकीय असो, व जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रातल्या वृत्तीत परस्पर मेळ साधावयाचा असेल तर त्यासाठी सबंध जीवनालाच अशा तत्त्वज्ञानाचा आधार असणे आवश्यक आहे."

केवळ भांडवलशाही नष्ट करुन समाजवादाची स्थापना होत नसते हे स्पष्ट करतांना ते म्हणतात, "विकेन्द्रिकरण आणि राजसत्तेचा क्षय ह्या कल्पनांकडे माझे लक्ष जाऊं लागले. मनुष्यांमनुष्यांतले परस्पर संबंध व त्यावर सामाजिक नियंत्रण कसे असावे व ह्या बाबतीत दुसरे कोणते पर्याय शक्य आहेत त्याचा सतत शोध घेतला पाहिजे."

शिक्षण क्षेत्रांतील क्रांती हा जयप्रकाशजींना अभिप्रेत असलेला सर्वांत महत्त्वाचा बदल होय. शिक्षणांतून निर्जीव वीर तयार न करतां प्रत्यक्ष कार्यानुभवाची जोड देऊन जीवनाला व जीवनांतील संघर्षांला सामोरी जाणारी, तरुण पिढी त्यांना हवी आहे. त्याकरितां शिक्षण हे जसे शासनमुक्त असावे असे ते मानतात तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगांना स्पर्शत त्यांचा सर्वांगीण विकास घडावा असे त्यांना वाटते.

ही क्रांती घडवून आणण्याकरितां संघर्ष व सत्याग्रहाचे माध्यम शांततापूर्ण मार्गाने वापरले जावे हा त्यांचा आग्रह आहे. बिहार आंदोलनांत त्यांनी युवकांना घोषणाच दिली, "चाहे जैसा हमला हो – हात हमारा नही उठेगा."

युवा-शक्ती व जन शक्ती एका महान् ध्येयाकरितां एकत्र आली तर राजसत्ता बदलणेही कठीण नाही अशी खात्री त्यांना असल्यामुळेच त्यांनी सरळ सरळ राजसत्तेला आव्हानच केले, "सिंहासन खाली करो – जनता आ रही हैं."

"सत्याग्रह हे म. गांधींनी शोधून काढलेले एक अमोघ शस्त्र आहे त्यांची जगाला ती एक मौलिक देणगी आहे" असे ते म्हणतात.

क्रांती ही क्रांतिकारकांच्या केवळ मर्जीनुसार होत नसते, क्रांती यशस्वी होण्यासाठी सामाजिक व आर्थिक परिस्थिती परिपक्व व्हावी लागते" हे जाणून प्रस्थापितांविरुद्ध युवा-शक्ती व जनशक्ती जागृत करण्याकरितां ते स्वतः एका महान् आंदोलनाचे नेतृत्व करते झाले.

"प्रस्थापित सरकारला खाली खेचणे हेच एक उद्दिष्ट ठेवून चालणार नाही – आंदोलनापुढे यापेक्षांहीं व्यापक ध्येये ठेवली पाहिजेत" हयाची जाणीव त्यांनी कार्यकर्त्यांना आणून दिली.

हा संघर्ष मर्यादित उद्दिष्टांसाठी नसून, याची उद्दिष्टे फार दूरगामी आहेत. भारतीय लोकशाहीला सुदृढ बनविणे, खरेखुरे जनतेचे राज्य कायम करणे, अन्याय शोषण आदिचे समाजांतून उच्चाटन करणे, तसेच एक नैतिक सांस्कृतिक, शैक्षणिक परिवर्तन घडवून आणणे, ही संघर्षाची उद्दिष्टें आहेत – – शेवटी नव-भारत घडवावयाचा आहे. – "ही संपूर्ण क्रांती आहे" असे जयप्रकाश म्हणतात.

लोकनायक जयप्रकाशजींनी आपली संपूर्ण क्रांतीची कल्पना मांडली व नंतर लगेच ह्या देशांत आणीबाणीचे अंधारयुग सुरू झाले. हूकूमशाहीखाली दडपलेल्या समाजाला आशेचा किरण फक्त जयप्रकाशजींच्या क्रांतीच्या कल्पनेतच दिसत होता, आकाश काळ्याकुट्ट ढगांनी भरलेले असावे व निराशामय वातावरणांतही इंद्रधनुष्य दिसावे म्हणजे जो सुखद अनुभव येतो तसा अनुभव जयप्रकाशजींच्या क्रांती कल्पनेत सामावलेला असल्यामुळे, सर्वोदय नेते श्री गंगाप्रसादजी अग्रवाल ह्यांनी तिला सप्तरंगी क्रांती हे नांव दिले. सप्तरंगी क्रांती हे संपूर्ण क्रांतीस अगदी यथार्थ नांव आहे. कारण समाजाच्या निरनिराळ्या सामाजिक, आर्थिक, राजनैतिक, सांस्कृतिक, वैचारिक, शैक्षणिक व अध्यात्मिक ह्या अंगांचा हवा असणारा बदल जयप्रकाशजींनी सूचित केला आहे व भारतीय नव-समाजाचे एक उच्च चित्र आपणापुढे उभे केले आहे

ते म्हणतात, "सार्वजनिक जीवनांत नैतिक मूल्यांना आज कांही स्थानच राहिले नाही – त्यामुळे जे नैतिक अधःपतन झाले तेच देशाच्या

सध्याच्या दुरवस्थेचे मूळ कारण आहे." ह्या मूळ कारणास हात घालून मूळापासून उखडून टाकण्याकरितां त्यांनी ही सप्तपैलूंची संपूर्ण क्रांतीची कल्पना साकार करण्याचे आव्हान केले आहे.

लोकसभेतील जनता पक्षाचा विजय म्हणजे संपूर्ण क्रांतीची परिणती नाही ह्याचे भान जयप्रकाशजींना आहे. जनता पक्ष जास्त प्रागतिक आहे असा त्यांचा विश्वास आहे व संपूर्ण क्रांतीच्या कल्पनेस तो पूरक ठरेल अशी त्यांना आशा आहे.

संपूर्ण क्रांतीचे ध्येय समोर ठेवून नवभारताच्या उभारणीचे एक उत्कृष्ट व उदात्त चित्रण त्यांनी केले आहे. नव-समाजाच्या उभारणीचे काम निष्ठेने व जिद्दीने करावयास पाहिजे आहे ते आव्हान युवाशक्तीने स्वीकारले आहे. जनशक्तीही त्यांच्या मागे आहे, जरुर पडल्यास संघर्ष करून, आंदोलन उभारुन, सत्याग्रही व शांततेच्या मार्गाने भारतवासियांनी आपले उद्दिष्ट गाठावे ही प्रतिज्ञा लोकनायक जयप्रकाशजींच्या पंचाहत्तराव्या वाढदिवसाच्या निमित्ताने वातावरणांत घुमावी व आचरणांत यावीं.

लोकनायक जयप्रकाशजींना शतशः प्रणाम. अंधेरे में एक प्रकाश – जयप्रकाश जयप्रकाश. संपूर्ण क्रांती यशस्वी होवो.

●●●

शेतकरी संघटना

श्री शरद जोशी ह्यांच्या 'शेतकरी संघटनेस' ग्रामीण भागातून चांगला प्रतिसाद मिळत आहे. गेल्या पाच वर्षांत संघटनेच्या तत्त्वज्ञानाचा प्रचार व प्रसार फार झपाट्याने झाला आहे. एवढेच नव्हे तर भारतीय पातळीवर संघटना बांधण्याचा प्रयोग यशस्वी होत आहे. आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील लोकांचे कुतूहल जागृत झाले आहे.

भारत हा शेतीप्रधान देश आहे. ह्या देशात ७०·८० टक्के लोक शेतींवर उपजीविका करतात. भारत हा एक दरिद्री देश आहे. ५०.६० टक्के लोक येथील दारिद्र्य रेषेच्या पातळीवर जगतात ह्या देशातील दारिद्र्य व गरिबी नाहिशी करावयाची असेल तर शेतीवर जगणाऱ्या लोकांना योग्य मोबदला मिळाला पाहिजे. तो मिळत नाही अशी शेतकरी संघटनेची तक्रार आहे. म्हणूनच "शेतीमालास उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळावा" ही संघटनेची मागणी आहे. तोच संघटनेचा एक कलमी कार्यक्रम आहे संघटनेच्या आतापर्यन्तच्या सर्व चळवळी ह्या, या एकाच मागणीकडे नेणाऱ्या आहेत.

एखादा कारखानदार जेव्हां, त्याच्या कारखान्यात तयार झालेला माल बाजारात विक्री करिता आणतो तेव्हां त्याच्या विक्रीचा भाव तो ठरवितो हा भाव ठरवितांना कारखान्यात गुंतलेले भांडवल, त्यावरील व्याज, कच्चा माल विकत घेण्याकरिता लागणारा खर्च, बाजार पेठेत माल पोहच-विण्याचा खर्च हिशोबात धरून त्यावर नफा आकारुन मालाची किंमत ठरविली जाते. मालाची ताबडतोब विक्री न झाल्यास माल साठवून ठेवता येतो खराब होत नाही.

ह्या उलट शेतकऱ्यांची परिस्थिती आहे शेती माल साठवून ठेवता येत नाही फळे भाजीपाला इ. माल ताबडतोब विकणे आवश्यक असते. धान्य साठवून ठेवण्या इतकी आर्थिक कूवत शेतकऱ्याची नसल्यामुळे तो बाजारात आणून विकण्याशिवाय दुसरा मार्गच नसतो.

खुल्या बाजारात लिलाव होतो. शेतीचे उत्पादन जास्त झाले तर बाजारात माल जास्त येतो व तो कमी किंमतीस विकला जातो माल कमी असल्यास बाजार भाव वाढतो व मालास किंमत जास्त येते अशावेळी सरकार लेव्ही लादून बाजारभावापेक्षा कमी भावात (हमी भावात) माल खरेदी करते. अशा प्रकारे उत्पादन जास्त झाल्यास शेतकऱ्यांची लूट होते व उत्पादन कमी झाल्यास सरकार कमी भावात धान्य खरेदी करुन त्याला फायदा मिळू देत नाही यामुळे शेतकरी तोट्यात येतो. वर्षानुवर्षे हे चालत राहिल्यामुळे शेतीचा हा धंदा तोट्यात चालतो, तो नफा देणारा झाल्याशिवाय गरिबी कमी होणे अशक्य आहे.

एकोणिसाव्या शतकात मार्क्सने कामगारांच्या शोषणाचा सिद्धांत मांडला व तो गणिताने सिद्ध करुन दिला. श्री. शरद जोशी ह्यांनीही शेतकऱ्यांचे विविध स्तरांवर शोषण होते. हा मुद्दा गणिताने सिद्ध करुन दिला आहे. त्या मुळेच, तो एक विसांव्या शतकातील मूलभूत विचार ठरला आहे व जनमानसात रुजत चालला आहे. सर्व राजकीय सामाजिक संघटनांनीही त्याला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष मान्यता दिली आहे.

ओद्योगिक क्रांतीनंतर राष्ट्रान्तर्गत भांडवल निर्मिती करण्याकरिता

वसाहत वाद अस्तित्वात आला. वसाहतीतून कच्चा माल कमी किमतीत खरेदीकरुन औद्योगिक राष्ट्रांनी कारखान्याकरिता वापरला. तयार झालेला पक्का माल वसाहतीत नेऊन भरमसाट नफ्याने विकला व वसाहतीचे शोषण करुन राष्ट्रीय संपत्ती वाढविली.

दुसऱ्या महायुद्धानंतर या वसाहती स्वतंत्र झाल्या. त्यांना दुसऱ्या देशाचे शोषण करुन भांडवल उभे करण्याचा मार्ग शिल्लक राहिला नाही. म्हणूनच त्यांनी भांडवलनिर्मिती करिता औद्योगिककरण, औद्योगिकरणा करिता शेतकऱ्याचे शोषण हा मार्ग अवलंबिला. श्री शरद जोशी ग्रामीण भागात शेतीवर अवलंबून असलेल्या ७०.८० टक्के शोषित समाजाला 'भारत' म्हणून संबोधतात तर शहरात राहणारे, औद्योगिकरणाचा फायदा मिळवणारे जिवनातील सर्व सुखसोयी मिळविणाऱ्या शोषणकर्त्यांना 'इंडिया' म्हणतात.

शेतीवर दोन प्रकारची संकटे येतात एक अस्मानी व दुसरे सुलतानी. अस्मानी म्हणजे निसर्गाचा समतोल बिघडणे वेळेवर पाऊस न पडणे, वनस्पतीत रोगराई वाढणे इ. ह्या कारणामुळे तीन वर्षात एकदाच शेती बरी पिकते म्हणजे दर साल जेमतेम ४२% शेतीचे उत्पन्न येते.

सुलतानी म्हणजे सरकारी संकट हे सरकारने जाणून बुजून निर्माण करून ठेवलेले आहे.

पं. जवाहरलाल नेहरू एकदा म्हणाले होते की, "ह्या देशाचे औद्योगिकरण करावयाचे असेल तर शेतातील उत्पादन जास्तीत जास्त वाढवून ते कमीतकमी किमतीत उपलब्ध करून द्यावयास हवे."

१९५१ साली पहिली पंचवार्षिक योजना अंमलात आली. श्री कृष्णम्माचारींना त्याचे श्रेय आहे त्यांचे उद्‌गार असे "ह्या देशाची उन्नती व्हावयाची असेल तर शेतीमालीचे उत्पादन वाढले पाहिजे व शेतीमालाच्या किंमती मात्र शक्यतो खालच्या पातळीवर ठेवल्या पाहिजेत"

श्री. सी. सुब्रम्हण्यम् हे एक माजी अन्नमंत्री आहेत त्यांनी कबुलीच दिली आहे की, "ह्या देशात शेतीचा व्यवसाय तोट्यात चालतो आहे" आणि तो तोट्यात चालोवा अशीच सरकारी योजना आहे, हा ७०-८० टक्के जनतेवर होणारा अन्याय आहे. त्या अन्यायाविरुद्ध शेतकरी संघटनेचा लढा आहे.

शेतीमालाची हमी किंमत ठरविणारा 'कृषिमूल्य आयोग' अस्तित्वात होता. त्याचे कार्य शेतकऱ्यास न्याय देणारे मुळीच नव्हते शेतीची वाजवी किंमत त्यावर राबणाऱ्या घरच्या माणसाची मजूरी, शेतीस लागणाऱ्या आवजारांची किंमत, बैलाचीं किंमत, बी-बियाणे, खते आणण्याकरितां लागणारा खर्च इ. बजेट न धरतांच कृषि मूल्य आयोग शेतीमालाची हमी किंमत जाहीर करीत असे. शेतकरी संघटनेने घेतलेल्या अशा आक्षेपामुळे तो रद्द झाला आहे व सरकारने "कृषि उत्पादन खर्च आयोग" नेमला आहे. पण त्याचेही काम अद्यापि समाधानकारकरीतीने सूरु झालेले नाही.

आवश्यक तो सर्व खर्च जमेस धरून कांही वस्तूंचे उत्पादन खर्चावर आधारित शेतीमालाचे शेतकरी संघटनेने काढलेले भाव पुढील प्रमाणे आहेत.

कापूस	रु. १२५० क्विंटवल	भाव प्रत्यक्षात मिळतो	रु	५००-६००
गहू	रु. ३५० ,,	,, ,,	रु	१५०-१६०
ऊस	रु. ३०० ,,	,, ,,	रु	१८०-२००
दूध म्हशीचे	रु. ६/- प्रती शेर	,, ,,	रु	४-००
दूध गाईचे	रू. ५-४०/- ,, -	,, ,,	रु	३-४०

औद्योगिक क्षेत्रात तयार होणाऱ्या काही वस्तूवरील उत्पादन खर्चावर आधारीत किंमत व त्यास प्रत्यक्ष मिळणारा भाव पुढील प्रमाणे आहे.

ट्रॅक्टर	– रु. ४०,०००	प्रत्यक्ष किंमत	रु. १,२०००/-
चहा	– रु. ११-५० प्र. किलो	,,	रु. ४०/- प्र. कि.
साधे कापड	– रु. ३/- प्र. मिटर	,,	रु. ६/- प्र मि.
कृत्रिमधागा मिश्रित	– रु. ५/- प्र मिटर	,,	रु, २५/- प्र. मि
औषधी (क्लोरोफिनिकॉल)	– रु. १३३/- प्र.कि.	,,	रु. ३०५०/- प्र कि.

वरील काही उदाहणावरुन औद्योगिक क्षेत्रात किती भरमसाठ नफा मिळविला जातो व शेती उद्योग कसा तोट्यात चालतो हे लक्षात येईल. सरकारचे औद्योगिक मालाच्या किंमतीवर नियंत्रण नाही.

आर्थिक कारणावर शेतकऱ्यांची संघटना बांधणारी, त्यांच्या मुलभूत अडचणींची चिकित्सा करणारी व अन्यायाविरुद्ध लढा देणारी शेतकरी संघटना ही एक मेव संघटना आहे म्हणूनच तिला शेतकरी वर्गाचा पांठिबा आहे.

शेतकरी संघटनेचे १९८० साली पहिले आंदोलन कांद्याच्या भावाकरिता छेडले गेले तेव्हा कांदा १०-१५ रू. क्विंटल विकत होता. परदेशात कांदा पाठविण्यास (चांगला भाव मिळत असूनही) बंदी होती. आंदोलनाचा परिणाम म्हणूण सहकारी संस्थेने ६० रू. क्विंटल प्रमाणे कांदा खरेदी केला.

त्याच काळात कांदा पिकविणारे सर्व शेतकरी कर्जमुक्त झाले.

दुसऱ्याच वर्षी उसाच्या भावाकरिता चळवळ उभारली. शेतकऱ्यांना ३०० रू. टन प्रमाणे उसाची किंमत मिळाली.

१९८१-८२ त निपाणी येथे तंबाखूच्या भावाकरिता आंदोलन केले. पन्नास हजार शेतकरी पंधरा दिवस सतत रस्ता आडवून बसले होते. परिणामी सरकारने सहकारी संस्थेवर शेतकऱ्याचा प्रतिनिधी घेऊन तंबाखूची खरेदी केली. मागील कर्जे शेतकऱ्यास माफ केली.

१९८५ साली सरकारी कृत्रिम धाग्याच्या कापड धोरणाविरुद्ध चळवळ सुरु झाली आहे. कृत्रिम धागा परदेशातून आयात करावा लागतो. किमान त्याला बनविण्यास पेट्रोलियम लागते ते परदेशातून घ्यावे लागते, त्याचा परिणाम, आपल्या देशात पिकणारा कापूस, गिऱ्हाईक न मिळाल्यामुळे पडून राहाण्यांत व गंगाजली परदेशात जाण्यास तयार होणार आहे. शिवाय सर्व सामान्य माणसाला परवडणारे कापड मिळणार नाहीच! शिवाय कापड उद्योगात गुंतलेला एक कोटी कामगार बेकार होणार ह्या करिता 'स्वदेशी व स्वावलंबनाचे' व्रत आचरण्याची पाळी म. गांधी च्या काळा नंतर आता पुन्हा आलेली आहे.

शेती मालास उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळाल्यास त्याचे परिणाम खालील प्रमाणे होतील.

(१) शेतीचे उत्पादन वाढविण्याची इच्छा वाढेल कारण शेतीवर जास्त पैसे खर्च करण्याची क्षमता निर्माण होईल.

(२) गरीब माणसाचा फायदा होईल कारण त्यालाही श्रमाचा मोबदला मिळेल मजूरीचे दर वाढवून मिळतील.

(३) आज एकूण एक शेतकऱ्यांवर कोणाचे तरी कर्ज आहे तो कर्जमुक्त होईल.

(४) शेतकऱ्यांकडे पैसा जमत राहिल्यास ग्रामीण भागांत उद्योग-धंदे वाढतील. त्यामुळे बेकारी कमी होईल.

(५) भारत व इंडिया यामध्ये आज जे अंतर वाढत आहे ते अंतर कमी होईल. सामाजिक व आर्थिक समता अस्तित्वांत येईल.

(६) शहरांत कामाकरितां जाणाऱ्या लोकांना अटकाव बसून शहरांत वाढणारी लोकसंख्या, झोपडपट्टी – अनैतिक व आरोग्यहीन व स्त्यांना आळा बसेल.

शेती मालाचे भाव वाढवून दिल्यास चलन वाढ होईल बिगर शेतीवाल्या लोकांवर खर्चाचा बोजा पडेल त्यामुळे ते अव्यवहार्य आहे असे सरकारचे आज म्हणणे आहे.

त्यावर शेतकरी संघटनेचे म्हणणे असे आहे शेती न करणारा वर्ग हा १५–२० टक्के असून बहुतांशी शहरांत व्यापार, कामगार, नोकर वा स्वतंत्र व्यवसायांत आहेत. ह्या सर्वांच्या संघटना असून त्यां वेळोवेळी सरकारवर दबाव आणून आपला फायदा करून घेतात. कामगार वर्गास व सरकारी नौकरांना मिळणारा पगार वाढीव भत्ते व इतर सवलती हा त्याच्याच परिणाम आहे. पगार ठरवितांना "जीवनमान निर्देशांक" ठरविला जाऊन

त्याप्रमाणे पगार दिला जातो हा निर्देशांक ठरवितांना विमान, दारू, टी. व्ही. मोटर सारख्या सामान्य व गरीब माणसाला नको असलेल्या गोष्टींची किंमत गृहित धरली जाते तीच मुळांत चूक आहे. सामान्य माणसाच्या ज्या किमान गरजा सरकार भागवू शकते त्याच गोष्टींचा विचार करून हा निर्देशांक काढला जावा व तो सरसकट सर्वांच्या उत्पन्नास लागू व्हावा.

पगार जास्त वाढला तरी धान्य खरेदीवर म्हणजे शेती मालावर फार थोडा पैसा खर्च करावा लागतो. शेती मालाचे भाव वाढविल्यास तो खर्च १। पट ते १।। पट होईल, जास्त होणार नाही. जास्तीचा पगार व वाढीव भत्ते हे केवळ चैनीखातर खर्च होतात. आपला लहान भाऊ शेतकरी ज्या दारिद्र्यावस्थेत राहतो ते बघून जाणीवपूर्वक, इंपोर्टेड व महागड्या वस्तूंचा हव्यास व चैनीवरील खर्च कमी करण्यास हरकत नाही.

औद्योगिक क्षेत्रांतील उत्पादनाच्या किंमती त्याच्या खर्चाच्या प्रमाणांत किती जास्त आहेत. हे वरील कांही उदाहरणावरुन स्पष्ट होईल. त्यांवर नियंत्रण आणून त्या किंमती कमी करून लोकांना ते पुरविणे सहज शक्य आहे.

चलनवाढ रोखणे हा सरकारच्या दृष्टीने फारसा अडचणीचा प्रश्न नाहीच, धान्यास उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळाल्यास शेती न करणाऱ्यांचा खर्चही फारसा वाढत नाही उलट त्यामुळे आतांपर्यंत सर्व विकासाच्या साधनापासून वंचित ठेवले गेलेल्या फार मोठ्या समूहाला न्यायच मिळणार आहे.

शेतकऱ्यांचेच नव्हे तर सर्व थरांतील लोकांची बेकारी, दारिद्र्य नाहीसे करून आर्थिक विषमता कमी करण्याचा व राष्ट्रास प्रगतीकडे नेण्याचा तोच मार्ग आहे असा शेतकरी संघटनेचा दावा आहे.

३९०५

क्रांतीची संकल्पना

"क्रांती" म्हणजे प्रस्थापित व्यवस्थेत आमूलाग्र पूर्वनियोजित असा बदल. मानवाच्या एखाद्या गटाला त्या गटातील बहुसंख्य लोकांना प्रस्थापित सामाजिक, राजकीय, आर्थिक वा शैक्षणिक व्यवस्थेचा जांच वाटत असेल तर ती व्यवस्था बदलून टाकावी असे जन-मानसात येऊ लागते. हा बदल नेमका कशा प्रकारचा असावा ह्याचे चित्र जेव्हां विचारवंत व बुद्धिवादी लोक समाजापुढे उभे करतात तेव्हां त्यांचे आकर्षण सर्व समाजाला वाटू लागते. त्यांतूनच ध्येये निर्माण होतात. ध्येयाकरितां बलिदान करणारे तयार होतात. ह्या सर्वांना एकत्र ठेवण्याचे कार्य संघटनकुशल कार्यकर्ता किंवा पुढारी करीत असतो. आपल्या ध्येयाचा प्रसार व प्रचार जेवढ्या कुशलतेने करता येईल तेवढा करून बहुसंख्य गटाची संघटना बांधून हा पुढारी प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध बंड पुकारतो. त्याची शक्ती पुरेशी असेल तर प्रस्थापित व्यवस्था कोलमडून पडते व क्रांतीचा विजय होतो.

फ्रेंच राज्यक्रांती –

जगांत पहिली राजकीय क्रांती फ्रान्समध्ये झाली. फ्रान्स मधील तेव्हांची राजेशाही, सरदारांचे प्राबल्य व पोपची अनियंत्रित सत्ता ह्या खाली सर्वसामान्य समाज भरडला जात होता, त्यांतून बहुसंख्य समाजाची मुक्तता करण्याकरितां स्वातंत्र्यसमता व बंधुता ह्या ध्येय धोरणाची कास धरून सामान्य माणसाला संघटित केले गेले. क्रान्तीचे तत्त्वज्ञान पुरविण्याचे कार्य वाल्टेअर, मॅरिस्कून यांनी केले. नवीन समाज रचनेचे आकर्षण वाढल्यामुळे शे. ८० टक्के सामान्य मांणूस क्रांतीच्या बाजूने उभा राहिला. बेस्टाईलचा तुरुंग फोडून क्रांतीकारकांना मुक्त करून पहिला विजय शासनावर त्याने मिळविला. सामान्य माणसाचा आत्मविश्वास त्याने वाढला, कांही वर्षातच (१७९२-९५) शासन व्यवस्थेत त्याने आमूलाग्र बदल घडवून आणला.

अमेरिकन क्रांती –

फ्रान्सच्य राज्यक्रांतीपासून प्रेरणा घेऊन इंग्रजी राज्याच्या जोखडा पासून मुक्त होण्याकरिता अमेरिकेतही राज्यक्रांती झाली. पेले, सॅम्युएल, ॲडम्स ह्या बुद्धिवंतांनी व तत्त्वज्ञांनी सर्व मानव जन्माने समान आहेत. स्वातंत्र्य व सुख उपभोगण्याचा सर्वांना समान अधिकार आहे, ही घोषणा केली वास्तविक अमेरिकेत आलेला माणूस, मूळचा इंग्लिश, जर्मन, इटालियन, स्कॅण्डेव्हियने इ. देशातला, पण तो इंग्रजी दडपशाही विरूद्ध अमेरिकन म्हणूनच एकत्र येऊन उभा राहिला व त्याने एका लोकशाहीप्रणीत राज्यव्यवस्थेचा प्रयोग सुरू केला.

रशिया व चीन

रशिया व चीन येथील राज्यक्रांतीच्या मागे मार्क्सचे तत्त्वज्ञान आहे, युरोपमध्ये औद्योगिक क्रांतीनंतर भांडवलशाहीचा उदय झाला व त्यांतून

सर्वसामान्य माणसाचे शोषण सुरू झाले. त्या भांडवलशाहीतून मुक्त होण्याकरितां सर्व कामगारांना व दलितांना संघटित होण्याचे आवाहन केले. आंतरराष्ट्रीय कामगारांची व दलितांची बलवान संघटना बांधणारा व बघणारा मार्क्स हा जगांतील पहिला द्रष्टा होता. १८४८ साली त्याने पहिला कामगारांचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. लेनिन, ट्रॉटक्सी त्यांच्या तत्वज्ञानाचा प्रचार केला व कामगार दलितांची एकजूट होऊन झारचे शासन उलथून टाकण्याचा पहिला मान १९१७ साली रशियाने मिळविला. चीनमध्ये क्रांती होण्याकरिता १९४८ सालापर्यंत थांबावे लागले.

भारतीय क्रांती –

भारतांत १८१८ मध्ये पेशवाईचा पाडाव झाला व मुम्बईस व्यापारा-निमित्त आलेल्या इंग्रजांनी स्थिर सरकार देण्याच्या मिषाने हळूहळू सर्व शासनयंत्रणा ताब्यांत घेतली. तत्पूर्वीच कलकत्ता येथें आलेल्या लॉर्ड क्लाईव्हने सुजाउद्दौल्याचा पराभव करून बंगाल आपल्या ताब्यांत घेतलाच होता. ईस्ट इंडिया कम्पनीचे राज्य जाऊन इंग्लंडच्या राणीचा अंमल सर्व भारतवर्षावर सुरू झाला. कांही व्यापारी, जमीनदार व कारकुनी करणाऱ्या लोकांना सुरक्षितता मिळाली पण बाकीच्या समाजाचे शोषण त्यांनी पद्धतशीरपणे केले.

ह्या शोषणातून मुक्त होण्याची धडपड लो. टिळक, लाला लजपतराय, बिपिन चन्द्रपाल, स्वा. सावरकर, नेताजी सुभाषचन्द्र बोस इ. च्या नेतृत्वा-खाली सुरू झाली व म. गांधींच्या नेतृत्वाखाली सर्व समाज स्वातंत्र्याकरितां संघटित होऊन हे स्वातंत्र्य १९४७ साली अवतरले.

भारतीय स्वातंत्र्याचे ध्येय शोषणमुक्त समाजाचे होते. हा शोषणमुक्त समाज लोकशाही, समाजवाद व धर्मातीत राज्यव्यवस्थेमधून निर्माण व्हावयाचा होता.

महत्त्वाचा प्रश्न –

क्रांती झाल्यानंतर सर्व ध्येयाची पूर्ती झाली काय ? हा महत्त्वाचा प्रश्न आहे. फ्रान्समध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता ही पूर्णत्वाने अवतरली नाही. सर्व समाज समान मानणाऱ्या अमेरिकेतही नीग्रोचे व रेड इंडियन्सचे प्रश्न तीव्रतर होत आहेत. मार्क्सप्रणीत शोषणमुक्त शासनविरहित समाज रशिया व चीनमध्ये अद्यापि निर्माण झालेला नाही. भारतीय स्वातंत्र्याची दशा तीच आहे. ज्या महान ध्येयाकरितां अनेकांचे बलिदान झाले ती ध्येये लोकशाही–समाजवाद व धर्मातीत राज्यव्यवस्था ही अद्यापि दूरच आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दाखवून दिलेल्या घटनेच्या दिशेनंतरही अद्यापि दूर आहेत. ही सामान्य माणसाची खंत आहे.

भाकर आणि स्वातंत्र्य –

मग ह्या क्रांत्या फसल्या म्हणावयाच्या की काय ? तसे म्हणणे योग्य होणार नाही. ज्या प्रस्थापित व्यवस्थेने तेव्हांचा समाज पोखरून निघाला होता ती व्यवस्था आमूलाग्र बदलण्यांत ह्या क्रांतीला यश आलेले आहे. मानवी स्वातंत्र्य ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. ती ह्या क्रांतीतून साधली गेली आहे, गुलामगिरीच्या जोखंडातून मुक्त झालेला मानव ह्या क्रांतीनंतरच दृष्टीस पडतो. गुलामीत पिचणाऱ्या माणसांना ह्या क्रांत्या म्हणजे मार्गदर्शक तत्वज्ञान व दिलासा देणाऱ्याच आहेत. कोणत्याही प्रकारे त्यांचे मोल कमी नाही, शेवटी भाकरी मागण्याकरितां भाकरी मागण्याचे स्वातंत्र्य अस्तित्वात असावे लागते,

परिवर्तनाची गरज –

आपणास एवढेच म्हणता येईल की, ह्या स्वातंत्र्यान्तर्गत जी ध्येये आम्ही बघत होतो ती पुर्णपणे साकारली नाहीत.

लोकशाही म्हणजे केवळ बहुसंख्येचे राज्य नाही. अल्पसंख्य लोकांच्या मतांकडे उदारमतवादी दृष्टिकोन समाजांत यावयास पाहिजे ही एक वैचारिक प्रक्रिया आहे. ती चालू राहण्याकरिता आजची जातीनिहाय निवडणूक पद्धत व पन्नास टक्केपेक्षाही कमी मते मिळवून निवडून येणारा उमेदवार व योग्य प्रतिनिधीत्व न करणारा निर्वाचित प्रतिनिधी ह्याबद्दल विचार करून त्या पध्दतीत बदल करणे आवश्यक आहे. निवडणूक पध्दती असमाधानकारक आहे. म्हणून ती बदलणे आवश्यक आहे.

भारतीय शिक्षण पध्दतीत आमूलाग्र बदल व्हावा व शिक्षण जीवनाभिमुख बनावे असे ना शंकरराव चव्हाण (माजी केन्द्रीय शिक्षण मंत्री) पासून सर्वांना वाटते. तरूणांचे रिकामे हात उत्पादक कामात गुंतविले तर सर्व देशभर एक सर्जनशील प्रेरणांची भावनोत्कटता उद्‌भवेल व राष्ट्रीय एकात्मतेलाही ते पूरक ठरेल. मा. शिवाजीराव पटवर्धन, बाबासाहेब आमटे ह्यांचे प्रकल्प तरूणांना आव्हानेच आहेत.

व्यसनमुक्ती व अपरिग्रहवृत्तीचा वैयक्तिक व सार्वजनिक जीवनांत होणारा वापर, सर्व समाजाची नैतिक प्रगती करण्यास कारणीभूत ठरेल

समाजवादाचा आशय –

समाजवादाची आशयघनता जाणवली पाहिजे. सर्वांना विकासाची समान संधी मिळवून देणे, परस्परांच्या सामाजिक व आर्थिक उत्थानाला हातभार लावणे व विषमता कमी करण्याचे प्रयत्नपूर्वक कार्यक्रम आखणे, त्यांना अग्रक्रम देणे ही निकडीची गरज आहे.

धार्मिक स्वातंत्र्य म्हणजे प्रतिगामी विचारांना चिकटून कुटुंब नियोजनासारख्या राष्ट्रीय कार्यक्रमांत विरोध करणे योग्य नाही हे लोकांना कोणी सांगायचे ? समान नागरी कायदा व आवश्यक तेव्हां त्याची अंमलबजावणी – घटनांतर्गत तरतुदीचा विचार ह्याच वेळी गंभीरपणे करावयास पाहिजे.

आपला देश कृषिप्रधान आहे. शकडा ऐंशी टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत, हे लक्षांत घेऊन शेती सुधारणा, पाणी पुरवठा, वीज, दळण-वळणाची साधने ह्यांची सोय करणे, शेतीमालास उत्पादन मूल्य मिळवून देणे – शेतीमालाच्या साठ्यांची व्यवस्था करणे व शेतीकरितां लागणारी अवजारे, खते, स्वस्त दरांत पुरविणे हा कार्यक्रमाचा एक महत्त्वाचा भाग होऊ शकतो. आज त्या उलट ह्या ऐंशी टक्के लोकांना वेठीस धरुन त्यांचे शोषण होते व त्यावर वीस टक्के वर्ग पोसला जातो. हे बंद करणे आपल्या हातीं नाही काय ?

तरुणापुढील आव्हान –

म. गांधींनी अहिंसा, खादी व स्वावलंबन ह्यांचा पुरस्कार केला. समाजवादी परिवर्तन हे अहिंसक व सृजनशील समाज रचनेचेच तत्त्व आहे. व्यक्तिगत सामाजिक वा राष्ट्रीय जीवनांत स्वावलंबनाची फार मोठी गरज आहे. कर्ज व परकीय भांडवल व परकीय मदत देशाला पारतंत्र्याचा रस्ता दाखविते. हे थांबविण्याकरितां प्रत्येक टप्प्यावर काटकसर करता आली पाहिजे. अजूनही आपला समाज आदर्शवादी व आदेशवादी आहे. म. गांधींना ह्याची जाणीव होती, अपरिग्रह, अहिंसा, स्वावलंबन, खादी ही मूलभूत तत्त्वे त्यांनी जोपासलीच नाहीत तर ती स्वतः अंगिकारिली. त्याचाच परिणाम म्हणून एक तडफदार अस्मितायुक्त गरुडाची झेप घेणारा तरूण ते घडवू शकले.

त्याच तरूणांची आजही गरज आहे. स्वातंत्र्य मिळवून आपण थांबलो. ती परिस्थिती आता बदलण्यायोग्य झाली आहे. आपली दिशाही निश्चित आहे. थोडासा विचार केला तर ही क्रांती आहे, असे म्हणावे लागेल. मग हवे तर मा. जयप्रकाशजींची संपूर्ण क्रांती म्हणा व दुसरे कांही नांव द्या.

हेच आजच्या तरूणापुढील राष्ट्रीय आव्हान आहे.

●●●

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
वर्ग क्र. ३७५
ग्रं. क्र. २५६३

शुद्धि पत्रक

पृष्ठ क्र.	ओळ	असे आहे	असे वाचावे
१५	८	बाराशे	चारशे
२१	२६	१९२७	१९१७
२७	९	२९२८	१९२८
३६	२०	क्रांतिकारकांनी	क्रांतिकारकांना
४६	२१	(नित्शेचे) म्हणने	म्हणणे
५०	१६	सत्ता संस्थाने	सत्तास्थाने
५२	१०	अहंकाराने प्रेरित करु लागले	अहंकाराने प्रेरित व्यक्ती सत्ता जोपासण्या करिता प्रयत्न करु लागले
५३	३	नाहिसी	नाहिशी
५३	२४	काम हाती घेतात	काम ते हाती घेतात
५७	५	युयोपीय	युरोपीय
६०	९	होणे असते	होत असते
६२	२५	संघर्षाप्रत व संघर्षात	संघर्षाप्रत जातो व
६५	९	उत्पादनाच्या	उत्थानाच्या
६५	२४	संघनेत	संघटनेत
६७	६	कामगारांनी	कामगारांनो
६७	२०	द्वंदामक	द्वंदात्मक
६८	१०	भांडवलशहात	भांडवलशाहीत
७२	७	डेसॉस	डेमॉस
७२	१५	विचार	विकास
८१	२१	या मुद्यावर	ज्या मुद्यावर
८४	२८	मैत्री	जंत्री
८७	९	सडवादी	जडवादी
९६	२२	येणारे	नेणारे
१०४	६	१३ टक्के	१३ टक्के साक्षर
११६	१३	अल्वर्ट शीस्त	अल्वर्ट शील्स
१२४	२१	ज्यांनी	त्यांनी
१२६	२३	भरलेले	भरपूर
१२८	१२	निग्रह	निष्कर्ष
१२९	१०	त्यांच्याकडे करण्याकरिता	त्यांच्याकडे शोषण
१३१	८	जीवन	जीवनमान
१३३	१५	५ वी	७ वी
१३३	१८	उत्पादनाची	उत्पादकाची
१३६	१२	माम्भूमीच्या	मातृभूमीच्या
१३६	२०	पैसे चोरणे	पैसे चारणे
१४१		हा लेख लोकनायक जयप्रकाशजींच्या ७५ व्या वाढदिवसा निमित्त लिहिला आहे.	

REFBK-0025093

डॉ. व. द. भाले हे एक कला, वाङ्मय व राज्यशास्त्राचा विशेष व्यासंग असलेले व्यक्तिमत्व.

राष्ट्र सेवा दलाचे खोलवर झालेले संस्कार आणि स्वभवत:च असलेली नि:स्पृह सेवाभावी वृत्ती, यामुळे विधायक कार्यात त्यांचा नेहमीच सक्रीय वाटा असतो. आणि समाज कार्याचाच एक भाग म्हणून त्यांनी ललित आणि वैचारिक स्वरुपाचे विपुल लेखन केले आहे.

" स्वातंत्र्याची संकल्पना " या पुस्तकात त्यांनी फ्रान्सच्या राज्यक्रांती पासून ते शरद जोशी पर्यन्त, स्वातंत्र्या संबधी झालेल्या चिंतनाचा व जगातील महत्त्वाच्या परिवर्तनांचा संक्षिप्त आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

सरळ, साधी, प्रवाही भाषा व आकलन सुलभ मांडणी यामुळे हे पुस्तक जिज्ञासू तरूणांना व विद्यार्थ्यांना निश्चितच मार्गदर्शक ठरेल.